# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५०

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. शामलाल एम. मालपाणी, अपिलार्थी

एस. टी. बुक स्टॉल, मनमाड, तालुका नांदगांव,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा आगार व्यवस्थापक (क), राज्य परिवहन महामंडळ, मनमाड

आगार, मनमाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,

नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी अर्ज केला असता अद्याप त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही उत्तर न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांचे भाडे स्वीकारण्यास टाळाटाळ करणे या विषयावर दिनांक ०५-१२-२००७ ते ११-०१-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" बुकस्टॉलचे भाडे घेण्यास नकार देतात व लिहून न देता स्टॉल सील करण्याची धमकी देतात हे कुठल्या अधिकाराखाली. दरमहा पाच तारखेला भाडे स्वीकारण्याचा अर्ज किंवा इतर कारण काढून त्रास देतात, भाडे स्वीकारण्यासाठी अर्जाची आवश्यकता का व कशासाठी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना माहिती देण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जरी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस वरीलप्रमाणे माहिती दिल्याचा युक्तिवाद केला असला तरी आज सुनावणीच्या वेळी या दोनही अधिका-यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिलेले उत्तर व दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास दाखविता

आला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीस दिलेली माहिती म्हणून दाखविलेली कागदपत्रे त्यंनी मागणी केलेल्या माहितीशी पूर्णतः विसंगत असून जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या कथित पत्राचे अवलोकन करता, त्याचा अपिलार्थीच्या प्रथम अपिलाशी दुरान्वये देखिल कोणताही संबंध असल्याचे आयोगास आढळून येत नाही. या संपूर्ण घटनाक्रमातील अशा प्रकारच्या घटना पाहता अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतया उपेक्षा केल्याचे येथे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे ती मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या कथित माहितीव्दारे अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या बुकस्टॉलचे भाडे न स्वीकारण्याची कारणे अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या एखाद्या कृतीबाबत अथवा निर्णयाबाबत कारणांची मागणी करणे, त्यांच्याकडून खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या माहितीची मागणी करणे हे मूळात अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत त्यांनी ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे हे सर्वसाधारणपणे येथे अपेक्षित आहे. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी व त्यांच्या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी साधे उत्तरही देण्याचे सौजन्य दाखविले नाही, ही बाब येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ चा भंग केला असून त्याव्दारे त्यांनी स्वतःला कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता असे समजून आले आहे की, अपिलार्थीचा मनमाड येथील स्थानकावर बुकस्टॉलचा व्यवसाय असून त्यांचा स्थानिक एस. टी. प्रशासनाशी भाड्याच्या दरासंबंधी

वाद चालू आहे.  हा वाद व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांनी  लवकर निपटावा असे त्यांना येथे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| नाशिक | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक १८-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. शामलाल एम. मालपाणी, एस. टी. बुक स्टॉल, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (क), राज्य परिवहन महामंडळ, मनमाड आगार, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, एस. टी. मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५१

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. गणेश अभिमान यादव, अपिलार्थी
मु. पो. विंचूर, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस निरीक्षक,
सिन्नर पोलीस ठाणे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर पोलीस अधीक्षक,
नाशिक ग्रामीण, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : भगवान विठ्ठल काळूंगे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यांनी परस्पर न्यायालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे चुकीचे आदेश पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांना शास्ती केलेली नाही व अपिलीय अधिकारी यांचे आदेश हे जन माहिती अधिकारी यांना वाचविण्यासाठी केलेला फार्स असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांच्या या अपील अर्जामध्ये त्यांनी शेवटी, मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक १४-१०-२००७ ते ०१-०७-२००८ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" भगवान विठ्ठल काळूंगे रा. सोनारी तालुका सिन्नर जिल्हा नाशिक यांच्या विरुध्द दाखल केलेल्या फिर्यादीचे दस्तऐवज, फिर्याद, दोषारोपपत्र, अटक पंचनामा, साक्षीदारांचे जबाब, पी. एम. रिपोर्ट, मेडिकल सर्टिफिकेट, स्थळ पंचनामा, इनक्वेस्ट पंचनामा, सी. ए. रिपोर्ट, पोलीस अहवाल व इतर दस्तऐवज. "
अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सिन्नर पोलीस ठाणे येथून समक्ष माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने या पत्रावर त्यांच्याकडील दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची विनंती केली. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक १८-११-२००७ रोजी सिन्नर कोर्टामध्ये दोषारोपपत्राबरोबर दाखल केली असल्याचे अपिलार्थीस कळविले व ही माहिती न्यायालयात दाखल केली असल्याने अपिलार्थीस ती सिन्नर येथील न्यायालयातून हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे न्यायायालयातून प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले असल्याने, अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागते वेळेस ते या पदावर कार्यरत नव्हते. या पदावर ते दिनांक ०३-०४-२००९ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने ज्या प्रकरणासंबंधी माहिती मागितली आहे त्या प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन यासंबंधीची सर्व कागदपत्रे त्यांनी आता सिन्नर येथील न्यायालयात दाखल केलेली आहेत. सिन्नर न्यायालयाकडून त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करु नये अशा अर्थाचे कोणतेही आदेश अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुनही त्यांनी यासंबंधात कोणताही वैध पुरावा त्यांच्या अर्जासोबत दाखल केलेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज करतांना ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे असे नमूद केले आहे, मात्र यासंदर्भातील कोणताही वैध पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या अर्जासोबत जोडला नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती देऊ केली. जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती स्वीकारण्याऐवजी अपिलार्थीने दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे उलट जन माहिती अधिकारी यांना त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीच्या शुल्काची विचारणा केली. या पत्रव्यवहाराच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने ज्या कागदपत्रांची मागणी केली होती ती कागदपत्रे, न्यायालयात पाठविली होती व तदनंतर ही कागदपत्रे न्यायालयातून उपलब्ध होऊ शकणार असल्याचे अपिलार्थीस त्याप्रमाणे सूचित केले. आयोगाच्या मते जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्राच्या स्थळप्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असतात किंवा कसे याची आयोगाने विचारणा केली असता या कागदपत्राच्या सथळप्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व तसेच ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना न्यायालयाने कोठल्याही प्रकारे अद्यापपावेतो प्रतिबंध केलेला नाही हे त्यांनी मान्य केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी शुल्काची आकारणी करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीकडून ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा मागवून घ्यावा. जर अपिलार्थीने वैध पुरावा त्यांच्याकडे सादर केला तर त्यांना ही माहिती त्यांनी विनामूल्य द्यावी, अन्यथा ही माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ शुल्क रुपये दोन याप्रमाणे आकारणी करावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद करुन त्यांनी चुकीचे आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी यांना शास्ती केली नाही असा उल्लेख केला आहे. या मुद्दयावर असे नमूद करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जो अर्ज केला तो परिपूर्ण नाही. त्यांनी या अर्जामध्ये ते स्वतः दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुनही दारिद्र्यरेषेखालील दाखला या अर्जासोबत जोडला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय हा त्यावेळच्या वस्तुस्थितीवर अवलंबून होता आणि जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे कोणतेही अधिकार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये नसल्याने त्यांनी जन माहिती अधिका-यास शास्ती लावण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या संदर्भात उपस्थित केलेले सर्व आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता अपिलार्थीने निरर्थक पत्रव्यवहार करुन कालापव्यय केला, त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश अभिमान यादव, मु. पो. विंचूर, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, सिन्नर पोलीस ठाणे, तालुका सिन्नर जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५२

निर्णय दिनांक  १८-०४-२००९

१ श्री. शेख मकबुल शेख गफूर, अपिलार्थी
गणेश नगर, लासलगांव, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस निरीक्षक,
मनमाड पोलीस स्टेशन, मनमाड, तालुका नांदगांव,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा पोलीस उप अधीक्षक, मनमाड, तालुका नांदगांव,
जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड उपविभाग, मनमाड
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, कार्यालय पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण
त्रयस्थ पक्ष : १. शेख मोहमद,
२. सौ. सुरय्या,
सौ. रानी उर्फ नजराना अब्दुल रेहमान

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. शेख मोहमद व सौ. नजराना अ. रहेमान शेख हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द केले असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, " या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार काळजी न घेता व बेजबाबदारपणे वागून बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्या गुन्ह्यावर पांघरुण घालण्यासाठी चौकशीचा देखावा केला व अपिलार्थीची फसवणूक केली. अपिलार्थी सुनावणीच्या दिवशी पूर्ण दिवसभर त्यांच्या कार्यालयात बसूनही त्या दिवशी त्यांच्या अपिलावर सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्याच दिवसाच्या तारखेत चुकीचा निर्णय जाहीर केला. जन अपिलीय अधिकारी यांचे वागणे संशयास्पद असून ते आपले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना वाचविण्याचा प्रयत्न करतात. माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अपील दाखल केल्याच्या दोन दिवस अगोदरची तारीख टाकून ते पत्र पोस्टात टाकतात व वेळेत काम केल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करतात, जे पूर्णतः बेकायदेशीर आहे. खरी माहिती देण्याचे हेतुपुरस्सर टाळण्याच्या उद्देशाने जन माहिती अधिकारी हे कार्यवाही करत असतात. "

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली असता अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय दिला. तथापि अपिलार्थीस यांचे म्हणणे असे आहे की, त्या दिवशी सुनावणी झालेली नाही. सदर सुनावणी आदेशावर मागील तारीख टाकून जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश पारित केले आहेत. थोडक्यात या प्रकरणी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी जन अपिलीय अधिकारी यांनी दिली नसल्याचे म्हटले आहे. यावर समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर आवश्यक त्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प न डकविल्याने त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यानंतर दिनांक ०६-१०-२००८ रोजी अपिलार्थीने कोर्ट स्टॅम्प डकवून परत अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केला व त्यावर दिनांक २०-११-२००८ रोजी सुनावणी घेतली. दिनांक २०-११-२००८ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये घडलेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी ते बाहेरगावी गेले होते व त्यांनी संध्याकाळी परत आल्यावर त्या दिवशीच हे आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी, या प्रकरणी अपिलार्थीस, नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्याची पुनश्च एक संधी देण्याच्या दृष्टीने उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी, यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

| | | |
|---|---|---|
| नाशिक | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | १८-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. शेख मकबुल शेख गफूर, गणेश नगर, लासलगांव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड उपविभाग, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, कार्यालय पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५३

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. रघुनाथ नामदेव पाटील, अपिलार्थी

विधाते नगर, पखाल रोड, सर्व्हे नं. १६,

प्लॉट नं. ५९, सिंधुरत्न बंगला, वडाळा शिवार,

नाशिक - ०६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप संचालक,

भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप संचालक,

भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, कार्यालय उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक

त्रयस्थ पक्ष : १. श्री. चव्हाण,

२. श्री. पी. डी. सोनवणे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर ०१-

०१-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द केले आहे असे नमूद करुन अपिलार्थीने पुढे असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय हा त्यांनी मोघम स्वरुपाचा व कोणत्याही कागदपत्रांची छाननी न करता दिलेला आहे. त्यांच्या या अभिप्रायासह त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयातील श्री. पी. डी. सोनवणे व श्री. चव्हाण यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारी अर्जावर त्यांच्या कार्यालयाने कोणती कारवाई केली यासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीच्या या तक्रारीसंदर्भात म्हणणे मांडण्याची संधी का देण्यात आली नाही, त्यांच्या दिनांक ११-१०-२००४ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कारवाई व श्री. पी. डी. सोनवणे व श्री. चव्हाण यांची जामनेर तालुक्यात किती सेवा झाली - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर अर्ज उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी निर्णय देऊन या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी केलेल्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिले. हे आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी कोणास दिले व अपिलार्थीच्या कोणत्या अपिलासंदर्भात दिले याचा कोणताही उल्लेख या आदेशामध्ये नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक २९-०६-२००७ रोजी माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक २०-०७-२००७ रोजी अपिलार्थीस या प्रकरणी अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांच्याशी पत्रव्यवहार करण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली होती. याबाबत पहिल्या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावर चौकशी करण्याकरिता अपिलार्थीस म्हणणे मांडण्याची संधी का दिली नाही अशी माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारली होती. अपिलार्थीच्या अपेक्षित माहितीचा हा मुद्दा पाहता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत असल्याने या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या स्वरुपात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कोणतीही कारणे विचारणे, खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणे अशा प्रकारच्या माहितीचा या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व्दारे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-१०-२००४ रोजी केलेल्या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. आता या प्रकरणाशी संबंधित सर्व चौकशी पूर्ण झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११-१०-२००४ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांनी वेगवेगळया कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व या संदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यात उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन व्दारे श्री. पी. डी. सोनवणे व श्री. चव्हाण यांच्या जामनेर तालुक्यातील सेवा कालावधीसंबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. श्री. सोनवणे व श्री. चव्हाण हे अनुक्रमे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख व परिरक्षण भूमापक या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सेवेच्या कालावधीची नोंद जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत

विनामूल्य पुरवावी असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन व अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई न केल्याने त्यांनी स्वत:ला अधिनियामतील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावर त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर दिलेल्या अभिप्रायानुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये तथ्यांश नसल्याचे आढळून येत आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचा निर्णय अपिलार्थीने कोणत्या कलमाखाली केलेल्या अपील अर्जावर आहे, त्या अपिलाचा दिनांक काय आहे याचा कोणताही उल्लेख या निर्णयामध्ये नाही. तसेच त्यांनी अंतीमत: पारित केलेल्या आदेशामध्ये अपिलार्थीस कोणी व कशी माहिती द्यावी याचा कोठलाही उल्लेख न केल्याने त्यांचा या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय हा दोषपूर्ण आहे, असे आयोगाचे मत आहे. इत:पर जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे निर्णय देणे टाळावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, या प्रकरणाशी सर्व संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| नाशिक | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | १८-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. रघुनाथ नामदेव पाटील, विधाते नगर, पखाल रोड, सर्व्हे नं. १६, प्लॉट नं. ५९, सिंधुरत्न बंगला, वडाळा शिवार, नाशिक - ०६.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कार्यालय उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५४

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. संदिप शंकर गवळी, अपिलार्थी
श्री. बालाजी स्टोअर्स, गार्डन गेट समोर, मुक्तीधाम,
नाशिक रोड, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, कार्यालय उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागणी केलेली माहिती देण्याचे नाकारले आहे, त्यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी माहितीचे शुल्क देऊनही त्यांना चार तास दाराच्या बाहेर उभे केले व माहितीचे दस्तऐवज दिले नाही, त्यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजी अपील अर्ज दाखल केल्यानंतर १० तारखेचा आऊटवर्ड नंबर टाकून

पत्रावर हस्तदेय असे लिहून पोस्टाने प्रश्नपत्रिका पाठविण्यात आली, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणी ठेवली, तथापि ते स्वतः नियोजित वेळी कार्यालयात उपस्थित झाले नाहीत, त्यांनी अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिली व शुल्क परत केले नाही, या सर्व कारणांनी त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जाच्या शेवटी त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ३१-०८-२००८ रोजी घेण्यात आलेल्या कनिष्ठ लिपीक - टंकलेखक पदाच्या परीक्षेतील " भ. ज. ब " प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या प्रश्नपत्रिकेच्या व उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती मिळण्याबाबत मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०५-१२-२००८ रोजी सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक १०-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. तथापि ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०२-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन त्यांच्या दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या आदेशाव्दारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणी होऊनही त्यांना अपिलासंदर्भात कोणतेही आदेश न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना देण्यात येत असलेल्या अपमानास्पद वागणुकीची कल्पना आयोगास दिली व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगाकडे प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१२-२००८ रोजी माहिती पुरविल्याचा युक्तिवाद केला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०२-०१-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिल्याने अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळून लावले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ३१-०१-२००८ रोजी घेण्यात आलेल्या कनिष्ठ लिपीक -टंकलेखक पदाच्या परीक्षेतील भटक्या जमाती ' ब ' प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकाच्या प्रती मागितल्या आहेत. उत्तरपत्रिकांच्या प्रती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविण्याबाबत मा. उच्च न्यायालय, केंद्रीय व राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी असे निर्णय दिले आहेत की, अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार परीक्षेच्या उत्तरपत्रिका प्राप्त होणे अनुज्ञेय नाही. या निर्णयाप्रीत्यर्थ वेळोवेळी राज्य माहिती आयोगाने व केंद्रीय माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयामध्ये या निर्णयाचा सविस्तर ऊहापोह केला आहे. त्यामुळे याबाबत येथे पुनरुक्ती करण्यात येत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील प्रश्नपत्रिकांच्या प्रती या अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहेत. या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पोस्टाने माहिती पाठविली व पोस्टाचा खर्च अपिलार्थीच्या माथी नाहक मारला. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण दहा पृष्ठांची माहिती देण्यात आली असल्याने अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी वीस रुपये इतकेच शुल्क जमा करुन घेणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीकडून पाच रुपये इतके जादाचे शुल्क प्राप्त करुन घेऊनही अद्यापपावेतो ते त्यांना परत केलेले नाही. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे घेतलेले जादा शुल्क रुपये पाच इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे अपिलार्थीसारख्या अभ्यागतांना अपमानास्पद वागणूक देण्यात येते अशी आयोगाकडे तक्रार केली आहे. यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यालयात येणा-या प्रत्येक अभ्यागतांशी त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांनी सौजन्याची व नम्रतेची वागणूक ठेवण्यासंदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयाकरिता एक सूचनावजा परिपत्रक हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत जारी करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रुपये पाच इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

नाशिक
दिनांक १८-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदिप शंकर गवळी, श्री. बालाजी स्टोअर्स, गार्डन गेट समोर, मुक्तीधाम, नाशिक रोड, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, कार्यालय उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५५

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. किरण चुडामण मोरे, अपिलार्थी
पंचायत समिती क्वार्टर नं. ७, कॅम्प, मालेगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक,
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक आयुक्त (कर),
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-११-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित स्वच्छता विभागात असलेले ड्रेनेज सुपरवायझर, मुकादम, वॉचमन व इतर कामगाराबाबत

दिनांक ०१-०४-१९९९ ते २२-०८-२००८ या कालावधीशी संबंधित एकूण १५ मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६२४ इतके त्यांना महानगरपालिकेच्या संकीर्णकर वसूली विभागात भरण्याचे सूचित केले. हे पत्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०९-२००८ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केले. याबाबतचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी आपला निर्णय पारित केला. या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही व माहिती प्राप्त करुन घेतली नसल्याचे कारणाने नामंजूर केले असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेले दिनांक १२-०९-२००८ रोजीचे पत्र पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६२४ इतके त्यांच्या कार्यालयात संकीर्णकर वसूली विभागात भरण्याचे सूचित केले आहे. अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना या शुल्काचा संपूर्ण तपशील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कळविणे

भाग आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या पत्राने अशा प्रकारचा तपशील उदा. अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची अंदाजे संख्या, प्रतिपृष्ठ दर, सदर शुल्क कोणत्या लेखाशीर्षाखाली भरावयाचे ते शीर्ष हा तपशील या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न कळविल्याने त्यांचे दिनांक १२-०९-२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे व त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये मान्य केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किरण चुडामण मोरे, पंचायत समिती क्वार्टर नं. ७, कॅम्प, मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (कर), मालेगांव महानगरपालिका, मालेगांव,

जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५६

निर्णय दिनांक  १८-०४-२००९

१ श्री. रामदास चिंधा पगारे, अपिलार्थी

६८०, सुभाष चौक, संगमेश्वर, मालेगांव, तालुका मालेगांव,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा इमारत पर्यवेक्षक, नगर रचना विभाग,

मालेगाव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी खोटे कारण देऊन फेटाळले असल्याने, केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगांव महानगरपालिका क्षेत्रातील संगमेश्वर वार्डातील सि. स. नं. ८१/ब या आरक्षित जागेवरील बांधकामाबाबत सन १९८६ ते २००८ या कालावधीशी संबंधीत एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संगमेश्वर वार्डातील सि. स. नं. ८१/ब चे डी. पी. नुसार आरक्षित क्षेत्र, संपूर्ण क्षेत्राच्या मालकाची नांवे, उदय वाईन शॉप प्रमाणे या भूखंडावर १९८६ नंतर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वास्तुंची संख्या, १९८६ पूर्वीच्या किती वास्तू सध्या अस्तित्वात आहेत त्यांचा तपशील, १९८६ नंतर निर्माण झालेल्या वास्तुसाठी मनपाची बांधकाम परवानगी घेतली असल्यास यासाठीच्या अर्जासह दाखल कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती व जर या बांधकामाची परवानगी नाकारली असेल तर या विरुध्द मनपाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नगर भूमापन अधिकारी, मालेगांव यांना त्यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस परस्पर पुरविण्याचे सूचित केले असल्याचे कळविले व तदनंतर दिनांक २३-०७-२००८ रोजी अपिलार्थीस एकूण पाच मुद्दयावर काही माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थी सुनावणीसाठी हजर न राहिल्याने, नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले. तसेच आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, दुस-या एका अर्जदाराने हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागविली असता त्यांना मिळालेली माहिती व अपिलार्थीस मिळालेली माहिती यामध्ये विसंगती असून त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये ज्या जागेचा उल्लेख केला आहे त्या जागेवरील बांधकामाकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती अर्ज प्राप्त झाले आहेत, त्या अर्जांच्या व त्यासोबतच्या परवानगी कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो पुरविल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ०३-०७-२००८ व दिनांक २३-०७-२००८ रोजी त्यांना पुरविली आहे व उर्वरित माहिती ते अपिलार्थीस सात दिवसाच्या आत पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगांव मनपा क्षेत्रात संगमेश्वर वार्डातील सर्व्हे नंबर ८१/ब च्या संदर्भातील काही माहिती मागविली आहे. या भूखंडावर चिल्ड्रन पॉर्कचे आरक्षण डी.पी. मध्ये दर्शविण्यात आले असून हे आरक्षण ठेवण्याचा प्रस्ताव मनपाने शासनाला सादर केला आहे. तसेच या जागेवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करतेवेळी किती लोकांनी बांधकामाच्या परवानगीसाठी किती अर्ज केले होते त्या कागदपत्रांची साक्षांकीत प्रत ही माहिती त्यांनी अपिलार्थीस न कळविता अपिलार्थीस मनपाने बांधकाम परवानगी दिली नाही असे मोघम व उडवाउडवीचे उत्तर दिले आहे असे दिसून येत आहे. आज रोजी आयोगासमोर झालेल्या युक्तिवादाच्या वेळी व तदअनुषंगाने अशी बाब पुढे आली आहे की, या भूखंडावर काही व्यक्तींनी बांधकामाची परवानगी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी मागितली आहे. सर्व संबंधितांना या जागेवर बांधकाम परवानगी नाकारल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याचे जन अपिलीय अधिकारी हे आयोगास सांगत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व काही माहिती मोघम स्वरुपात विचारल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक तीन व पाच व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा ' तपशील ' अशा सर्वसाधारण स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. हा तपशील म्हणजे नेमके काय याचा सविस्तर उल्लेख अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नसल्याने अपिलार्थीस अपेक्षित असलेला कथित तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एकशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती सिटी सर्व्हे ऑफिसकडे उपलब्ध आहे. मुद्दा क्रमांक तीनची माहिती जन माहिती अधिकारी हे ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे नोकरीस आहेत त्याच प्राधिकरणाच्या दुस-या शाखेकडे उपलब्ध आहे. मुद्दा क्रमांक चार व पाचच्या बाबत देखील अशीच परिस्थिती आहे. सबब आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत न दिलेली माहिती, भूखंड क्रमांक ८१/ब च्या मालकाची नांवे, १९८६ नंतर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वास्तुंची संख्या, १९८६ पूर्वीच्या व सध्या अस्तित्वात असलेल्या वास्तुंची संख्या, या जागेवर अपिलार्थीने केलेल्या दिनांकाच्या दिवशी अगर तत्पूर्वी ज्या व्यक्तींनी बांधकाम परवानगी मागितली त्या त्यांच्या बांधकाम परवानगी अर्जांच्या व या अर्जासोबतच्या सहपत्रांच्या सर्व प्रती व बेकायदेशीर बांधकामासंदर्भात मनपाने संबंधितांना बजावलेल्या

अतिक्रमण नोटीशींच्या प्रती ही सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या अपमानास्पद वागणुकीची चौकशी त्यांनी त्यांच्या स्वतःच्या स्तरावर करुन या प्रकरणी दोषी आढळणा-या कर्मचा-यांवर कठोर कारवाई करावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले असल्याचे अथवा कोणत्याही दुष्टहेतूने त्यांच्यापासून लपविण्याचा प्रयत्न केला हे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामदास चिंधा पगारे, ६८०, सुभाष चौक, संगमेश्वर, मालेगांव, तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, मालेगांव महानगरपालका, मालेगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५७

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. भोर गणेश महादु, अपिलार्थी

रा. महाराणा प्रताप नगर, घोटी बु. तालुका इगतपुरी,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घोटी,

तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),

पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०४-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. या पत्रात त्यांना माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने व आता त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने त्यांचा विचाराधीन अपील अर्ज रद्द करण्याची अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २५७/२००८, दिनांक १२-१२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भोर गणेश महादु, रा. महाराणा प्रताप नगर, घोटी बु. तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घोटी, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी ग्रामपंचायत, पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५८

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. संजय किसन बागूल, अपिलार्थी
नगरसेवक वार्ड क्रमांक २१, सुनिल बागूल पतसंस्था, बायजाबाई
छावणीशेजारी, रामवाडी, पंचवटी,
नाशिक - ०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय कृषि सह संचालक,
नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती देऊन त्यांनी शासनाच्या बदली कायद्याच्या विरुध्द केलेली नियमबाह्य कार्यवाही अपिलार्थीस समजू नये या दृष्ट हेतूने त्यांना सदरच्या मुद्दयाची अपूर्ण माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली. त्यांना काही माहिती

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी घेतलेल्या अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी म्हणजे ६५ दिवसानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. तथापि विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडाची कारवाई करण्यासाठी राज्य माहिती आयोगाकडे प्रस्तावित न करता जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालून अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नाही. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांना शासनाच्या बदली कायद्यातील कोणत्या कलमाखाली ते सक्षम आहात, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ३५ दिवस विलंबाने माहिती दिल्याने आणि मुद्दा क्रमांक दोन बाबत दिलेला निर्णय उचित नसल्याने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द दंडाची आणि शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ' ड ' वर्गातील कर्मचा-यांच्या बदल्याबाबत ०१-०१-२००८ ते १०-०६-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९८ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी केल्यानंतर त्याच दिवशी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. तथापि प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०८-२००८ रोजी निर्णय देऊन या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील त्यांनी खारीज केले. अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज करतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती देण्यात आली असल्याचे कबूल करुन अपिलार्थीस अपील सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती हस्तांतरीत केली ती अपिलार्थीने स्वीकारली व त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाल्याचा निष्कर्ष काढून त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ३५ दिवस विलंबाने माहिती दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी उचित निर्णय दिला नसल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द दंडाची व शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस एकूण दोन टप्प्यात म्हणजे दिनांक ०८-०७-२००८ रोजी व दिनांक २१-०८-२००८ रोजी पूर्ण माहिती दिली गेली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क स्वीकारल्यानंतरही त्यांना प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम सुनावणीत सिध्द झाले आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनच्या संदर्भात अपेक्षित माहिती न मिळाल्याने असमाधान व्यक्त केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोनव्दारे ' ड ' वर्ग कर्मचा-यांच्या बदल्या प्रशासकीय कारणास्तव करण्यास जन माहिती अधिकारी हे कोणत्या कायद्यानुसार त्यातील कोणत्या कलममानुसार सक्षम आहेत, याची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यासंदर्भात शासनाच्या दिनांक १२ मे २००६ रोजीच्या अधिसूचनेच्या कर्मचा-याच्या बदल्यासंदर्भात प्रसिध्द झालेल्या प्रती दिल्या आहेत. या अधिसूचनेतील प्रकरण तीन मुद्दा क्रमांक ६ मध्ये गट ' ड ' मधील कर्मचा-यांच्या बदल्याकरिता प्रादेशिक विभाग प्रमुख हे सक्षम असल्याचे नमूद केले आहे. तसेच मुद्दा क्रमांक ६ मधील परंतुकामध्ये " तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या, बदली करणा-या सक्षम प्राधिका-याला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे, या कलमाखालील त्याचे अधिकार त्याच्या कोणत्याही दुय्यम प्राधिका-याकडे सोपविता येतील " असे नमूद केले आहे. अपिलार्थीने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना ते कोणत्या कलमाखाली ' ड ' वर्गातील कर्मचा-यांच्या बदल्या करण्यासाठी सक्षम आहेत याची माहिती विचारली होती. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे प्रादेशिक विभाग प्रमुख नसल्याने या कलमाखाली ते वर्ग ' ड ' कर्मचा-यांच्या बदल्या करण्यासाठी, त्यांना अशा प्रकारचे अधिकार प्रादेशिक विभाग प्रमुखाकडून दिले गेले नसल्यास, सक्षम नाहीत असे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळेस सह संचालक कृषि यांनी आयोगास असे अवगत केले की, कृषि विभागातील सह संचालक कृषि हे प्रादेशिक विभाग प्रमुख असून त्यांनी वेगळ्या आदेशाव्दारे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील वर्ग ' ड ' च्या कर्मचा-यांच्या बदल्या करण्याकरिता प्राधिकृत केले आहे. त्यामुळे या प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना प्रत्यक्षात ज्या

आदेशाव्दारे वर्ग ' ड ' च्या कर्मचा-यांच्या बदल्या करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे त्या आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देतांना उपलब्ध करुन देणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती या प्रकरणी केल्याचे आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी, त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील वर्ग ' ड ' कर्मचा-यांच्या बदल्या करण्याकरिता सहसंचालकांनी ज्या आदेशाव्दारे प्राधिकृत केले आहे त्या आदेशाची प्रत, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळेत केला असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रुपये ९८ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ७ व ८ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसूनही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खुलासा केल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू असल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईबाबत कोणतेही आदेश नाहीत. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने सकारात्मक कारवाई करावी, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रुपये ९८ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय किसन बागूल, नगरसेवक वार्ड क्रमांक २१, सुनिल बागूल पतसंस्था, बायजाबाई छावणीशेजारी, रामवाडी, पंचवटी, नाशिक - ०३.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२५९

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्री. कचरु कोंडाजी चव्हाणके, अपिलार्थी

रा. श्रीहंस बंगला, प्लॉट नं. ५०, शिवनगर,

तलाठी कॉलनीचे बाजुला, मेरी, पंचवटी,

नाशिक - ०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर,

तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक,

जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर यांनी पूर्ण माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांच्या निर्णयानंतर दहा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास माहिती देण्यासाठी ५५ दिवसांची मुदत होती हा दिलेला

अभिप्राय व निष्कर्ष चुकीचा असून या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे शास्ती व कारवाईस पात्र ठरत असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व कार्यालयीन चौकशीची कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **शासकीय सुट्टीच्या दिवशी मोजणीच्या हद्दी दाखविण्याचे काम सरकारी कर्मचारी करु शकतात याबाबत शासन परिपत्रक, शासन निर्णय व कार्यालयीन आदेश याची सत्यप्रत नक्कल व सह मालकाच्या संमतीशिवाय मोजणी करता येते काय** - या दोन मुद्दयावर माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोधण्याचे काम चालू आहे, त्यामुळे त्यांना १५ दिवसांची मुदत मिळावी अशी अपिलार्थीस विनंती केली. तथापि विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-१०-२००८ व ३१-१०-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी या प्रकरणी दोनही बाजूंनी युक्तिवाद केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या प्रकारच्या माहितीची मागणी केली आहे त्यापैकी एका मुद्दयावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोनव्दारे सहमालकाच्या संमतीशिवाय मोजणी करता येते काय, अशा अर्थाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याची उत्तरे अपेक्षिली आहेत. अशा प्रकारची

प्रश्नोत्तरांची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एकच्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांना देय होत आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती पुरविली आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने दिनांक २२-०८-२००८ रोजी मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-१०-२००८ रोजी प्राप्त झालेली आहे. ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा एकूण १४ दिवसांचा विलंब केलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे असूनही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १४ दिवस विलंबाने माहिती पुरवून दर्शविलेल्या आपल्या कार्यशैली-तील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय नाही. परंतु अपिलार्थीस भूखंडाची मोजणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कोणती पध्दत अवलंबविण्यात येते याचे मार्गदर्शन करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागाच्या म्यॅन्यूअल मधील संबंधीत तरतूदीची प्रत अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना या टप्प्यावर सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक  
दिनांक १८-०४-२००९

( वि. बा. बोरगे )  
राज्य माहिती आयुक्त  
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कचरु कोंडाजी चव्हाणके, रा. श्रीहंस बंगला, प्लॉट नं. ५०, शिवनगर, तलाठी कॉलनीचे बाजुला, मेरी, पंचवटी, नाशिक - ०४.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६०

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्रीमती हेमलता अभिमन पगार, अपिलार्थी

मु. पो. वायगांव, तालुका बागलाण,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास

प्रकल्प, कळवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,

कळवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १६-०५-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, तालुका कळवण यांनी त्यांच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही, त्यामुळे विचाराधीन अपील त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले आहे व पुढे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत:अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे, त्यांच्या स्वत:च्या जन माहिती अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या विविध अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीबाबत काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९० इतके अधिक टपाल खर्च रुपये ७५ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर निर्णय देण्यासाठीचा कालावधी संपण्यापूर्वीच त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

मध्यंतरीच्या काळात जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २१-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचा निर्णय घेतला. अपिलार्थीस त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे विनामूल्य माहिती उपलब्ध झाली. उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपरिपक्व कालावधीत व्दितीय अपील केले असल्याचे व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती यापूर्वीच विनामूल्य प्राप्त झाली असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी ह्या आज सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत असे अनुमान काढण्यास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती दिली या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी ह्या आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी यासंदर्भात आयोगाकडे कोठलाही लेखी युक्तिवाद पाठविला नाही. यावरुन आता अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य उरले नाही, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. या सर्व कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती हेमलता अभिमन पगार, मु. पो. वायगांव, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक (टपाल व्हाया रावळगांव).

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६१

निर्णय दिनांक १८-०४-२००९

१ श्रीमती हेमलता अभिमन पगार, अपिलार्थी
मु. पो. वायगांव, तालुका बागलाण,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, अनुदानित आश्रमशाळा, मोहपाडा, तालुका
सुरगाणा, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कळवण, तालुका कळवण, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक,
मध्यवर्ती कार्यालय शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी, आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १६-०५-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे व त्यांना अर्धवट व चुकीची माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांना जन अपिलीय अधिकारी

यांनी अचूक माहिती न देता भ्रष्टाचारास वाव मिळण्याकामी सहकार्य करतात व उडवाउडवीची उत्तरे देतात असे नमूद केले आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःविषयी काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण यांच्याकडे दिनांक २१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती आयोगास दाखविली. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज वाचनीय नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वेतनासंदर्भात माहिती दिल्याचे दिसून येत आहे. सुनावणीसाठी व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी ह्या आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती हेमलता अभिमन पगार, मु. पो. वायगांव, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक (टपाल व्हाया रावळगांव).

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अनुदानित आश्रमशाळा, मोहपाडा, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक, मध्यवर्ती कार्यालय शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६२
निर्णय दिनांक २०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुरेश त्रिंबक थोरात,<br>सर्जेपूरा जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शहर अभियंता,<br>महानगरपालिका,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त,<br>महानगरपालिका, अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.१०.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०७.२००८ रोजी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्यामुळे संबंधितावर योग्य ती कार्यवाही व्हावी व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमानुसार मिळावी, अशी त्यांनी आपल्या अपील अर्जामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-२००८ या कालावधीतील फेब्रुवारी, मार्च व एप्रिल महिन्यातील टेंडर रजिस्टरची झेरॉक्स प्रत, वर्क ऑर्डरची झेरॉक्स प्रत, शहर अभियंता यांच्या मंथली डायरीची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.७.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. मात्र हे आदेश होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कार्यवाही व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दि. ०२.०६.२००८ रोजी तयार करुन त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्रीमती कोंडाळे यांच्याकडे अपिलार्थीस पाठविण्याकरिता दिली होती. तथापि संबंधित लिपीकाने अपिलार्थीस माहिती न पाठविल्याने अपिलार्थीस माहिती मिळाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे श्रम घ्यावे लागत असल्याचे याप्रकरणी संभवत नाही, अशी आयोगाची खात्री झाली आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या मनातील अपिलार्थीस माहिती देण्यासाठी असलेल्या इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी असू शकते, अशी आयोगाची खात्री झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी वर स्पष्ट केल्याप्रमाणे असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी माहिती तयार करुन ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाकडे पाठविली होती, परंतु संबंधित लिपीकाने ही माहिती अपिलार्थीस न पाठविल्याने अपिलार्थी हे विहित मुदतीत माहिती मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.७.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना आदेशित केले, त्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकाऱ्यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते आणि प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर उपस्थित केलेला मुद्दा-"त्यांनी संबंधित लिपीकाकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि.२.६.२००८ रोजी पाठविली होती",- हा उपस्थित केलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी पश्चातबुध्दीने हा मुद्दा आयोगासमोर मांडला असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर येथे असेही आढळून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे, हे माहित असूनही जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली किंवा कसे, याची त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयानंतर तपासणी केली नाही अथवा संबंधित लिपीकावर कोणतीही कारवाई महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे प्रस्तावित केली नाही, हे पाहता संबंधित

लिपीकाबरोबरच जन माहिती अधिकारी यांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीकडे असलेला उदासीन दृष्टीकोन अधिक स्पष्ट होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांना देखील अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित लिपीक यांच्यापासून ते जन माहिती अधिकारी यांच्यापर्यंतचे या प्रकरणाशी सर्व संबंधित कर्मचारी हे अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल जबाबदार ठरत आहेत. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अशाप्रकारच्या कृतीद्वारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावामुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश त्रिंबक थोरात,एस.टी.कार्यालयासमोर, कोठला रोड,सर्जेपूरा जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६३
निर्णय दिनांक २०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शंकर आनंदा रोहोकले,<br>भाळवणी, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>पारनेर, जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही व माहिती अधिकारी यांनी माहिती दडविण्यासाठी रु.३२,५६६/- इतक्या शुल्काची मागणी केली, जी अन्यायकारक आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पत्रासोबत विवरणपत्र जोडले नाही, त्यामुळे भ्रष्टाचार दडविण्यासाठी व माहिती उघड करण्यास टाळाटाळ करण्याचा हा एक प्रकार असल्याचे त्यांना वाटते त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई होऊन, फी कमी करुन अपिलार्थीस जनहितार्थ माहिती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत भाळवणी मंडळ व टाकळी ढोकेश्वर मंडळाअंतर्गत शेततळे, राष्ट्रीय कामासाठी धान्य कार्यक्रम, सी.सी.टी. कामाच्या अंतीम हजेरी पुस्तकाच्या शेवटच्या तीन मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती, तसेच कार्यारंभ आदेश व तालुका कृषि अधिकारी, पारनेर यांनी कामाच्या केलेल्या तपासणी अहवालाच्या प्रती, अशी सन २००४, २००५ व २००६ या तीन वर्षाशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी माहितीसाठीचे शुल्क रु.३२,५६६/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. मात्र अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.८,१०.९, व ३०.९.२००८ रोजी अशा तीन वेळा सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस उपस्थित राहण्याचे पत्र अपिलार्थीस दि. २५.८,०१.०९ व १५.९.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले. मात्र यापैकी एकाही सुनावणीस अपिलार्थी हे हजर न राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३०.९.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्याने माहिती देता आली नाही हा मुद्दा, ग्राहय धरुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणाऱ्या शुल्काचा भरणा न केल्याने ते

अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, असा युक्तिवाद केला. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्यासाठी अपिलार्थीस एकूण ३ वेळा पुरेशी संधी देण्यात येऊनही अपिलार्थी हे सुनावणीस एकदाही उपस्थित राहिले नाहीत, असा युक्तिवाद केला. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व्यापक व व्याप्ती मोठया प्रमाणात होती. अपिलार्थीने ज्या कामाच्या शेवटच्या मस्टर्सची माहिती मागितली आहे, अशी कामे एकूण १८८ असून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना प्रत्येकी १६ पृष्ठांच्या १०१३ इतक्या मस्टर्सच्या झेरॉक्सप्रती काढून पुरवाव्या लागणार होत्या, हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून १०१३x१६ अशी एकूण १६२०८ इतक्या पृष्ठांची माहिती द्यावी लागणार होती. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी काही शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०८.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळवून या पत्रामध्ये त्यांनी शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळवून अधिनियमातील कलम ७(३)(क) ची देखील पूर्तता केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी आकारलेले शुल्क हे सर्वसाधारणपणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीशी सुसंगत आहे, असे आयोगास वाटते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे नमूद केले आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. ३०.८, १०.९ व ३०.९ रोजी लिखित सूचना अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दिल्या होत्या. ही पत्रे जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे दि. २८.८,१.९ व

१५.९.२००८ रोजी अपिलार्थीस पाठविली आहेत. अशातऱ्हेने अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी पुरेशा कालावधीपूर्वी त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणी संदर्भात सूचना दिल्या होत्या, असे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जातील त्यांचे म्हणणे अग्राहय आहे. अपिलार्थीस या टप्प्यावर आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांना अद्यापही या हजेरीपत्रकांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर त्यांनी या माहितीशी संबंधित अभिलेख्यांच्या तपासणीची मागणी, माहिती अधिकार अधिनियमातीतील तरतुदीअंतर्गत एका वेगळया अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावी, म्हणजे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहता येईल व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून घेता येतील.अन्यथा आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन ते संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊ शकतील.

या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या आयोगाकडील अपील अर्जाच्या संदर्भात सुनावणीमध्ये उघड झालेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे आढळून येत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर आनंदा रोहोकले,मु.पो.भाळवणी,ता.पारनेर,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,पारनेर,जि.अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६४
निर्णय दिनांक २०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.सुरेश विठ्ठल संत,<br>रा.रासनेनगर,सावेडी,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नगररचनाकार,<br>महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त,<br>महानगरपालिका,अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द केले असून या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नसल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"सोबतच्या नकाशाप्रतीप्रमाणे T.P.S. IV F.P.120 पासून - सीना नदीपर्यंतच्या नाल्याचे नियोजनाची प्रमाणित प्रत. आयुक्त आदेश १०९०/१७.०७.२००६"

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे वस्तुस्थिती कळविली.

"आपण प्रकरणासोबत जोडलेल्या नकाशामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी नाल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे नकाशात दर्शविलेल्या भागाची मोजणी करण्यात आलेली आहे. त्या पुढील सीना नदी पर्यंतच्या नाल्याचे नियोजनाची प्रमाणीत प्रत या कार्यालयामध्ये उपलब्ध नाही.

उपरोक्त पत्रा बाबत आपली काही तक्रार असल्यास आपण ३० दिवसाच्या आत माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य) अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडे अपील दाखल करावे."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०२.०७.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन, अतिक्रमण प्रमुख,श्री. सुरेश इथापे व श्री. बल्लाळ यांना प्रत्यक्ष कामाची पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन त्यांच्याकडे अहवाल सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर करुन त्यांना ज्या नाल्याच्या नियोजनासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या नाल्याच्या नियोजनावर, त्यांचे आक्षेप त्यांनी या युक्तिवादामध्ये नोंदविले आहेत. या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथत अपील अर्जावर निर्णय देताना नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना पाहणी करुन अहवाल देण्याचे

सूचित केले होते, त्यावर अद्याप कोणतीही कृती झालेली नाही. नगररचना विभागाकडून सातत्याने दिरंगाई, टाळाटाळ व अडवणूक केली जात आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये संदर्भित नाल्यासंदर्भात अनेक तांत्रिक मुद्दे उपस्थित केले आहेत. अपिलार्थीने यामध्ये असे नमूद केले आहे की. प्रत्यक्षात टी.पी.स्कीम नं. ४ ते फा.प्लॉ.नं. ११४,११८,११९ चे मोजणी नकाशात नाल्याचा भाग दाखविलेला आहे, मात्र मंजूर रेखांकनात नाल्याचा भाग दाखविला नाही. या नाल्याच्या उगमाजवळ नाल्याची रुंदी १५ फूट दाखविली असून पुढे हा नाला फक्त २ फूट इतकाच रुंद दाखविला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे त्यांच्याकडे टी.पी.स्कीम नं. ४ अंतिम भूखंड क्र. १२० पासून सीना नदीकडे नाल्याचे नियोजन त्यांनी केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या नकाशाच्या प्रतीवर माहिती मागितली आहे.जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने ज्या नाल्याचा संदर्भ त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये दिला आहे.त्या नाल्याचे नियोजन त्यांनी अद्यापपावेतो केले नाही. मात्र त्यांनी नाल्याच्या काही लांबीपर्यंत सर्वेक्षण करुन नाल्याचा नकाशा तयार करुन ठेवला आहे. जरी प्रत्यक्षात हा नाला अस्तित्त्वात असला तरी अहमदनगर शहर विकास आराखडा योजनेच्या प्लानमध्ये तो दाखविलेला नाही.

अपिलार्थी यांना या टप्प्यावर आयोगातर्फे असे सूचविण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांनी अपिलार्थीस देण्यासंदर्भात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये काही विसंगती आढळल्यास अपिलार्थी हे संचालक,

नगररचना/आयुक्त, महानगरपालिका/संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्याकडे त्यांच्या गाऱ्हाण्याची दाद मागू शकतात. मात्र माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच देय होऊ शकते. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या नाल्याचा संदर्भ दिला आहे, त्या नाल्याच्या नियोजनासंदर्भात त्यांच्याकडे जे सर्वेक्षण झाले आहे व यासंदर्भात त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, ती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी वेळोवेळी त्यांच्याकडे नोंदविलेल्या आक्षेपांची त्यांनी पुरेशा गांभीर्याने दखल घेऊन, या नाल्याचे प्रत्यक्ष वस्तुस्थितीवर आधारीत सर्वेक्षण एका निश्चित कालावधीमध्ये करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सुरेश विठ्ठल संत,बहार कॉटेज,रासनेनगर,सावेडी,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६५
निर्णय दिनांक  २०-०४-२००९

१ श्री.सिताराम कारभारी काकडे, : अपिलार्थी
रा. आव्हाणे खूर्द, ता.शेवगाव,
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, आव्हाणे खूर्द ता.शेवगाव
जि. अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, शेवगाव जि.अहमदनगर.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती,शेवगाव,जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना आवश्यक ती माहिती न पुरविल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- मौ. आव्हाणे खूर्द या गावातील नळ पाणी पुरवठा सुरु

झाल्यापासून एकूण नळ कनेक्शन तारीखवार घेतलेले डिपॉझीट, कोणत्या खात्यावर शिल्लक या कागदपत्रांची नक्कल, दि. ०१.०९.२००५ ते १३.०५.२००८ मधील दारिद्रयरेषेची यादी, याच कालावधीत दारिद्ररेषेखाली एकूण वाटप झालेल्या घरकुलांच्या सर्व कागदपत्रांच्या नकला, दि. १.९.२००५ ते १३.५.२००८ पर्यंत झालेल्या मासिक मिटींग, सर्व ग्रामसभा व असाधारण सभा,इतर सभा यांच्या अजेंडयाच्या व ठरावाच्या नकला, स्टँड पोस्टची संख्या व जनरल यादी. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००८ रोजी आदेश देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ०७.०७.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करुन आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त संबंधित नळधारकांची यादी दिलेली आहे. मात्र उर्वरित माहितीचा त्यामध्ये समावेश नाही. जन माहिती अधिकारी यांना दि. ०१.०९.२००५ ते १३.५.२००८ या कालावधीतील दारिद्रयरेषेखालील यादी मागणी केली असता, त्यांनी १९९७-१९९८ या सालातील दारिद्रयरेषेखालील यादी दिली. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.३ व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली. अपिलार्थीस त्यांनी अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या कालावधीमध्ये ते आजारी असल्यामुळे ही माहिती तयार करुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शेवगाव यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवली होती व तदनंतर ते रजेवर गेले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयेगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ मधील, "सर्व कागदपत्रांच्या नकला" हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर घेतलेले आक्षेप हे बरोबर असल्याचे आयोगास आढळून आले आहे. मूळात या प्रकरणी मौ. आव्हाणे खूर्द या गावातील ग्रामसेवकाने कुठलेही रजिस्टर/अभिलेखे अद्ययावत ठेवलेले नाही, असेही या प्रकरणी आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र.२ व ३ द्वारे त्यांनी विचारलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता, असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेले कारण आयोगास मान्य नाही. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन, स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित ग्रामसेवक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असेही सूचित करण्यात येते की, मौ. आव्हाणे खू. ता. शेवगाव येथे त्या गावाची पाणीपुरवठा योजना सुरु झाल्यापासून जे ग्रामसेवक कार्यरत होते, त्या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, कारण त्यांनी देखील या प्रकरणी कोणतेही अभिलेखे व्यवस्थित न ठेवून आपले कर्तव्य वेळेवर व योग्य त्याप्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळले आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली, त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्र. २ मधील अंशतः भाग वगळता) हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २०-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सिताराम कारभारी काकडे,रा. आव्हाणे खूर्द, ता.शेवगाव,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, आव्हाणे खूर्द ता.शेवगाव जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, शेवगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६६
निर्णय दिनांक २०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख हनिफ शकुर,<br>रा.शेवगाव, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>मदरसा रियाजूल उलुम,<br>शेवगाव, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>अहमदनगर विभाग,अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ११.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. शेख जफ्फार बालम यांच्यातर्फे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २०.०४.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांना संबंधित संस्थेच्या विश्वस्तांनी सर्व माहिती दाखविली असल्याने त्यांचे सर्व गैरसमज दूर झाले आहेत व ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थी हे विचाराधीन अपील मागे घेत असल्याने, अपील क्र.२६६/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२६६/०८, दि.१५.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख हनिफ शकुर(पत्रकार),नाईकवाडी मोहल्ला,शेवगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मदरसा रियाजूल उलुम,रजि.नं.३८७ एफ-३५०, द्वारा जामा मशीद,शेवगाव, जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६७
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ सौ. अलकाताई योसेफ बनसोडे, : अपिलार्थी
रा.साकुरी ता.राहाता,
जि. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
परिमंडळ, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संचलन व सुव्यवस्था मंडळ,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
'परिमंडळ' कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,नाशिक झोन, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : मुख्य अभियंता,
'परिमंडळ' कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,नाशिक झोन, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व कार्यकारी अभियंता, मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या., अहमदनगर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे दिनांक नसलेले, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो पुरविलेली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही. या अर्जात त्यांनी आयोगास पुढे अशी विनंती केली आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे माहिती न दिल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० खाली शास्ती लावण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमत: त्यांच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांनी दि. ०२.०२.२००५ रोजी वीज चोरी पकडण्यासाठी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या खात्याने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल," ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातर्फे दि.१६.०४.२००९ रोजी,ठीक १२.५०वा.त्यांच्या कार्यालयातील श्री.बोडखे अ.अ. यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे संदेश देऊनही सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या म्हणण्याचा पुनरुच्चार केला. उपस्थित अधिकारी श्री. जितेंद्र रघुनाथ काळे, कार्यकारी अभियंता,सर्कल ऑफीस यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मुख्य अभियंता कार्यालयाशी संबंधित असल्याने ही माहिती मुख्य अभियंता, यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व त्यावरील प्रथम अपील अर्जाची महामंडळातील कर्मचारी/अधिकारी यांनी हेतुपूर्वक उपेक्षा केल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व व्याप्ती मर्यादित असताना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. एवढेच नव्हेतर नाशिक येथील माहिती अधिकारी यांनी दि. २१.१.२००८ रोजी अधीक्षक अभियंता, अहमदनगर यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाठविला असताना देखील त्यांच्या प्रतिनिधीने वरील परिच्छेदात नमूद केलेला युक्तिवाद केला, जो आयोगास पूर्णतः अमान्य आहे. या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०१.२००८ रोजी केलेल्या मूळ अर्जातील संदर्भित केलेल्या दि.०२.०२.२००५ रोजीच्या अर्जावर सर्व सबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे या प्रकरणी आवश्यक होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता म.रा.वि.वि.कं.म.अहमदनगर व नाशिक कार्यालयाने एकमेकांकडे आपली जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न याप्रकरणी केल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस आता अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती देय होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदींप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगाने पूर्वसूचना देऊनही अनुपस्थित राहिले. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस देय माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जर सुनावणी घेतली असती तर कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करण्याची आवश्यकता वाटली नसती. या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा बेपर्वा वर्तनाची व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मुंबई यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. अलकाताई योसेफ बनसोडे,रा.साकुरी ता.राहाता,जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,परिमंडळ कार्यालय,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,नाशिक झोन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,परिमंडळ कार्यालय,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नाशिक झोन,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, ,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६८
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री.महेश दादासाहेब गोडसे, : अपिलार्थी
रा. संगमनेर,
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प अधिकारी,
पोस्ट बेसिक आश्रमशाळा,
केळीकोतुळ ता.अकोले,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०९.२००८ रोजी नोंदविलेले त्यांचे द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने केले आहे. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,आश्रमशाळेच्या बांधकामासंदर्भात, बांधकाम सुरु झाल्यापासून ते अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करेपर्यंतच्या कालावधीतील या बांधकामाशी संबंधित काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.३५/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.६.२००८ रोजी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला. तदनंतर दि. २६.६.२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही मुद्यांवरील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या मुद्यांवरील माहितीही अपिलार्थीस न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर बरेच आक्षेप घेतले असून सदरचे आक्षेप त्यांच्या अभिप्रायाद्वारे त्यांनी या अपील अर्जामध्ये समाविष्ट केले आहेत.अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी का वाटते याचे विवेचन यामध्ये केले आहे. यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,बांधकाम शाळा इमारत बांधकाम नियमावलीप्रमाणे झाल्याचे दिसून येत नाही, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये लेआऊट दिलेले नाही. संबंधित प्लॅनवर आर्किटेक्ट अथवा इंजीनिअर यांची सही व शिक्का नाही,

सदर प्लॅनवरुन हा प्लॅन केळीकोतूळ आश्रमशाळेचाच असल्याचा बोध होत नाही, नकाशा मंजूर होणे गरजेचे असल्याने नकाशा मंजूर झाल्याचे दिसून येत नाही व त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ३,५,६ व ७ बाबत त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संगमनेर आय.टी.आय.कडे उपलब्ध असल्याचे आयोगास अवगत केले. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती.अशावेळी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे त्या अर्जाची प्रत पाठवून या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नसल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीद्वारे अपेक्षित कार्यवाही न केल्याने या प्रकरणी माहिती देण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व आता जन माहिती अधिकारी यांच्यावर येऊन पडते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,५,६ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम कार्यवाही केली ती म्हणजे,दि. ०४.०९.२००८ रोजी त्यांना प्राचार्य,संगमनेर आय.टी.आय. यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर केली गेली असल्याने ती पूर्णत: अवैध ठरते व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होते. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,५,६ व ७ शी संबंधित

संपूर्ण माहिती व मुद्दा क्र.४ मधील उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरावावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या त्यांच्या पत्रव्यवहाराच्या कागदपत्रांवरुन त्यांचे या संदर्भात प्राप्त माहितीने कधीही समाधान झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी प्रत्यक्षतः ज्या बांधकामाविषयी माहिती मागविली आहे, त्या बांधकामाविषयी सर्व अभिलेखे तपासणीकरिता, जन माहिती अधिकारी व प्राचार्य, संगमनेर औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याकडे स्वतंत्र अर्जाद्वारे मागणी करावी, जेणेकरुन त्यांच्या सर्व शंकांचे समाधान होऊ शकेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत योग्य ती कार्यवाही न केल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून,त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ मधील उर्वरित माहितीसह मुद्दा क्र. ३,५,६ व ७ शी संबंधित माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवावी.
3. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.महेश दादासाहेब गोडसे, द्वारा- श्री. वदक रमेश,'सप्तगंगा' बंगला, श्रमपरिहार हौसिंग सोसायटी, मालदाड रोड, संगमनेर,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,पोस्ट बेसिक आश्रमशाळा,कोळीकोतूळ ता.अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२६९
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री. योसेफ बळवंत बनसोडे, : अपिलार्थी
रा.साकुरी ता.राहाता,
जि. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,भरारी पथक,अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संचलन व सुव्यवस्था मंडळ,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविले नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील चालविले नाही व यासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे त्यांना विनामूल्य माहिती

देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील भरारी पथकाने दि. ८.१०.२००७ रोजी मौ. साकुरी येथील मिटर क्र. आर-७१७ ची केलेली तपासणी या विषयावर एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक अभियंता, राहाता यांच्या कार्यालयातून सशुल्क घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम निर्णय घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन,तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.
2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०९.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. योसेफ बळवंत बनसोडे,रा.साकुरी ता.राहाता,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,भरारी पथक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,संचलन व सुव्यवस्था मंडळ,अहमदनगर यांना अपिलार्थी यांच्या दि. ०९.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७०
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री. प्रविण गोविंद जोशी, : अपिलार्थी
रा. केडगाव,अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
महानगरपालिका,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
महानगरपालिका, अहमदनगर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : आस्थापना विभाग प्रमुख,
महानगरपालिका, अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त,
महानगरपालिका, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,मनपा आस्थापनेवरील केडर नं.३ च्या सहायक ग्रंथपाल या पदाबाबत सन १९९०-२००७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"सहायक ग्रंथपाल हे पद कोणत्या तारखेपासून व कोणत्या निकषावर टेक्निकल ठरविले,त्याची प्रत, सदर पदाची वेतन श्रेणी वाढविणे कामी कोणी मागणी केली आहे का? स्टाफींग पॅटर्न तयार करताना सदर मागणी वरिष्ठांच्या निदर्शनास आणली का? आणली असल्यास त्याची प्रत व सदर बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणली नसेल तर  का आणली नाही, बुक बँक कॅशिअर हे पद ग्रंथालयाचेच आहे का?, वरील दोन्ही पदे केडर नं.३ ची असल्याने वेतनश्रेणीत फरक का आहे?स्टाफींग पॅटर्न तयार करताना याबाबत आपण सदर बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणली का? त्याची प्रत ? हे पद तांत्रिक करताना संबंधित कर्मचाऱ्यास लेखी कळविले होते काय?."

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.११.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.११.२००७ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, शासनाच्या नगर विकास खात्याने त्यांच्या दि. २९.८.१९८१ च्या निर्णयामध्ये अतांत्रिक स्वरुपाची पदे निश्चित केली आहेत, त्यामध्ये सहायक ग्रंथपाल हे पद नमूद केलेले नसल्याने त्यांनी सदरचे पद तांत्रिक असल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीस त्याप्रमाणे दि. ११.०९.२००७ रोजी कळविले. यावर आयोगाने, केवळ नगर विकास खात्याच्या दि. २९.८.१९८१ च्या निर्णयामध्ये एखादे पद अतांत्रिक स्वरुपाचे म्हणून दाखविले गेले नसल्यास त्या पदाला तांत्रिक पद म्हणून समजता येणार नाही, त्यामुळे या प्रकरणात

महानगरपालिकेने शासनाकडे वेगळयाने व विशिष्ट प्रकरणनिहाय संदर्भ केल्यास अपिलार्थीस अचूक माहिती मिळू  शकेल, असे जन माहिती अधिकारी यांना सूचविले, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, याप्रकरणी त्यांनी यापूर्वीच कार्यवाही केली असून, यासंदर्भात शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाले असून सहायक ग्रंथपाल हे पद अतांत्रिक स्वरुपाचे असल्याचा खुलासा शासनाने त्यांना केला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, शासनाच्या या पत्राची प्रत, ज्यामध्ये सहायक ग्रंथपाल हे पद अतांत्रिक स्वरुपाचे असल्याचे शासनाने खुलासा केला आहे, त्यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांचे अवलोकन करता अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण मागणारी माहिती अपेक्षित केली आहे. अशाप्रकारे अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबत कारणे अथवा खुलासा मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्याप्रमाणे खुलासा अथवा स्पष्टीकरणे देणे अशी प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नाही. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्र. १ च्या संदर्भात वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आदेश दिले आहेत, हे पाहता, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रविण गोविंद जोशी,७८बी.,७/१,जपेनगर,भूषणनगर, केडगाव, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा आस्थापना विभाग प्रमुख,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७१
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
रा.वरखेड ता.शेवगाव जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, ताजनापूर जल उपसा सिंचन योजना, मध्यम प्रकल्प उपविभाग,पाटबंधारे खाते ता.शेवगाव,जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, अहमदनगर मध्यम प्रकल्प विभाग,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत व त्यांना ताजनापूर जलसिंचन योजनेबाबतच्या खर्चाबाबतची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ताजनापूर जल उपसा सिंचन योजनेसंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -उपसा सिंचन योजनेच्या

लाभक्षेत्रातील गावांचे गाववार क्षेत्र, शासनाने योजनेसाठी मंजूर केलेला निधी, झालेला खर्च, कामाचे नाव, कामाचे स्वरुप,त्याची बीले, कामाचे वर्णन, मंजूर झालेल्या व चालू असलेल्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांच्या नकला, प्रत्यक्षात झालेला खर्च, मोजमाप नोंदवहीच्या व अंतिम बिलाच्या कामनिहाय सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१९.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी,मोजमाप पुस्तिकेच्या माहितीशिवाय सर्व माहिती अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निणय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १९.०६.२००८ रोजी आवश्यक ती माहिती मिळाली आहे. तथापि ती माहिती अपूर्ण असून या माहितीमध्ये संबंधित मोजमाप नोंदवहीच्या अंतिम बिलांच्या प्रतींचा समावेश नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या कामांची माहिती विचारली आहे, त्या कामाचे अंतिम बीलाचे भुगतान अद्यापपावेतो अदा केले नसल्याने अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती त्यांच्याकडून दिली गेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, विशेषत: अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस

त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मोजमाप पुस्तिकेच्या प्रती दिलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अद्यापपावेतो अंतिम बील अदा केलेले नसल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नाही हा मुद्दा, आयोग मान्य करीत असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या सर्व प्रती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २०.८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल न घेऊन अपिलार्थीच्या अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा केली आहे आणि अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीचा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्य दखल घेण्याचे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती (मोजमाप पुस्तिकेच्या प्रती) अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २०-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ,रा.वरखेड पो.हसनापूर, ता.शेवगाव, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ताजनापूर जल उपसा सिंचन योजना, मध्यम प्रकल्प उपविभाग,पाटबंधारे खाते ता.शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, अहमदनगर मध्यम प्रकल्प,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७२
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
रा. वरखेड ता.शेवगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाज कल्याण अधिकारी,नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही व यासंदर्भात त्यांना कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, समाजकल्याण विभागामार्फत स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांची सन २००२-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती असलेली 'माहिती पुस्तिका' उपलब्ध करुन दिली, मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.९.२००८ रोजी प्रथम अपील केले असता यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. अशाप्रकारे आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहावे लागल्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, अशा स्वरुपाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसते. कारण स्वयंसेवी संस्थांना केंद्र शासनातर्फे सरळ अनुदान प्राप्त होत असते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते.सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन, आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.
2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.११.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, मु.वरखेड,पो.हसनापूर, ता.शेवगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,हडको,नालेगाव,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिक रोड,नाशिक यांना अपिलार्थीच्या दि.११.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७३
निर्णय दिनांक २०-०४-२००९

१ श्री. हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा, : अपिलार्थी
रा. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शहर अभियंता,
महानगरपालिका,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
महानगरपालिका, अहमदनगर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपशहर अभियंता,
महानगरपालिका,अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ०३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व त्या प्रमाणेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता,त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, रस्त्याच्या बांधकामाविषयी व दुरुस्तीविषयी एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ही माहिती संकलीत करण्यासाठी एक क्लार्क व एक शिपाई यांची स्वतंत्र नेमणूक १५ दिवसांकरिता करावी लागत असल्यामुळे याकरिता महानगरपालिकेकडे रु.५०००/- भरण्याकरिता अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि. ०३.०१.२००८ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आज सुनावणीपूर्वी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाल्याचे सांगितले तथापि या माहितीचा त्यांना अद्याप अभ्यास करावयाचा आहे, असे आयोगास पुढे अवगत केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी सदरचा प्रतिसाद चुकीचा असून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता

त्यांना लागणाऱ्या मनुष्यबळाची किंमत समाविष्ट केली आहे. येथे असे नमूद करण्यात येते की, राज्य शासन,सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.आर.टी.आय.२००५/सी.आर.३१५/०५/ ५,दिनांक ११.१०.२००५ नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना शुल्क आकारण्यासंदर्भात कार्यवाही करणे त्यांना अनिवार्य आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा प्रतिसाद दिला असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती देखील विनामूल्य प्राप्त झाली आहे. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

1. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा,रा. १२/२१,आनंद कॉम्प्लेक्स, सावेडीनाका,अहमदनगर-४१४ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७४
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. संतोष देवराम नेटके, : अपिलार्थी
रा. बुऱ्हाणनगर,अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कामगार आयुक्त कार्यालय,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता,जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमत: त्यांच्या दि. ०९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून- जी.के.एन.सिंटर मेटल्स लि. सी-१८, एमआयडीसी अहमदनगर या

कंपनीच्या कामगार आस्थापना विभागातील भविष्य निर्वाह निधीसंदर्भात, दि. ०१.०६.२००५ ते दि. ०१.०६.२००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय दिला नसल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातर्फे दि. ०९.०४.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राद्वारे तसेच दूरध्वनीद्वारे दि. १६.०४.२००९ रोजी ठीक ०४.०० वाजता त्यांच्या कार्यालयातील श्री. कुंभारे,सहायक कामगार आयुक्त यांच्यामार्फत सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत सूचित करुनही संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत, सुनावणी घेऊन आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.
2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष देवराम नेटके,रा. बुऱ्हाणनगर,गुगळे कॉलनी,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, कामगार आयुक्त कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर यांना अपिलार्थी यांच्या दि. १८.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७५
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. श्रीराम बाबूराव पिसाळ, : अपिलार्थी
रा.अयोध्यानगरी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक भूमी अभिलेख,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक भूमी अभिलेख,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाद्वारे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ८ दिवसांच्या आत माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यास दंड न केल्याने ते पुन्हा अपिलार्थीस त्रास देण्याचा संभव आहे. त्यांना आवश्यक असलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही आणि संबंधितांनी माहितीच्या अधिकाराचा

विपर्यास केला असल्यामुळे, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १२.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, सचिव व विशेष कार्य अधिकारी (अपिले) महसूल व वन विभाग यांचे कार्यालय,मुंबई यांनी निर्देशित केलेला निकाल दि. २८.०५.२००३ क्र.एकत्रि.४१००/२४/व्ही.आय.पी./प्र.क्र.१७८/ल१/प्र.क्र.१३६/२००२/अ व पू., अन्वये जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या दि. ३१.०५.२००३ च्या निकालासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे- "वरील क्रमांकाची केस आपल्याकडे पुनरिक्षणासाठी पाठविली आहे काय? त्याबाबत आपल्याकडून पुनरिक्षन झाले आहे काय? नसल्यास त्यामागे काय कारणे आहेत? महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून निकाल होऊन ४ वर्ष होत आली आहेत त्याच्या अंमलबजावणीला विलंब का झाला ? या विलंबाला जबाबदार कोण ? व दप्तर दिरंगाईचा नियम आपणास लागू आहे काय ?" अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाने मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निश्चित कोणत्या प्रकरणाशी संबंधित माहिती हवी आहे, त्या प्रकरणाचा संदर्भ मागितला, तथापि त्यासंदर्भातील कोणताही तपशील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने न कळविल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज दि. ०५.०४.२००७ रोजी निकाली काढून अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ

दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये कोणताही संदर्भ नमूद न केल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस, त्यांना ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती हवी आहे त्या प्रकरणाचा क्रमांक व इतर तपशील मागितला, तथापि अपिलार्थीने सदर तपशील उपलब्ध करुन न दिल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी आपल्या कार्यालयाच्या कामकाजाची कार्यपध्दती स्पष्ट करताना असे अवगत केले की, सचिव व विशेष कार्य(अपिले) महसूल व वन विभाग यांच्याकडून निर्णय झालेली प्रकरणे सरळ संबंधित अधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालयास प्राप्त होत असतात. त्यामुळे या प्रकरणातील कागदपत्रे उपसंचालक कार्यालयाकडे त्यावेळी उपलब्ध नव्हती, आता उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालयास, अधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालय,बीड यांनी हे प्रकरण त्यांच्याकडील दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविले असून उपसंचालक कार्यालयास ते दि. २०.०२.२००८ रोजी प्राप्त झाले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, त्यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १२.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. 'अ'  मधील अंशतः भाग वगळता उर्वरित मुद्यांवरील कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने मुद्दा क्र. 'अ' मधील अंशतः भाग वगळता उर्वरित मुद्यांद्वारे खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत

अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास देणे या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे, त्यांचा खुलासा अथवा स्पष्टीकरण विचारणे व ते जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाही. हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'अ' मधील अंशतः भाग वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने या संदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. 'अ' वरील "संदर्भिय क्रमांकाची केस जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुनर्विलोकनासाठी पाठविल्याचा 'दिनांक'," ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

सदर प्रकरण आता उपसंचालक,भूमी अभिलेख यांच्याकडे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बीड यांच्याकडून त्यांच्या दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दि. २०.०२.२००८ रोजी प्राप्त झाले आहे. या पत्राची प्रत त्यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा 'अ' च्या संदर्भात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांचा दि. १२.०२.२००८ रोजीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर त्यांना अधीक्षक भूमी अभिलेख, बीड यांच्या कार्यालयाकडून हे प्रकरण दि. २०.२.२००८ रोजी प्राप्त झाले असताना त्यांनी या प्रकरणी आजतागायत अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यपध्दतीतून त्यांनी दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर यथायोग्य

शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली, मुद्दा 'अ' च्या संदर्भातील,वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
3. उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीराम बाबूराव पिसाळ,३६-अ, शिवम, अयोध्यानगरी,श्रीराम चौक,वसंत टेकडी, अहमदनगर - ४१४ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७६
निर्णय दिनांक २१-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवाजी गणपत दरंदले,<br>रा.सोनई ता.नेवासा, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक, श्रेणी-१,नेवासा,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१,<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०५.२००८ रोजी फेर दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील दाखल केले असता, त्यांनी कायदेशीर व सनदशीर मार्गाने अपिलाची सुनावणी न करता, दिशाभूल करुन सुनावणीच्या तारखा देऊनही तारखेच्या वेळी हेतुपूरस्सर जाब-जबाब न घेता तसेच जाब देणाऱ्यांच्या सादर केलेल्या लेखी म्हणण्याची प्रत न देता व जाणूनबुजून लेखी म्हणणे सादर करण्याची संधी न देऊन,माहिती अधिकाऱ्यास पाठीशी घालून त्यांचे अपील जाणीवपूर्वक निकाली काढले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केलेले आहे.

अपिलार्थीस त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर मांडण्यास पूर्ण संधी देण्याचे हेतूने अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ०७.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पुनश्च् सुनावणी घेणे, आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.
2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०७.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी गणपत दरंदले, मु.पो.सोनई,ता.नेवासा,जि.अहमदनगर-४१४१०५.

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि.०७.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. सलमान अर्मेचरवाला तथा शेख सलमान अहमद, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, बांधकाम विभाग, महानगरपालिका, अहमदनगर : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी महानगरपालिका, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, महानगरपालिका, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०६.१०.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २१.०४.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील, त्यांना पूर्ण माहिती प्राप्त झाल्याने, रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थी, त्यांचे विचाराधीन अपील आयोगास सादर केलेल्या पत्राद्वारे मागे घेत असल्याने त्यांचे आज रोजी विचाराधीन असलेले अपील क्र.२७७/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

1. अपील क्रमांक २७७/०८, दि. ०८.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सलमान अर्मेचरवाला तथा शेख सलमान अहमद फलटण पोलीस चौकीमागे,आहेर गवळी वाडा, कोठला रोड,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७८/०८, २७९/०८ व २८०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८,२७९ व २८०
निर्णय दिनांक २१-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक लक्ष्मण लव्हाटे,<br>रा. लोणी खूर्द,ता.राहाता, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,राहुरी,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>श्रीरामपूर, जि.अहमदनगर | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | मंडळ कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,राहुरी,<br>जि.अहमदनगर |
| जन अपिलीय अधिकारी : | तालुका कृषि अधिकारी,राहुरी,<br>जि.अहमदनगर |

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी उपविभागीय कृषि अधिकारी, श्रीरामपूर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणांमध्ये अपिलार्थी यांची राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१०.२००८ रोजी नोंदविलेली एकूण तीन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी व चुकीची माहिती

प्राप्त झाल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याचे नमूद केले आहे.त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या तीनही मूळ अर्जांद्वारे केलेल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपील क्र. २७८/०८ या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६-०७ या कालावधीशी संबंधित - "MWSIP अंतर्गत तुषार संचासाठी अनुदान दिलेल्या शेतकऱ्यांची यादी तसेच या शेतकऱ्यांना इतर योजनेतून तुषार संचासाठी लाभ दिला काय ? असल्यास रक्कम" - ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने अपील क्र. २७९/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीशी संबंधित,-" एनएचएम व एमएचबी अंतर्गत ठिंबक व फळ लागवड, शेततळे,पॅकींग हाऊस, शेड नेट अनुदान घेतलेल्या शेतकऱ्यांची यादी" ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने अपील क्र. २८०/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, "MWSIP अंतर्गत चारा पिके प्रात्यक्षिक दिलेल्या शेतकऱ्यांची नावे, क्षेत्र, गाव व एकूण राहुरी तालुक्यातील खर्च व अनुदान", ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या माहितीसाठींच्या अर्जांस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०८.२००८, २५.०७.२००८ व २१.०७.२००८ रोजींच्या पत्रांद्वारे प्रथम प्रतिसाद दिला, तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपरोक्त तीनही प्रकरणी दि. २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी सदर तीनही अपिले उपविभागीय कृषि अधिकारी, श्रीरामपूर यांना उद्देशून केली होती. तथापि या प्रकरणी तालुका कृषि अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी

असल्याने उपविभागीय कृषि अधिकारी, श्रीरामपूर यांनी तालुका कृषि अधिकारी राहूरी यांना अपिलार्थीची ही तीनही अपिले त्यांच्या दि. १५.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविली.

आज रोजी सुनावणीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.०९.०४.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि. १६.०४.२००९ रोजी ठीक ०४.१५ वा जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. गायकवाड यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे उपस्थित राहण्याच्या सूचना देऊनही, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या प्रतिसादाद्वारे नेमकी कोणती माहिती अपिलार्थीस पाठविली गेली, हे आयोगास जन माहिती /अपिलीय अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयातील त्यांचा कोणताही प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे, समजण्यास मार्ग नाही.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २०.०८.२००८ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांवर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटत असल्याने, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी या तीनही अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंधरा दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयांनी अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील क्र. २७८/०८, २७९/०८ व २८०/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २०.०८.२००८ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंधरा दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक लक्ष्मण लव्हाटे, श्री. स्वामी समर्थ एरिगेटर्स, एन.पी. आहेर कॉम्प्लेक्स,बाभळेश्वर रोड,लोणी खूर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,राहुरी जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,राहुरी जि.अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि. २०.०८.२००८ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांच्या प्रतींसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८१
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. अभय रमाकांत निघोजकर, : अपिलार्थी
रा.माळीवाडा, अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा ग्रामीण रुग्णालय,अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा ग्रामीण रुग्णालय,अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : १. प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा ग्रामीण रुग्णालय, अहमदनगर
२. वैद्यकीय अधीक्षक,
ग्रामीण रुग्णालय, श्रीरामपूर,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्यात दिरंगाई केली व राजकीय दबावाखाली माहिती देण्यास प्रतिबंध होईल, असे वर्तन केले व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी असून ही माहिती त्यांना उशिराने दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाकरिता मिळालेल्या निधीबाबत सन २००१ पासून ते अर्ज करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये, - "श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाकरिता आजपर्यंत किती निधी मंजूर झालेला आहे, त्यापैकी प्रत्यक्षात आजपर्यंत किती रकमेचा निधी प्राप्त झालेला आहे. याची वर्षनिहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी, प्राप्त झालेल्या निधीचा वापर कोणकोणत्या कामासाठी व कोणत्या ठिकाणी करण्यात आलेला आहे, याची माहिती उपलब्ध करुन द्यावी व श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयासाठी प्राप्त झालेल्या निधीचा वापर श्रीरामपूर नगरपालिकेच्या दवाखान्यासाठी करण्यात आलेला आहे काय? असल्यास त्याची कारणे काय ?-" या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १२.०८.२००८ रोजी प्राप्त झाला होता. या अपील अर्जावर सुनावणी न झाल्याने व अपिलार्थीस या संदर्भात कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत, त्यामुळे व्यथित होऊन, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दि. १९.०७.२००८ रोजी पुरविलेली माहिती ही त्यांच्या पूर्वी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने पुरविली असून आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ११.०८.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित ग्रामीण रुग्णालयाकडे असणे गरजेचे आहे. हे रुग्णालय २००४ सालापासून स्थापन झाले असून यापूर्वी हे रुग्णालय श्रीरामपूर येथील नगरपालिकेच्या ताब्यात होते, असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अवगत करण्यात आले. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती, त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत ग्रामीण रुग्णालय,श्रीरामपूर येथील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे, सदरचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठवून देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. अपिलार्थीचा दि. ३१.१२.२००७ रोजीचा अर्ज, जो जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयात दि. ०३.०१.२००८ रोजी प्राप्त झाला त्यावर या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०७.२००८ रोजी म्हणजेच अंदाजे साडेपाच महिने इतक्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस जिल्हा शल्य

चिकीत्सक यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १९.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या कालावधीशी संबंधित नसून ती फक्त सन २००७-०८ पुरतीच मर्यादित असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही माहिती अपूर्ण असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील एकूण ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृती अथवा निर्णयाबाबतची कारणे, स्पष्टीकरणे वा खुलासे अपेक्षित करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांना मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती पुरविणे, अशाप्रकारची प्रक्रिया समाविष्ट नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित तीनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित सर्व मुद्यांची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीतील त्यांच्याकडील कॅशबुकची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्या मुदतीत प्राप्त होऊ शकेल, असे दिसून येते.

या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी म्हणून श्रीरामपूर तालुका ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक यांची नियुक्ती केली गेली असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास

सांगितले. या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, प्रत्यक्षात ही माहिती ज्या जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती, त्यांच्याकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील विहित कालावधीत पाठविला नाही, अपिलार्थीच्या दि. ०३.०१.२००८ रोजीच्या प्राप्त अर्जास विलंबाने प्रतिसाद दिला आहे, अपिलार्थीस जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, अशा सर्व प्रकारच्या, या प्रकरणी, घडलेल्या अनियमिततेमुळे जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जन माहिती अधिकारी आणि श्रीरामपूर ग्रामीण रुग्णालयातील अधीक्षक व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात येते, असे सर्वजण या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक, यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदार वर्तन स्पष्ट केले आहे,असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद संचालक (आरोग्य),म.रा.यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्र. ४ वगळता) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
3. सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभय रमाकांत निघोजकर,४८२८,माळीवाडा,विळदकर गल्ली,अहमदनगर जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा ग्रामीण रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,ग्रामीण रुग्णालय, श्रीरामपूर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा ग्रामीण

रुग्णालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. संचालक (आरोग्य), महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा, ५ वा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (सार्वजनिक आरोग्य),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८२
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. भाऊसाहेब रामचंद्र करंडे, : अपिलार्थी
अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भूमी अभिलेख,
नाशिक प्रदेश,नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी,
अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक माहिती मिळाली नाही, तसेच उपसंचालक भूमी अभिलेख, नाशिक, यांनी नगर भूमापन अधिकारी यांना प्रत्यक्ष आदेश देऊनही नगर भूमापन अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "देहरे ता.जि.अहमदनगर येथील सिटी सर्व्हे नंबर २०७ च्या क्षेत्राबाबत मा. विशेष जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख (न.भू.) अहमदनगर यांच्याकडील आदेश क्र. अपील/एन.आर/४०/८५ दि. १०.०९.१९८५ हे ज्यावर आधारीत आहेत, असे संपूर्ण चौकशी आणि मोजमापाची टिपणीसह कागदपत्रे" ही सन १९८४-८५ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर अधीक्षक, भूमी अभिलेख, अहमदनगर यांनी नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तदनंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विशेष प्रयत्न करुन माहिती देण्याचे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची त्यांना अद्यापही गरज असल्याचे आयोगास सांगितले. या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना त्यांनी असे सांगितले की, मौ.देहरे ता. जिल्हा अहमदनगर येथील गावठाण मोजणीच्या वेळी सी.टी.एस.२०७ या मिळकतीची नोंद चुकीची झाली असल्याने त्यातील त्यांचे वडील श्री. रामचंद्र यादव करंडे यांनी दि. १२.१२.१९८१ रोजी विशेष अधीक्षक, भूमी अभिलेख,पुणे विभाग यांच्या कोर्टात अपील क्र. १४५/८१ हे दाखल केले होते. सदर अपिलावर निर्णय होऊन त्यांचे अपील गुणवत्तेवर मंजूर करण्यात येऊन शीट क्र. ५ चा नं. २५ ची हद्द व संबंधित रेकॉर्ड दुरुस्त करण्याचे आदेश विशेष जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख यांनी दिले आहेत. या आदेशाप्रमाणे दुरुस्ती होण्यासाठी त्यांच्या वडिलांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे दि. १५.१२.२००६ रोजी व दि. ०२.०३.२००७ रोजी अर्ज करुनही या आदेशाप्रमाणे अद्यापपावेतो रेकॉर्डची (अभिलेख्यामध्ये)

दुरुस्ती झालेली नाही. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या वडिलांचे दु:खद निधन झाले असल्यामुळे सदर मिळकतीवर त्यांच्या नावाची नोंद करण्याच्या कामी त्यांना सदर माहितीची आवश्यकता आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या कागदपत्रांची माहिती मागितली आहे, ही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात आता उपलब्ध नाहीत. त्या कागदपत्रांचा बराच शोध घेऊनही ती कागदपत्रे त्यांना कार्यालयामध्ये सापडली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या मिळकतीसंदर्भात असल्यामुळे व ती शासकीय अभिलेख्यातील "अ"या प्रवर्गात मोडत असल्याने अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अनिवार्य आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाल्याने ही माहिती त्यांच्या कार्यालयात सध्या उपलब्ध नाही. अपिलार्थीस ज्या कारणाकरिता ही माहिती आवश्यक आहे, ते कारण पाहता व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्याकरिता या प्रकरणी काय करता येईल, असे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचे प्रकरण पुनर्विलोकनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कायदा कलम २५८ प्रमाणे पुनर्विलोकित करुन अपिलार्थीची विनंती त्यांना मान्य करता येणे शक्य आहे, त्यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अशाप्रकारची कार्यवाही तीस दिवसांच्या आत करण्याचे मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या या कार्यवाहीस अपिलार्थी यांनी सहमती दर्शविली, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब रामचंद्र करंडे,'श्री' निवास, देहरे, ता.जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८३
निर्णय दिनांक २१-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल,<br>रा.तोफखाना,अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप वनसंरक्षक<br>अहमदनगर | | |

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रोहयो), अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण साक्षांकित करुन प्राप्त झाली असून, काही दस्तऐवज नष्ट झालेले आहेत. या अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास कसूर व विलंब करुन दिशाभूल करणारी माहिती दिली असून त्यांना मिळालेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकित करुन मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे. जयश्री सॉ.मिल ॲण्ड टिंबर मार्ट संदर्भात सन १९८८ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु १४/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १५.७.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती दि. १६.७.२००८ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नसून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याने त्यांना आयोगाकडून समज देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती पुरविली असून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी मे. जयश्री सॉ मिल यांच्या हस्तांतरणासंदर्भात संपूर्ण नस्ती अपिलार्थीस दाखविण्यात आली असून या नस्तीमधील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः पुरविलेली माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामध्ये एकूण ६ मुद्यांवर माहिती मागविली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः फक्त ५ मुद्यांवरील माहिती दिली आहे. अपिलार्थीस मुद्दा क्र.६ शी संबंधित माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी देण्यात आली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुनही विहित मुदतीत अपूर्ण माहिती दिली असल्याने व अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला असल्याने अपिलार्थी हे संपूर्ण माहिती प्राप्त होण्यासाठी पात्र ठरत असताना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.१४/- त्यांना परत करावे लागेल. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सर्व मुद्यांवरील माहिती साक्षांकित करुन मागितली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना साक्षांकित स्वरुपात माहिती दिलेली नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात पुरविली गेलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत, साक्षांकित करुन द्यावी व अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.१४/- त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत साक्षांकित करुन द्यावी.
3. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.१४/-त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल,रा.तोफखाना,सिताराम सारडा विद्यालयाजवळ, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८४
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, : अपिलार्थी
रा.मुकुंदनगर, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,
अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
आरोग्य सहसंचालक,पुणे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी,
जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा
रुग्णालय,अहमदनगर यांचे
कार्यालय,अहमदनगर.
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा शल्य चिकित्सक,
अहमदनगर.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अधिनस्त त्रयस्थ पक्ष श्री. संजय ठोंबरे, यांच्या संदर्भात एकूण ११

मुद्यांद्वारे काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज आरोग्य सहसंचालक,पुणे यांना केला आहे. प्रत्यक्षात या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांची नेमणूक झाली आहे. त्यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त न झाल्यामुळे ते अद्यापपावेतो कोणताही निर्णय देऊ शकले नाहीत, असे त्यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. संजय ठोंबरे यांच्याबाबत एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागितली असून यातील मुद्दा क्र. १,२ व ९ शी संबंधित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. मात्र उर्वरित माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी संबंधित असल्याने व ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८(१)(ञ) चा भंग होईल, अशी आयोगाची खात्री आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ९ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय राहणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली मुद्दा क्र. १,२ व ९ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १,२ व ९ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २१-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ,घ.नं.१०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर), अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८५
निर्णय दिनांक २१-०४-२००९

१ श्रीमती आश्विनी सी.पुप्पाल, : अपिलार्थी
सावेडी, अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
उपसंचालक,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती,यांचे कार्यालय नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती, नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थीचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार श्री. एस.एस.शेवाळे, उपसंचालक, अनुसूचित जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती जे.एस.साने, वरिष्ठ संशोधन अधिकारी यांच्यासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी श्रीमती एस.एस.शेवाळे यांच्याकडे दि. २४.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमित केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. २४.०९.२००८ रोजी पाठविल्याचा पुरावा उपलब्ध कागदपत्रांमध्ये दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.
2. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२४.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच,

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती आश्विनी सी.पुप्पाल, बंगला नं.७, विवेकानंद हौसिंग सोसायटी,पाईपलाईन रोड,सावेडी,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, उपसंचालक अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,नाशिक यांचे कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांना अपिलार्थीच्या दि. २४.९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८७
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. सुनिल दयाकिसन बजाज, : अपिलार्थी
रा.राहुरी,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
भूमापन कार्यालय,राहूरी,
जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक,भूमी अभिलेख,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,राहुरी, जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, भूमीअभिलेख,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता,त्यांनी अपील अर्जाची दखल न घेतल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०९.२००८ रोजीचा मूळ अर्ज जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः दि.२२.०९.२००८ रोजी प्राप्त झाला, त्या अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "दि. १३.०९.१९९४ रोजी राहुरी शहरातील सिटी सर्व्हे ३२८२ नंबर देतांना भोगवटादार यांना दिलेल्या नोटीसपत्राची प्रत व दि. ०३.०३.२००६ रोजी दिलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक १,२ व ३२८२ चे एकत्रिकरण करताना कायद्यानुसार भोगवटादार यांची नावे नमूद करुन दिलेल्या नोटीसांची प्रत" - ही माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८८ इतके त्यांच्या कार्यालयात भरुन समक्ष माहिती प्राप्त करुन घेऊन जाण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०६.०८.२००८ रोजी उपस्थित झाले व त्यांना सि.स.नं.१,२ व ३२८२ च्या संदर्भातील आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांच्या नकला जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क पुरविल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निर्णयाची वाट न पाहता, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या प्रथम अपील निर्णयाचे अनुपालन त्यांनी केले असून अपिलार्थीस आवश्यक असलेली वाचनीय स्वरुपातील माहिती त्यांनी स्वतःकडे तयार करुन ठेवली आहे, यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस पत्राने

दि. ३०.१.२००९ रोजी कळविले होते तथापि, अद्यापही अपिलार्थी ही माहिती हस्तांतरित करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. यासंदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरावा मागितला असता, जन माहिती अधिकारी सदरचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा पुरावा आयोगास दाखवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०६.११.२००८ रोजी समक्ष उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेतल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे देखील त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, हे अपिलार्थीचे म्हणणे आयोग ग्राहय धरत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही परंतु आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी दि. ३१.१२.२००८ रोजी दिलेला निर्णय आयोगास दाखविला असून या सुनावणीसाठी अपिलार्थी हजर असल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते.या अपिलावर निर्णय देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना जास्तीत जास्त ४५ दिवस इतका कालावधी उपलब्ध होता, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील दि.२४.१२.२००८ रोजी अथवा तदनंतर विहित कालावधीमध्ये राज्य माहिती आयोगाकडे सादर करणे उचित ठरले असते.मात्र अपिलार्थीने विचाराधीन अपील सदर मुदतीपूर्वीच केले असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी स्वत: जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत केली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या वाचनीय व स्पष्ट स्वरुपातील प्रती त्यांच्याकडे तयार करुन ठेवल्याचे त्यांनी आज आयोगास अवगत केले आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित राहून, ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती या अर्जासंदर्भाने देय असणार नाही.

अपिलार्थीच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये दि. २७.११.२००८ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस हजर न राहिल्याने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००८ रोजी अंतीम सुनावणी घेतली असल्याचे दिसून येते, यावरुन अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन निर्णय प्राप्त न होण्यास अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार आहेत, एवढे असूनही त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीची सदरची कृती आक्षेपार्ह असून या कृतीद्वारे अपिलार्थी यांनी त्यांच्या हेतूबद्दल आयोगास साशंक केले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

2. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली सुस्पष्ट व वाचनीय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल दयाकिसन बजाज,रा.सि.टी.एस. नं. १९४, बालाजी निवास बजाजवाडा, राहुरी, जि.अहमदनगर-४१३ ७०५.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८८
निर्णय दिनांक  २२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शशिकांत भिमराव वाघचौरे,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>प्राचार्य,<br>सम्बोधी ज्युनिअर कॉलेज<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती देऊन, काही माहिती देण्यास लेखी नकार दिल्याने व त्यांना प्राप्त असलेली माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.१९९५ ते २०.०१.१९९५ या कालावधीतील सम्बोधी ज्यू.

कॉलेजमधील सर्व कार्यरत प्राध्यापकांच्या हजेरीपट रजिस्टर व सेवापट रजिस्टरच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस सदर माहिती नाकारताना,या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, सदर माहिती कर्मचाऱ्यांच्या सेवाअभिलेख्याशी संबंधित असल्यामुळे, माहिती ज्यासाठी आवश्यक आहे, ते प्रयोजन अपिलार्थीने अर्जात नमूद केलेले नाही, अशी कारणे नमूद केली आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.९.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१२.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या हजेरीपटाच्या नकला विनामूल्य देण्याचे सूचित केले व सेवापटाविषयी माहिती देण्याकरिता मुख्याध्यापक यांना त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे कळविण्याचे सूचित केले, तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.११.२००८ रोजी प्राध्यापकांच्या दैनंदिनी, हजेरीपटाच्या प्रती विनामूल्य पुरविल्या आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी 'सम्बोधी ज्यूनिअर कॉलेज' या महाविद्यालयाशी संबंधित माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना 'दादासाहेब रुपवते विद्यालय व ज्यु.कॉलेज,तोफखाना,अहमदनगर' या महाविद्यालयाशी संबंधित माहिती दिली असल्याने ही माहिती खोटी आहे. तसेच त्यांना सेवापटाच्या रजिस्टरची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त होण्यापूर्वी दि. ११.११.२००८ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने सम्बोधी ज्यूनिअर कॉलेजमधील प्राध्यापकांच्या काही विशिष्ट कालावधीतील दैनंदिन हजेरीपटाच्या व सेवापटाच्या प्रती मागितल्या होत्या. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. मात्र या माहितीमध्ये, संबंधित कॉलेजचे नाव 'सम्बोधी ज्युनिअर कॉलेज' ऐवजी 'दादासाहेब रुपवते विद्यालय व ज्यु.कॉलेज' असे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस 'सम्बोधी ज्युनिअर कॉलेज' विषयी माहिती हवी आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस 'सम्बोधी ज्युनिअर कॉलेज'ची अथवा त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात पुरविलेली माहिती ही 'सम्बोधी ज्युनिअर कॉलेज' महाविद्यालयासंबंधी असल्याचा योग्य तो पुरावा अपिलार्थीस द्यावा लागेल. सदर पुरावा अथवा 'सम्बोधी ज्युनिअर कॉलेज' संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, सेवापट रजिस्टरच्या प्रती मागितल्या आहेत. मात्र सुनावणीच्या वेळी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस संबंधित प्राध्यापकांच्या सेवापुस्तिकेच्या प्रती हव्या आहेत. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीची मांडणी, त्यांना त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यवस्थित न करता आल्याने, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. त्यांना जर कॉलेजच्या प्राध्यापकांच्या सेवापुस्तिकेच्या प्रती हव्या असतील तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळया अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहितीची मागणी करावी, असे त्यांना या मुद्यावर सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सेवापुस्तिकेचे 'देवाण-घेवाण रजिस्टर' ठेवलेले आहे. त्यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या 'सेवापट रजिस्टर'म्हणजेच हे रजिस्टर गृहित धरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे

उपलब्ध असलेली माहिती ('देवाण-घेवाण रजिस्टर' ची प्रत) अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

1. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शशिकांत भिमराव वाघचौरे,धनाजी निवास, शिवपवन मंगल कार्यालयाजवळ, नालेगाव,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,दादासाहेब रुपवते ज्युनियर कॉलेज, तोफखाना, सिध्दबागेजवळ, अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८९
निर्णय दिनांक २२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लहानु रामनाथ नवले,<br>रा.मालदाड,ता.संगमनेर,जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,संगमनेर<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमी अभिलेख,अहमदनगर | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने अपील करण्याचे कारण "निरंक" असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. मालदाड ता.संगमनेर येथील गट नंबर ६११ व ८१३ संदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२४.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.११.२००८ रोजी निर्णय देऊन "अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन त्यांच्या माहितीशी संबंधित धारिका उपलब्ध करुन द्यावी व त्यातील संबंधित हवी असलेली माहिती अपिलार्थीस पुरवावी" असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०९.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या १० मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्यातील मुद्दा क्र. २ अंशतः, ३ व ६ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही, कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबाबत अथवा निर्णयाबाबत कारणे विचारणे, त्यांच्याकडून खुलासा वा स्पष्टीकरणे अपेक्षित करणे अशा स्वरुपाची माहिती मागविणे अनुज्ञेय असत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात त्यांना कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील मुखत्यारपत्राची नक्कल, व मुद्दा

क्र. ६ द्वारे विचारलेल्या नियमाप्रमाणे होणारी मोजणी फी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे.त्याप्रमाणे अपिलार्थीस मुद्दा क्र.२ व ६ मधील देय माहिती,जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०९.२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे - "जबाबाची नक्कल मिळावी", अशी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. मात्र कोणाच्या जबाबाची, कोणत्या दिनांकाची, याचा उल्लेख त्यांनी अर्जामध्ये केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरत आहे. तथापि या मुद्यासंदर्भात माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जबाबाची नक्कल नियमाप्रमाणे फी भरुन घेऊन जाण्याचे सूचित केले आहे. यावरुन कोणाच्या जबाबाची नक्कल हे जन माहिती अधिकारी यांना ठाऊक असल्याचे दिसून येते. तथापि सदर मुद्यान्वये ती मोघम स्वरुपात विचारली असल्याने या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित असल्यास त्यांनी अपेक्षित जबाबाचे इतर संदर्भ देऊन स्पष्ट स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेला मूळ अर्ज, त्यातील माहितीचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०९.२००८ रोजी पुरविलेली माहिती पाहता, अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

1. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लहानु रामनाथ नवले,रा.मालदाड,ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,संगमनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९०
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. लहानु रामनाथ नवले, : अपिलार्थी
रा. मालदाड, ता.संगमनेर,अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत मालदाड,
ता.संगमनेर,जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती,संगमनेर, जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मालदाड ग्राम पंचायतीतील विकास कामाची कोणतीही माहिती मिळाली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी, दि.०१.०४.१९९६ ते ३१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित, माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये-

वर्षनिहाय विकास कामाची माहिती, वर्षनिहाय घरकुलाची माहिती, वर्षनिहाय दारिद्रयरेषेची यादी, व तेरिज ताळेबंद पत्रकाचा अहवाल - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.१२.२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी यापुढे माहिती मिळण्यासाठी थांबण्यास तयार नसल्याने त्यांना पुढील अपील राज्य माहिती आयोगाकडे करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.१०.०४.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि. १७.०४.२००९ रोजी ठीक १२.१० वा. त्यांच्या कार्यालयातील श्री. तितमे, कार्यालयीन अधीक्षक यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे उपस्थित राहण्याच्या सूचना देऊनही, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे ज्या चार मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्यातील  मुद्दा क्र. १,२ व ३ या तीन मुद्यांमध्ये अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा स्पष्ट उल्लेख या अर्जामध्ये नाही. माहितीसाठी कोणताही संदर्भ दिलेला नाही. अशाप्रकारे मुद्दा क्र. १,२ व ३ या तीनही मुद्यांवरील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात अत्यंत मोघम स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने तेरीज ताळेबंदपत्रकाचा अहवाल

जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे. ही, अर्जातील संबंधित कालावधीशी संबंधित माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. २०.१०.२००८ पर्यंत त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे अथवा अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद  देण्याचे सौजन्य दाखविले नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार वर्तनामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित ग्रामसेवकावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, येथे असे स्पष्ट करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय पूर्णतः सदोष असून या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणीचे आपले कर्तव्य योग्य त्या रितीने पार पाडले नसल्याचे आयोगास आढळले आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे पृथक्करण करुन त्यांनी या प्रकरणी निर्णय देणे अपेक्षित असताना त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याचे सूचित करणे हे संबंधित विस्तार अधिकाऱ्याच्या अकार्यक्षमतेचे द्योतक आहे, असे आयोग मानतो. जन अपिलीय अधिकारी यांच्यासंदर्भात आयोगाने व्यक्त केलेल्या या अभिप्रायांची यथायोग्य नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित ग्रामसेवक,ग्रामपंचायत मालदाड, ता.संगमनेर यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लहानु रामनाथ नवले,रा. मालदाड, ता.संगमनेर,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती,संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९१
निर्णय दिनांक   २२-०४-२००९

१ श्री. विजय भास्कर देशमुख, : अपिलार्थी
रा.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, के.जे.सोमय्या,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कोपरगाव,जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
के.जे.सोमय्या,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कोपरगाव,जि.अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राध्यापक,
के.जे.सोमय्या,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कोपरगाव,जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने, आवश्यक त्या शुल्काचा भरणा चलनाद्वारे करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न देता एक पत्र पाठविले असल्याचे नमूद केले

आहे. यासंदर्भात त्यांनी दि. १२.११.२००७ रोजी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले असता, या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेता त्यांनी भरलेल्या शुल्काची रक्कम रु.१००/- पैकी रु.५०/- मनिऑर्डरद्वारे त्यांना परत केली. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती व त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित शैक्षणिक वर्ष १९९८ ते २००३ या कालावधीशी संबंधित - इतिहास व राज्यशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकांचे नाव, त्यांना मानधन अदा केले किंवा कसे, केले नसल्यास का केले नाही? - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रु.१००/- खर्च पाठविण्याचे सूचित केले व या पत्रामध्ये अपिलार्थी केवळ संस्थेला त्रास देण्यासाठी पत्रव्यवहार करत आहेत, असे त्यांच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दि.०८.१०.२००७ रोजी रु.१००/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे चेकद्वारे पाठविले. यास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.११.२००७ रोजी कथित माहिती देणारे एक पत्र पाठविले. या पत्रामध्ये, "तुम्ही संस्थेला जे प्रश्न विचारीत आहात ते प्रश्न माहितीच्या अधिकाराच्या कायद्यानुसार नाहीत, संस्थेला धमकी देणारे प्रश्न विचारीत आहात", असे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांनी व्यक्त केले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. मात्र अपिलार्थीस दि. ३०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने

भरणा केलेल्या एकूण रु.१००/- पैकी रु.५०/- त्यांना मनिऑर्डरद्वारे परत पाठविले. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीचा पुनरुच्चार केला व जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस दि. ३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती सरळ व सोपी होती. मात्र अपिलार्थीच्या दि. ०३.०९.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.१०.२००७ रोजी दिलेला प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा व अवैध आहे, कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा सविस्तर तपशील जो, त्यांनी अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे अनिवार्य आहे तो दिलेला नाही. त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- हे कशाच्या आधारे घेतले, याचा तपशील त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. यानंतर अपिलार्थीने दि. ०८.१०.२००७ रोजी धनादेशाद्वारे सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर सदर धनादेश कधी वटला, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन समजू शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी शैक्षणिक वर्ष १९९८ ते २००३ या कालावधीमध्ये इतिहास व राज्यशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकाचे नाव, त्यांना मानधन अदा करण्यात आल्याचा दिनांक ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. मात्र मानधन अदा केले काय ? केले नसल्यास का केले नाही ? अशाप्रकारची, जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.११.२००७

रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ती माहिती अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे स्पष्ट स्वरुपात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले असल्याचे येथे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील इतिहास व राज्यशास्त्र या विषयाच्या व्याख्यात्यांचे नाव, या व्याख्यातांना शैक्षणिक वर्ष १९९८ते २००३ या कालावधीत दिल्या गेलेल्या मानधनाचा तपशील त्यांच्याकडील अभिलेख्यातील ज्या कागदपत्रांवर उपलब्ध आहे, त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद पूर्णतः अवैध असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.१००/- पैकी उर्वरित रु.५०/- (यापूर्वी रु.५०/- जन अपिलीय अधिकारी यांनी परत केलेले असल्यामुळे) त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

प्रसंगावशात, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्याचे टाळून दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीच्या स्वीकारलेल्या शुल्क पैकी उर्वरित शुल्क रु.५०/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय भास्कर देशमुख, मुक्तप्रभा-१,सावरकर चौक, इंदिरानगर,नाशिक-४२२ ००९.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, के.जे.सोमय्या,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मोहनीराजनगर,कोपरगाव,जि.अहमदनगर-४२३६०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, के.जे.सोमय्या,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोहनीराजनगर,कोपरगाव,जि.अहमदनगर-४२३६०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष,के.जे.सोमय्या,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव, जि.अहमदनगर-४२३६०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९२
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री.मोहनराव बाबूराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम जि.प. उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम जि.प.उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जिल्हा परिषद ल.पा.उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उप अभियंता,
जिल्हा परिषद ल.पा.उपविभाग कर्जत,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपीलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपिलावर निर्णय प्राप्त झालेला नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.२८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१.०१.२००८ ते ३०.०६.२००८ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या उपविभागातील किरकोळ दुरुस्तीच्या कामासंदर्भात काही माहिती पोस्टाने मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - शाखानिहाय व विषयनिहाय कामाचे नाव,स्वरुप, एजन्सीचे नाव,कामाचे अंदाजित रक्कम,कामावर एकूण झालेला खर्च,वर्क ऑर्डर दिनांक व कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केलेल्या विकास कामाचे दिनांक - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७५/- त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. परिणामी त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही, अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती मिळाली नाही अथवा यासंदर्भात त्यांनी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या आज उपस्थित असलेल्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दि.१४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७५/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे

सूचित केले होते. मात्र या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे अपिलार्थीस त्यांनी दि. १४.०८.२००८ रोजीचे पत्र पाठविल्यासंदर्भात पुरावा मागितला असता, जन माहिती अधिकाऱ्याचे प्रतिनिधी हे सदर पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७५/- इतके जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे त्यांना सूचित केले.मात्र हे पत्र पाठविल्याचा कोणताही सबळ पुरवा आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. यावरुन सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविले नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मोहनराव बाबूराव गायकवाड,रा.दत्तनगर,पाईप लाईन रोड,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे कर्जत उपविभाग,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे कर्जत उपविभाग,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९३
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. सुनिल दयाकिसन बजाज, : अपिलार्थी
रा.राहुरी जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
राहुरी,जि.अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक,भूमी अभिलेख,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मोघम माहिती देऊन मूळ माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने व न मागितलेल्या विषयातील चुकीची पत्रके दिली व त्याच्या फीची आकारणी केल्याने इत्यादी कारणामुळे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठी केलेल्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सिटी सर्व्हे नं.१,२ व ३२८२ च्या संदर्भात सन १९९४ ते दि. ०३.०३.२००६ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे, सत्यप्रतीच्या स्वरुपात व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. ३०७/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २०.०८.२००८ रोजी रु.३०७/- इतके शुल्क भरले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर दि. २०.०८.२००८ रोजीच त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य केले व अपिलार्थी यांनी, त्यांना जादा माहिती हवी असल्यास, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून संबंधित अभिलेख्यांची सशुल्क पहाणी करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती रितसर अर्ज करुन मागणी करण्याचे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ६.११.२००८ रोजी समक्ष उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेतल्या आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी त्यामध्ये नगरपरिषदेने सिटी सर्व्हे नं.१,२ व ३२८२ च्या मिळकत हक्क नोंदवहीत नोंदीच्या वेळी सादर केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, राहुरी नगरपरिषदेने सिटी स.नं.१,२ व ३२८२ च्या मिळकत हक्क नोंदी करण्यासाठी कोणतेही दस्तऐवज त्यांच्याकडे सादर केले नव्हते, यातील मोजमाप करुन

संबंधितांनी कोणताही पंचनामा केला नव्हता, अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे मागणी केलेली सनद राहूरी नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे. उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या अर्जाप्रमाणे मुद्देनिहाय माहिती न दिल्याने अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे भाग पडले आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.१,३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगास कबूल केले आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात उपलब्ध नाही, ही माहिती राहुरी नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे. मात्र अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत राहुरी नगर परिषदेकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग असताना त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्याने, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती देण्याची जबाबदारी आता जन माहिती अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र १,३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल दयाकिसन बजाज,रा.जंगमगल्ली, बजाजवाडा, मु.पो.ता.राहुरी जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९४
निर्णय दिनांक  २२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकुब ,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार,<br>महानगरपालिका,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त,<br>महानगरपालिका,अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास नकार दिला व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही अपेक्षित माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठी केलेल्या त्यांच्या दि. २१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०२.०६.२००८ ते दि. २१.०७.२००८ या कालावधीमधील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री.

हनिफ इब्राहिम यांच्या अनधिकृत बांधकामासंबंधाने दि. ०२.०६.२००८ रोजी दिलेला अर्ज व दि. ०७.०७.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची, मूळ अर्जाची, प्रत, सदर अर्ज ज्या कर्मचाऱ्यांकडे पाठविले, त्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम, यासंदर्भात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.२/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीच्या तक्रार अर्जाची योग्य ती दखल घेण्यात आली असून नमूद केलेल्या ठिकाणची स्थळपहाणी करण्यात आली असल्याची व पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असल्याचे म्हटले आहे व सदर कार्यवाही करणे, ही बाब माहिती अधिकार कायद्यांतर्गत अंतर्भूत नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतदुीनुसार दि. ०६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले.या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाच्या प्रती त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला.

दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०२.०६.२००८ व ०७.०७.२००८ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत व महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेली कार्यवाही, अपिलार्थीचा अर्ज ज्या कर्मचाऱ्याकडे पाठविला होता, त्या कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम ही माहिती मागितली होती. यापैकी त्यांनी दिनांक ०७.०७.२००८ रोजी महानगरपालिकेकडे

लोकशाही दिनात सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीने आयोगास, त्यांनी लोकशाही दिनात महानगरपालिकेकडे सादर केलेल्या अर्जाची पोच त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे तोंडी सांगितले, तथापि याबाबत कोणताही सबळ पुरावा त्यांनी यावेळी आयोगास सादर केला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन पुढे असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेला प्रतिसाद पुरेसा नाही. कोणाही अर्जदाराने त्यांच्या तक्रार अर्जावर अथवा इतर अर्जावर केलेल्या कार्यवाहीसंदर्भातील माहिती, म्हणजे अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यापासून त्या विषयावर जन माहिती अधिकारी यांनी वेगवेगळया प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यहाराच्या व यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यामध्ये अभिप्राय नोंदविलेल्या टिपण्यांच्या प्रती होत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने दि.०२.०६.२००८ रोजी व दि. ०७.०७.२००८ रोजीच्या दिलेल्या अर्जांवर, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या व अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती अपिलार्थीस या प्रकरणी देणे उचित राहिल. अपिलार्थीच्या विचाराधीन अर्जासंदर्भात त्यांचा अर्ज ज्या कर्मचाऱ्याकडे पाठविला होता, त्या कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम ही माहिती देखील अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली असल्याचे आढळून येत नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरणा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व ही माहिती देण्यासाठी अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.२/- त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा कथित दि. ०७.०७.२००८ रोजीचा लोकशाही दिनात दिलेला अर्ज

गहाळ झाल्याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यावर आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकुब,घ.नं.१७९०,करशेटजी रोड,रामचंद्र खुंट, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९५
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. प्रसाद पांडुरंग जोशी, : अपिलार्थी
रा. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राचार्य,
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : मानद कार्यवाह,
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, अहमदनगर या संस्थेच्या सर्व बँकांतील सर्व खात्यातील दि. ०१.०१.२००८ ते दि. ३०.०४.२००८ या कालावधीतील तपशील, बँक खातेनंबरसह मागितला होता. अपेक्षित माहितीपोटी अपिलार्थीने (पासबुकाच्या वरील कालावधीदरम्यानच्या पासबुकातील नोंदीच्या पानांच्या झेरॉक्स सत्यप्रती) अशी नोंद केली आहे. यावरुन अपिलार्थीस आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ या संस्थेच्या सर्व बँक खात्यांमधील पासबुकाच्या दि. ०१.०१.२००८ ते ३०.०४.२००८ या कालावधीतील सर्व नोंदीच्या सत्यप्रतींची माहिती आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. तथापि हा अर्ज संबंधित संस्थेकडून स्वीकारला गेला नाही व तो परत आला. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्वीकृत झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागले असल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांना आजच्या सुनावणीपूर्वी दि. २०.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली आहे. मात्र ही माहिती अपूर्ण असून आयुर्वेद सेवा मंडळ,अहमदनगरची एकूण ६ बँक खाती असून त्यापैकी ४ खाती एस.बी.आय.मध्ये, एक,

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत व एक,आय.डी.बी.आय. बँकेत आहे, या संदर्भातील योग्य तो पुरावा अपिलार्थीने आयोगासमोर सादर केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर अपिलार्थीच्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्य आढळले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आय.डी.बी.आय. या बँक खाते क्र. १०२७ च्या संदर्भात माहिती दिलेली आहे, मात्र उर्वरित ५ खात्यांची अपिलार्थीने मागणी केलेल्या कालावधीतील माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीच्या मूळ अर्ज स्वीकारण्यास संस्थेने नकार दिला व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर देखील कोणताही निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी न दिल्याने आता ही माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या त्यांच्या संस्थेविषयी उर्वरित पाच बँक खात्यांची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीचा मूळ अर्ज संस्थेने स्वीकारला नाही. संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी यासंदर्भात सखोल चौकशी करुन संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची नोंद संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या संस्थेच्या उर्वरित पाच बँक खात्यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रसाद पांडुरंग जोशी, व्यंकटेश अपार्टमेंट,फ्लॅट नं.६,स्वामी विवेकानंद चौक,गुजर गल्ली, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मानद कार्यवाह,आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९६
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. रामदास आबाजी गुळवे, : अपिलार्थी
रा.साकूर,ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,रणखांब, ता.संगमनेर,
जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती, संगमनेर,जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००० ते ३०.०५.२००८ या कालावधीशी संबंधित ग्रामपंचायत रणखांब,ता.संगमनेर जि.अहमदनगर मार्फत झालेल्या सर्व शासकीय विकास योजनेच्या कामांबाबत

माहिती, विकास कामांसाठी मंजूर झालेला एकूण निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च व सर्व प्रकारच्या विकास कामांची सविस्तर माहिती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०४.२००९ रोजी (आयोगाकडील द्वितीय अपील सुनावणीच्या चार दिवस अगोदर) आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दि. १८.०४.२००९ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यांची पोच जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या स्पष्ट केलेल्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरले आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना ग्रामसेवक, ग्रामपंचायत रणखांब यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित ग्रामसेवक श्री. भाऊसाहेब बाळकृष्ण घारे, ग्राम पंचायत, रणखांब,ता.संगमनेर, जि. अहमदनगर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामदास आबाजी गुळवे,वनवेनगर,सांस्कृतिक भवनामागे,रा.साकूर,ता.संगमनेर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,रणखांब, ता.संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),पंचायत समिती, संगमनेर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९७
निर्णय दिनांक २२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरुण सोपान वाबळे,<br>रा.गुहा,ता.राहुरी,जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा कृषि अधीक्षक,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा कृषि अधीक्षक,<br>अहमदनगर | | |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी | : | उपसंचालक (कृषि),<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी<br>कार्यालय,<br>अहमदनगर |
| जन अपिलीय अधिकारी | : | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,<br>अहमदनगर. |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे,जिल्हाधिकारी,अहमदनगर यांच्याकडे दि. १९.०५.२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची छायाप्रत, माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन दिलेल्या आदेशाची प्रत, चौकशी अहवालाची पृष्ठ संख्या, कारवाई अहवालाची पृष्ठ संख्या व चौकशी अहवालाची व कारवाई अहवालाच्या छायाप्रती- ही माहिती मागितली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.१२, २२.१२ व ३१.१२.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिले. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१२.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे अपील, अपिलार्थीने मागणी केलेला अहवाल दि. ५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याने, निकाली काढले. अपिलार्थीस सदर अहवालाच्या प्रती दि. १७.१.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादावरुन दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने एकूण ६ मुद्यांद्वारे मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस कार्यवाही अहवालासंदर्भात कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण अपिलार्थीने ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली होती त्यावेळी अपिलार्थीने केलेल्या तक्रारीसंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नव्हती. मात्र त्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे आवश्यक ती चौकशी करण्यात आली असून अपिलार्थीने केलेली तक्रार निराधार व तथ्यहीन असल्याचे आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आदेश, जन माहिती अधिकारी यांचे आदेश व

चौकशी अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस आता पुरविली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती, त्यांनी द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी असल्याचे नमूद केले आहे. मात्र ही माहिती कशी खोटी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत.

या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार केल्यास अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण सोपान वाबळे,रा.गुहा,ता.राहुरी,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (कृषि),जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९८
निर्णय दिनांक २२-०४-२००९

१ श्री. दिलीप नायकु थोरात, : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी ता.कोपरगाव,
जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,कोपरगाव,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.१२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून दि. १८.०४.२००९ रोजीचे एक पत्र फॅक्सद्वारे आयोगाचे कार्यालयास प्राप्त झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे विचाराधीन अपील रद्दबातल ठरवून निकाली काढावे.

अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे अपिलार्थीचे अपील क्र.२९८/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.२९८/०८, दि.१७.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप नायकु थोरात,रा.कोळपेवाडी ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कोपरगाव,जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. संजय पांडुरंग लांडगे, अपिलार्थी
मु. पो. वळदगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वळदगांव,
तालुका जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत वळदगांव कार्यक्षेत्रातील गट नंबर ९९ मधील घरांचा तपशील, गट नंबर ९९ मधील फेरफार, ८ अ नमुना व गट नंबर ९९ मधील घरांची नोंद कोणत्या आधारे घेतली त्या कागदपत्रांची माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः हजर राहण्यासाठी दिनांक २७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते स्वतः माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही त्यांच्याकडे उपस्थित राहिले नाहीत. एवढेच नव्हे तर दिनांक २७-११-२००७ रोजी लेखी कळवूनही ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हजर झाले नाहीत. अंतीमतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना गट विकास अधिकारी यांच्यामार्फत दिनांक १४-०३-२००८ रोजी पुरविण्यात आली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिका-याचे दिनांक १२-०३-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रावर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाल्याची पोच दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने या पत्रावर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ मराठीत सही केली असून आयोगाकडे केलेल्या अपिलावर अपिलार्थीची इंग्रजीमध्ये केलेली सही आहे. अपिलार्थीच्या या पत्रावर केलेली व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावरील सही यामध्ये साधर्म्य आढळत नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी रजिस्टर पोस्टाने दोनदा माहिती पुरवूनही अपिलार्थीने सदर माहिती स्वीकारण्यास नाकारल्याचेही आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तेव्हा आज सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय पांडुरंग लांडगे, मु. पो. वळदगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वळदगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. मोबीन मोहयोद्दीन पठाण, अपिलार्थी

व्दारा, ए. एम. के. ऑटो पार्टस, हडको कॉर्नर, एन-१३,

हर्सूल रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठान प्राथमिक शाळा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील अर्जात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. पठाण मुकीन मुसाखाँ या त्रयस्थ पक्षाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०३-२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००८ व १०-०६-२००८ या दोन पत्राव्दारे त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून समक्ष घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८, दिनांक २६-०६-२००८ व दिनांक १५-०७-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीचे पत्र अपिलार्थीस उशीरा प्राप्त झाल्याने अंतीमतः अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही निर्णय प्राप्त होऊ शकला नाही. त्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झ ाल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती हवी असल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्यानंतर दिनांक २८-०५-२००८ व दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते. आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जरी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती तरीही अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविणे भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केलेली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. पठाण मुकीन मुसाखाँ यांनी त्यांच्या शाळेत प्रवेश घेतांना सादर केलेली कागदपत्रे व त्यांनी तडवी प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे यासंदर्भात माहिती हवी असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन

माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली व ते अपिलार्थीस उपलब्ध करुन देत असलेल्या माहितीचे अवलोकन करता त्रयस्थ पक्षाने शाळेमध्ये प्रवेश घेतांना सादर केलेल्या जन्मतारखेच्या प्रमाणपत्राच्या प्रती वगळता उर्वरित माहिती सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. त्रयस्थ पक्षाच्या जन्मतारखेचा पुरावा या शाळेमध्ये दाखल केलेल्या पुराव्याची प्रत जन माहिती अधिकारी अपिलार्थीस आता विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागितलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ च्या कोणत्याही तरतुदीस बाधा पोहोचेल असे आयोगास वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर दिलेला प्रतिसाद पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब अध्यक्ष, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. अध्यक्ष, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोबीन मोहयोद्दीन पठाण, व्दारा, ए. एम. के. ऑटो पार्टस, हडको कॉर्नर, एन-१३, हर्सूल रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठान प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था, श्रीकृष्णा १९०, उल्कानगरी, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७

निर्णय दिनांक २७-०४-२००९

श्री. शरद भीमराव दाभाडे, अपिलार्थी

एन-१२, डी-३६/९, स्वामी विवेकानंद नगर,

हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक ३,

तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०४-२००९ रोजीचे पत्र आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०८-२००८ रोजी पूर्ण माहिती मिळाली आहे. प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असून त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिली नाही. त्यामुळे विचाराधीन अपील ते स्वखुशीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीच आता त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक १४७/२००८, दिनांक २१-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १४७/२००८, दिनांक २१-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद भीमराव दाभाडे, एन-१२, डी-३६/९, स्वामी विवेकानंद नगर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक ३, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८

निर्णय दिनांक २७-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुरेश गोविंदराव माळी (पूंड),<br>रा. फाजलपूरा,<br>औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>महानगरपालिका, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक संचालक, नगर रचना,<br>औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्याने केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जाव्दारे त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील घर नं. १-२४-४१ शुक्लेश्वर महादेव मंदिर या संदर्भात काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संपूर्ण रेकार्ड व फाजलपुरा ते शहागंज रोड किती फुटाचा आहे, सिटी सर्व्हे नंबर ११४१२ भूसंपादन अधिकारी रोडमध्ये किती लोकांची जागा रोडमध्ये गेली त्याचा तपशील, रोडमध्ये गेलेल्या जागेच्या नोटीसा कोणाच्या नावाने काढल्या, घर नं. १-२४-४१ टॅक्स ज्यांना लागू केला आहे त्या सर्वांची माहिती, जुना घ. नं. २३२० मोहल्ला दिल्ली दरवाजा महादेव मंदिर फाजलपुरा औरंगाबाद सन १३५६ फसली मूळ दस्तऐवज आणि रिव्हीजनच्या नकला व सिटी सर्व्हे नंबर ११४१२ सिट नंबर १३, शुक्लेश्वर महादेव मंदिर मंजूर झालेल्या ले आऊट सत्यप्रतीसह - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व सातशी संबंधित माहिती दिली व उर्वरित माहिती त्यांच्या विभागाशी संबंधित नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगापुढे प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, ५ व ६ शी संबंधित अपिलार्थीने मोघम स्वरुपाची माहिती मागविली असल्याने यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध अभिलेख्याची अपिलार्थीने तपासणी केल्यास अपिलार्थीस काही माहिती मिळू शकेल. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, ५ व ६ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात मागितली आहे. मागितलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस फक्त मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अशा प्रकरणी कशा प्रकारे कार्यवाही करावयाची याची तरतूद अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मध्ये केलेली आहे. या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक १०-०४-२००८ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडे पाच दिवसाच्या आत म्हणजे दिनांक १५-०४-२००८ पर्यंत पाठवून देणे या प्रकरणी तरतुदीस धरुन अपेक्षित होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने प्रतिसाद दिल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेल्या अशा प्रकारच्या अनियमिततेमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिले आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित उर्वरित माहिती संबंधितांकडून घेऊन देण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतूपुरस्सर माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यास असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे त्यांना (विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद) आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित माहितीची विचारणा केल्यास त्यांना तात्काळ व सकारात्मक प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्वरेने माहिती उपलब्ध होईल असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश गोविंदराव माळी (पूंड), रा. फाजलपूरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. महंमद इम्रान महंमद ईस्माइल, अपिलार्थी
जुना बाजार, अजिम कॉलनी, घर नं. १/१६/८५,
बेगमजानी मस्जीदच्या पाठीमागे, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (महसूल),
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वॉर्ड अधिकारी '(अ)', औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता तथा सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्ज, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे व त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे केला असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने शेवटी असे नमूद केले आहे की, त्यांना जुना बाजार, अजिम कॉलनी, घर नं. १/१६/८५, बेगमजानी मस्जीदच्या

पाठीमागे रेकॉर्डप्रमाणे रस्ता किती आहे व आता किती आहे तसेच या रस्त्यावरील बांधकाम परवानगीविषयी माहिती हवी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" घर क्र. १/१६/८५ चे दक्षिण बाजुला जो रस्ता आहे त्याचे अतिक्रमणाबाबत सरकारी रस्तेवर अतिक्रमण करोण घर बाधलेला आहे त्याची पुर्ण तपशील व बाधकामाची दिलेली प्रवानगीचे आदेश "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस वस्तुस्थिती अवगत केली आहे. मात्र या माहितीने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १०-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस असे सूचित केले की, अपिलार्थीची अनधिकृत बांधकामासंदर्भात काही तक्रार असल्यास अपिलार्थीने त्याबाबत अर्ज स्वतंत्ररित्या प्रशासकीय अधिका-याकडे सादर करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकूण घेण्यात आला. अपिलार्थीची मूळ तक्रार अनधिकृत बांधकामाबाबतची असून या बांधकामामुळे खड्डयातील सर्व सांडपाणी त्यांच्या घरात शिरत असल्यामुळे त्यांनी सदर कथित अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या विनंतीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस निश्‍चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. मात्र आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस कथित बांधकाम महानगरपालिकेतर्फे काढणे अपेक्षित आहे. या सर्व बाबी पाहता जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपील निर्णय आयोगास योग्य वाटतो. या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या शंकांचे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांची प्रत्यक्ष पाहणी केली असता निरसन होऊ शकेल असे आयोगास वाटते. त्यामुळे अपिलार्थीस, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित अभिलेख्यांच्या तपासणीसाठीची मागणी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्या अर्जाव्दारे करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महंमद इम्रान महंमद ईस्माइल, जुना बाजार, अजिम कॉलनी, घर नं. १/१६/८५, बेगमजानी मस्जीदच्या पाठीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी '(अ)', औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता तथा सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २६१९/०७ व २६२३/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१९ व २६२३

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २६१९/२००७

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ कृषि अधिकारी,
कार्यालय तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक २६२३/२००७

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २६१९/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी, अपील क्रमांक २६२३/०७ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे कोणत्याही विशिष्ट प्रकारची विनंती केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, या दोनही अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती एकसारखीच असल्याने या दोनही अपिलांची सुनावणी आज रोजी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबधित सन २००५ ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत, मराठवाडा पॅकेज योजनेअंतर्गत, आदिवासी विकास योजनेअंतर्गत विविध प्रकारच्या जलसंधारण केलेल्या व चालू असलेल्या सर्व कामांची माहिती अपिलार्थीने मागविली आहे. या माहितीमध्ये कामाचे नांव, गाव, अंदाजपत्रकीय किंमत, मजुराचे रोजगार पट, हजेरीपटाची छायांकीत प्रत, मजुरांचे जॉब कार्ड, उपभोग प्रमाणपत्राची छायांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट यांनी दिनांक ११-०९-२००७ रोजी व मंडळ कृषि अधिकारी, माहूर यांनी दिनांक २३-०८-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटी अनुक्रमे ७० रुपये व ७२०० रुपये इतक्या रकमेचे शुल्क भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्कांचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या दोनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त न झ

ाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी कळविलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. या पत्रावर अपिलार्थीची सही आहे यावरुन हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, माहूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलांवरील सुनावणीसाठी दोनदा उपस्थित राहण्याची विनंती करुनही अपिलार्थी सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याने त्यांचे अपील निकाली काढण्यात आले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्या दिनांक २३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली व उर्वरित माहिती ज्यामध्ये, अपिलार्थीस द्यावयास लागणा-या प्रतींचा समावेश होता, त्याकरिता त्यांनी अपिलार्थीस रुपये ७२०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने हे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरलेले नाही. या दोनही अपिलाशी संबंधित जन माहिती अधिकारी व उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांच्या माहितीसाठी अथवा यासंदर्भात पुढे चौकशी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. विचाराधीन दोनही प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला होता. या दोन प्रकरणापैकी एका प्रकरणी (अपील क्रमांक २६१९/२००७) अपिलार्थीस पत्र प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची सही असलेली प्रत आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आली आहे. तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ योग्य तो पुरावा आयोगास सादर करण्यात आला आहे. अपिलार्थी हे माहिती

घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे असे दिसून येत आहे. शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक आर. टी आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ नुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराला माहिती हवी असल्यास व तो दारिद्र्यरेषेखालील नसल्यास त्यांना या अधिसूचनेप्रमाणे माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहीत माध्यमाव्दारे भरणे अनिवार्य आहे. या प्रकरणी या अटींची पुर्तता न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही असे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे व याचबरोबर आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक २६१९/२००७, दिनांक २८-१२-२००७ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २६२३/२००७, दिनांक २८-१२-२००७ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२०

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",

सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मंडळ कृषि अधिकारी,

कार्यालय तालुका कृषि अधिकारी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही स्वरुपाची विशिष्ट अशी विनंती आयोगास केलेली नाही. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असावे असे अनुमान काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक १८-१२-२००७ रोजी विनामूल्य माहिती दिल्याचे व ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची सही असलेल्या, त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्राची सत्यप्रत, आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर मिळाली असल्याने व तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये आयोगास कोणत्याही प्रकारची विशिष्ट विनंती केलेली नाही हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-०४-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २६२१/०७, २६२२/०७ व २६२४/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२१, २६२२ व २६२४

निर्णय दिनांक २७-०४-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, किनवट तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २६२१/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी,
हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक २६२२/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ कृषि अधिकारी, कुंडलवाडी,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक २६२४/०७

१ जन माहिती अधिकारी

तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, उमरी,

तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, प्रतिवाद

तालुका उमरी, जिल्हा नांदेड

## निर्णय

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक २६२१/०७ व २६२४/०७ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि अपील क्रमांक २६२२/०७ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी केलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची विनंती राज्य माहिती आयोगास केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने एकाच माहितीसाठीचे प्रथम अर्ज एकाच दिवशी एकाच विषयावर, प्रथम अपील अर्ज एकाच दिवशी व राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील एकाच दिवशी सादर केले असून या तीनही अपील अर्जांशी संबंधित मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही एकसारखी असल्याने वरील तीनही अपिलांची सुनावणी आज रोजी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

**अपील क्रमांक २६२१/२००७**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दरे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीमध्ये - संबंधित कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या, चालू असलेल्या कामांची अंदाजपत्रकीय किंमत, कामाचा सुरु दिनांक, बंद दिनांक, कामाची सद्यस्थिती, कामाची तपासणी केलेल्या अधिका-याचे नांव व पदनाम, मजुराचे हजेरीपट, रोजगारपट, जॉब कार्ड व मजुराचे उपभोग प्रमाणपत्राची छायांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०७२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे माहिती पुरवू शकले नाहीत. यासंर्भात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले असावे असे अनुमान काढण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे, आयोगाची नोटीस प्राप्त होऊनही उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०७२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी सूचित केले असता अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदार दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्यास त्यांना शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक आर. टी आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ अन्वये प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरणे अनिवार्य आहे. तथापि या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने शुल्क न भरल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची विशिष्ट विनंती केली नाही. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना शुल्काची रक्कम कळवूनही त्यांनी, आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही, या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २६२१/२००७ फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक २६२२/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने अपील क्रमांक २६२१/०७ प्रमाणेच तालुका कृषि अधिकारी, कार्यालय बिलोली यांच्याकडे त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०५-१०-२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रावर पोच दिलेली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत कोणताही युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी प्राप्त माहितीसंदर्भात कोणतेही अभिप्राय राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये व्यक्त केलेले नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक २६२२/२००७ निकाली काढण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १३ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २६२२/२००७ निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक २६२४/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने अपील क्रमांक २६२१/२००७ प्रमाणेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे, असा युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला. अपिलार्थीस ही माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००७ रोजीचे त्यांचे व्दितीय अपील दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविल्यानंतर मिळाल्याचे दिसून येते.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा अपिलार्थीस प्राप्त झ ालेल्या माहितीच्या दर्जाबाबत युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील क्रमांक २६२४/२००७ निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. अरुण पंढरीनाथ सोनार, अपिलार्थी
४०, नेहरुनगर, नंदुरबार,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सुनावणीच्या सुरुवातीस त्यांचे दिनांक २८-०४-२००९ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले असून या लेखी निवेदनामध्ये त्यांनी विचाराधीन अपील क्रमांक २०८/२००८ हे राजीखुषीने परत घेत असल्याचे म्हटले आहे. खुद्द अपिलार्थीने विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २०८/२००८, दिनांक ०४-०६-२००८ हे खारीज करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०८/२००८, दिनांक ०४-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| औरंगाबाद | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक २८-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. अरुण पंढरीनाथ सोनार, ४०, नेहरुनगर, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. अरुण पंढरीनाथ सोनार, अपिलार्थी
४०, नेहरुनगर, नंदुरबार,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, नंदुरबार, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सुनावणीच्या सुरुवातीस त्यांचे दिनांक २८-०४-२००९ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले असून या लेखी निवेदनामध्ये त्यांनी विचाराधीन अपील क्रमांक २०९/२००८ हे राजीखुषीने परत घेत असल्याचे म्हटले आहे. खुद्द अपिलार्थीने विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २०९/२००८, दिनांक ०४-०६-२००८ हे खारीज करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०९/२००८, दिनांक ०४-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण पंढरीनाथ सोनार, ४०, नेहरुनगर, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. बन्शीलाल रतनलाल लोढा, अपिलार्थी
लोढा सदन, गल्ली नं. ४, १५२५/१,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अभियंता, धुळे महानगरपालिका, धुळे,
जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे,
जिल्हा धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०४-२००९ रोजीचे व आयोगास दिनांक २४-०४-२००९ रोजी प्राप्त झालेले पत्र आयोगासमोर सादर करण्यात आले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने आजचे विचाराधीन अपील चालविण्यामध्ये त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने स्वारस्य नसल्याचे व ते विचाराधीन अपील स्वेच्छेने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीने विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.	अपील क्रमांक २११/२००८, दिनांक १९-०४-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२८-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. बन्शीलाल रतनलाल लोढा, लोढा सदन, गल्ली नं. ४, १५२५/१, धुळे.

२	जन माहिती अधिकारी तथा अभियंता, धुळे महानगरपालिका, धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१२

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. विजय श्रीधर पगारे, अपिलार्थी
१४, समर्थनगर, साक्री रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, पंचायत समिती,
उपविभाग (बांधकाम), धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असून अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता परहस्ते घरी माहितीच्या उत्तराची एक प्रत देण्यात आली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले उत्तर उडवाउडवीचे आहे. जन अपिलीय अधिकारी उत्तर लिहून पंचायत समिती धुळे मार्फत जावक क्रमांकाने निर्णय पाठवतात कसे ? त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे कारण दिनांक ३१-०३-

२००८ अखेर ३,२४,९२३ इतक्या रकमेचे बील अदा करण्यात आले असतांना बिलाचा कागदोपत्री २,२१,३५९ इतका खर्च कसा दाखविण्यात आला ?

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे चांदे येथील स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २००५-०६ मधील अमरधाम या कामाच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाची सद्यस्थिती, एकूण इस्टिमेट, ठेकेदाराचे नांव, कामावरील प्रत्यक्ष खर्च, नोंदणीकृत ठेकेदाराकडून काम करण्यात आले किंवा नाही, काम इस्टिमेटप्रमाणे झाले किंवा नाही, निविदा देऊन ठेकेदार ठरविण्यात आला होता काय, - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढवून अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अमरधाम या कामाचा झालेला खर्च चुकीचा कळविला असून त्यांच्या माहितीप्रमाणे हा खर्च रुपये २,७५,००० इतका आहे. त्यांना या कामाचा खर्च ग्रामपंचायतीकडून पत्राने कळविला गेला आहे. अपिलार्थीस त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ योग्य तो पुरावा देण्याचे अथवा ग्रामपंचायतीच्या सदर पत्राची प्रत दाखविण्याचे सूचित केले असता अपिलार्थीने हा पुरावा त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, नोंदणीकृत ठेकेदारकडून काम करुन घेण्यात आले किंवा नाही, काम इस्टिमेटप्रमाणे झाले आहे किंवा नाही व ठेकेदार निविदा देऊन ठरविण्यात आला होता काय, या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अशा प्रकारची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणे व अर्जदाराच्या अशा प्रकारच्या प्रश्नासंदर्भात स्वतःचे अभिप्राय देणे अथवा कृतीचे समर्थन करणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या या सर्व प्रश्नांना उत्तरे दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती विसंगत वाटण्याचे कारण म्हणजे त्यांना चांदे ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेले पत्र. जिल्हा परिषदेच्या अशा प्रकारच्या कामाच्या कार्यपध्दतीची माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडून घेतली असता, दहा लाख रुपयांपर्यंतची कामे प्राधान्याने सक्षम ग्रामपंचायतींना देण्याचे शासनाचे आदेश असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले व या आदेशातील तरतुदीनुसार चांदे येथील अमरधामचे काम ग्रामपंचायतीला दिले गेले होते असे त्यांनी आयोगास अवगत केले. या कामाचे व्यवस्थापन व खर्चाचे नियंत्रण हे उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर केले जाते. त्यामुळे या कामावर झालेला खर्च हा अधिकृतपणे उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर उपलब्ध होऊ शकतो. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या कामावरील खर्च रुपये २,२१,३५९ इतका झाल्याचे कळविले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी या कामाचे मुल्यांकन रुपये ३,२४,९२३ इतके असल्याचे कळविले आहे. या दोनही रकमेमधील फरकाबाबत जन अपिलीय अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या कामावर अपिलार्थीने ज्या दिवशी माहिती मागितली होती त्या दिवशी रुपये २,२१,३५९ इतका खर्च झाला होता व उर्वरित कामाचे बील ग्रामपंचायतीने त्यावेळी अदा करावयाचे राहिले होते. संभाव्य बिलाची रक्कम लक्षात घेऊन, त्यांनी अपिलार्थीस या कामाच्या मुल्यांकनासंदर्भात अपिलार्थीने मूळ अर्जात मागितली नसतांनाही, माहिती दिली. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेली त्यांची कार्यपध्दत तसेच अपिलार्थी हे त्यांना या कामावर रुपये २,७५,००० इतका खर्च झाल्यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा आयोगास सादर करु शकत नाहीत या बाबी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य

व पूर्ण माहिती मिळाली असल्याने, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पंचायत समितीच्या जावक क्रमांकाने माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ आक्षेप घेतला आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली ही एक प्रशासकीय व्यवस्था होती. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी कशा प्रकारे माहिती दिली हा मुद्दा या प्रकरणी गैरलागू होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देतांना त्यांच्या पदनामाचा उल्लेख केला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे अर्जदारास माहिती देतांना व त्यांच्या अपिलावर निर्णय देतांना त्यांच्या पदनामाचा उल्लेख त्यांनी करावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २८-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय श्रीधर पगारे, १४, समर्थनगर, साक्री रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पंचायत समिती, उपविभाग (बांधकाम), धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. शेख निसार अहमद तांबोळी, अपिलार्थी
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड,
धुळे - ४२४ ००१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
नॅशनल उर्दू हायस्कूल, आझादनगर, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निर्धारित कालावधीमध्ये पूर्ण माहिती दिली नाही. त्यांना प्राप्त झालेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्याचे आदेशित करुनही त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांनी आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २७-०४-२००९ रोजीचे एक पत्र त्यांच्या प्रतिनिधीने सादर केले असून या पत्रासोबत अपिलार्थीने शिक्षणाधिका-यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २१-०४-२००९ रोजीच्या पत्राची प्रत जोडली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना दिनांक २१-०४-२००९ रोजी संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने या प्रकरणी त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. एकबाल नजीर यांच्या पदोन्नतीसंदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०७-२००७ रोजी आपला निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आता दिनांक २१-०४-२००९ रोजी उर्वरित माहिती दिल्याचे व प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्याचे अपिलार्थीचे पत्र आयोगास सादर केले आहे. हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोग कोणतेही आदेश देत नाही. मात्र अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब लावल्याने अध्यक्ष, अंजुमने फरोगे तालीम, मौलवी गंज, धुळे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, अंजुमने फरोगे तालीम यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख निसार अहमद तांबोळी, ३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे - ४२४ ००१.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू हायस्कूल, आझादनगर, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, जेल रोड धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, अंजुमने फरोगे तालीम, मौलवी गंज, धुळे व्दारा, मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू हायस्कूल, आझादनगर, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७६

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. रमेश मोतीराम चौधरी, अपिलार्थी

स्नेहिल ॲपार्टमेंट, ९, यशवंत कॉलनी, रींग रोड,

जळगांव - ४२५ ००१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी संचालक, मधुकर सहकारी साखर कारखाना

मर्यादित, फैजपूर, तालुका यावल, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असून या अर्जाच्या अखेरीस अपिलार्थीने आयोगास, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना त्वरित पुरविण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूपुरःस्सर चुकीची व अपूर्ण माहिती पुरविल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मधुकर सहकारी साखर कारखाना मर्यादित, फैजपूर याचे कार्यकारी संचालक श्री. बोरोले हे कार्यकारी संचालक या पदी

रुजू झाल्यापासून ते दिनांक २४-१०-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने कारखान्याच्या दिनांक २७-०५-२००७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कार्यकारी संचालकांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कार्यकारी संचालक यांच्या वरील वक्तव्याची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात नोंद घेतलेली आहे काय ? कार्यकारी संचालक यांच्या वरील वक्तव्याला संचालक मंडळाची मान्यता आहे काय ? कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी त्यांच्या कार्यकाळात आतापर्यंत किती रुपयांची बिले ॲडजेस्ट केलेली आहेत व हे प्रामाणिकपणाचे लक्षण होते का ? बिलात केलेली ॲडजेस्टमेंट कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीने / मंजुरीने केलेली आहे काय ? बिलाची ॲडजेस्टमेंट कोणकोणत्या पुरवठादारांच्या बिलांत केली त्या पुरवठादारांची नांवे, पत्ते व रक्कम, सदर ॲडजेस्ट बिलाची रक्कम कोणत्या शासकीय अधिका-याला दिली आहे त्या अधिका-याचे नांव, हुद्दा व रक्कम व बिल ॲडजेस्ट करुन शासन दरबारी कोणती कामे करुन घेतली - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे सर्व हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, कारखान्याच्या दिनांक २७-०५-२००७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कारखान्याच्या कार्यकारी संचालकांच्या, दरवर्षी चार ते पाच लाख रुपयांची बिले ॲडजेस्ट केल्याशिवाय शासन दरबारी कोठलेही काम होत नाही, या वक्तव्याची नोंद सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तामध्ये घेण्यात आली नाही. कार्यकारी संचालकाच्या अशा वक्तव्याने संपूर्ण शासन यंत्रणेचे धिंडवडे

काढले गेले आहेत. या प्रकरणी त्यांनी थेट साखर आयुक्तांपर्यंत तक्रार करुनही या मुद्दयावर त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक ०१-०१-२००८ पासून रुजू झाले असून त्यांच्या पूर्वीच्या कार्यकारी संचालकांनी केलेल्या वक्तव्याची त्यांना माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येते, जी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. अपिलार्थीने या चार मुद्दयांव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कोणत्याही निर्णयाबाबत अथवा कृतीबाबत अर्जदारास कारणे व स्पष्टीकरण देणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ते ७ या मुद्दयाव्दारे मागितलेली माहिती मात्र, अपिलार्थीस ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली आहे, ही माहिती त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन घेतल्याचे दिसून येते. अशा प्रकारे अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना देय माहिती पुरविली आहे असे दिसून येत आहे. यासंदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१२-२००७ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. आयोग जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाशी पूर्णपणे सहमत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेश मोतीराम चौधरी, स्नेहिल ॲपार्टमेंट, ९, यशवंत कॉलनी, रींग रोड, जळगांव - ४२५ ००१.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, मधुकर सहकारी साखर कारखाना मर्यादित, जीवरामनगर, न्हावी मार्ग, फैजपूर, तालुका यावल, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७७

निर्णय दिनांक   २८-०४-२००९

१ श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी, अपिलार्थी
३५ ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलनी,
चाळीसगांव रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व विसंगत माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना आता जन माहिती अधिकारी यांनी अचूक व संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगाने आदेशित करावे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कलम २० अन्वये शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केंद्र पुरस्कृत क्षेत्रीय सधन कार्यक्रमांतर्गत स्वच्छतागृह व वर्गखोल्या बांधकामासंदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील उर्दू शाळांच्या संदर्भात

होती. अपिलार्थीने ही माहिती शाळानिहाय मागितली असून प्रत्येक शाळेमध्ये वर्ग व तुकडीनिहाय शाळेत विद्यार्थी संख्या, योजने अंतर्गत एकूण खर्च, बांधकाम केलेल्या खोल्यांची संख्या, बांधकाम पूर्ण झाल्याचे वर्ष, शाळेत उर्दू माध्यमातील शिक्षकांची संख्या व एकूण बांधकाम केलेली स्वच्छतागृहे व त्याचा खर्च या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०७-२००७ रोजी काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नसल्याने व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर ज्ञात झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस लागलीच माहिती पुरविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्रुटी दर्शविल्या आहेत. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी उर्दू शाळेच्या खोल्याबाबत माहिती मागविली होती, मात्र पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये उर्दू हा शब्दच नाही, त्यांनी वर्ग व तुकडीनिहाय माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वर्ग व तुकडीनिहाय माहिती दिली नाही आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये उर्दू माध्यमाच्या शिक्षकांची संख्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती तथापि जन माहिती अधिकारी यांनी ती माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या माहितीचे अवलोकन करता

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर घेतलेले आक्षेप बरोबर असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली मूळ माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय होत आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो न पुरविलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीचा दिनांक १४-०५-२००७ रोजीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना मूळात प्राप्त न झाल्याने व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर ज्ञात झाल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद अपिलार्थीच्या योग्य त्या खंडन अथवा लेखी युक्तिवादाच्या व पुराव्याअभावी आयोग मान्य करीत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी, संस्था अध्यक्ष, मॉयनॉरिटी वेल्फेअर ऑर्गनॉयझ ेशन, ३५ ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७८

निर्णय दिनांक २८-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रामकृष्ण राजाराम घोडेस्वार,<br>मु. पो. कंडारी, तालुका भुसावळ,<br>जिल्हा जळगांव | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, जळगांव | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगांव | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कंडारी, तालुका भुसावळ, जिल्हा जळगांव

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०८-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, वरिष्ठांचा आदेश नसतांना मनाप्रमाणे १७० फूट लांब २ फूट रुंद काँक्रीट केले, ग्रामविकास अधिकारी, सरपंच व सदस्य यांनी लाखो रुपयाची उधळपट्टी केली, त्यामुळे ग्रामविकास अधिका-यावर शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" डॉ. बाबासाहेब आंबेडकर विस्तारीत व्यापारी संकुल ग्रामनिधी निधी ग्रा. पं. कंडारी स. न. २००४-५ उद्‌घाटन दि. १०/९/२००६ दुकान नं. ५४-६० वरच्या मजल्याची R.C.C. परदी ग्रा. पं. कोणत्या कारणास्तव तोडत आहे ? ही शासकिय मालमत्तेची उधळपट्टी करीत आहे. तरी चौकशी करुन ग्रा. पं. कंडारीचे पदाधिकारी यांनी वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी घेतली का ? याची माहिती द्यावी हीच नम्र विनंती. "

अपिलार्थीने हा अर्ज प्रथमतः जिल्हाधिकारी, जळगांव यांना उद्देशून केला होता. मात्र तो अर्ज त्यांनी पंचायत समिती, भुसावळ येथे दाखल केला. पंचायत समितीकडून दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या-कडे पाठविण्यात आला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००७ पर्यंत संपूर्ण माहिती पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असतांना त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टव्दारे माहिती का पाठविली असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या माहितीचा व्यक्तिशः स्वीकार केला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचे सांगितले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. आयोगास त्यांनी फॅक्सव्दारे सदर सुनावणी पुढे ढकलण्यासंदर्भात विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीची ही विनंती अमान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला त्यावेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ऑडिट पथकाच्या ताब्यात असल्याने ते अपिलार्थीस माहिती वेळेत देऊ शकले नाहीत. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आर. सी. सी. पडदी ग्रामपंचायत कोणत्या कारणास्तव तोडत आहे, ग्रामपंचायत कंडारी यांनी वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी घेतली आहे काय, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत आहे. ही " माहिती " अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या व्याख्येप्रमाणे अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे कारण अथवा स्पष्टीकरण मागता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, ती ज्या स्वरुपात माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सिमीत प्रक्रीया अभिप्रेत आहे हे पाहता या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिका-याकडे प्रथमतः मागणी केलेल्या माहितीचा समावेश होत नाही असे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिका-याकडे प्रथमतः मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी मूळातच विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक १२-०८-२००७ रोजी पुरविली आहे. त्यात आर. सी. सी. पडदी तोडण्याचा ग्रामपंचायतचा जो ठराव झ ाला होता त्या ठरावामध्ये ही आर. सी. सी. पडदी तोडण्याची कारणे नमूद केली केली आहेत. या ठरावाची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे व दिनांक १६-०८-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली आहेत. हे पाहता अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा जन माहिती अधिकारी यांचा कोणत्याही प्रकारचा असद्हेतू होता असे आयोगास आढळून येत नाही. तथापि याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याच्या समर्थनार्थ केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. कारण जरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ऑडिट पथकाच्या ताब्यात

होती तरी ही माहिती, ऑडिट पथकाकडून घेऊन, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अर्जांवर अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २८-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामकृष्ण राजाराम घोडेस्वार, मु. पो. कंडारी, तालुका भुसावळ, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कंडारी, तालुका भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुसावळ, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७९

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. गोकुळ शंकर शिंपी (सोनवणे), अपिलार्थी
शंकरव्दार, मु. पो. जैताणे, तालुका साक्री,
जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
संत नामदेव महाराज एज्युकेशन ट्रस्ट संचलित आदर्श हायस्कूल,
लंगडी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या आदेशाविरुध्द अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि दिनांक ०८-०९-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश निर्गमित केला नसून या दिवशी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे संत नामदेव महाराज एज्युकेशन ट्रस्ट तळोदे या संस्थेसंदर्भात एकूण सात मुद्दयांवर काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी संबंधित संस्थेच्या अध्यक्षाकडे प्रथम अपील करण्याचे त्यांच्या दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले होते. मात्र अपिलार्थीने तशा प्रकारची कार्यवाही केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्यप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे, हा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोकुळ शंकर शिंपी (सोनवणे), शंकरव्दार, मु. पो. जैताणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत नामदेव महाराज एज्युकेशन ट्रस्ट संचलित आदर्श हायस्कूल, लंगडी, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८०

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. गणेशराव भास्करराव विंचूरकर (देशमुख), अपिलार्थी
ओम शांती निवास, कचेरी चौक, शिंदखेडा,
तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत शिंदखेडा,
तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),
पंचायत समिती, शिंदखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-११-२००७ रोजी झालेल्या सुनावणीनंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अंतीमतः अशी विनंती केली आहे की, नियमानुसार माहिती अधिका-यावर दंडात्मक कारवाई होऊन न्याय मिळावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिंदखेडा शहरातील कचेरी चौकामधील ग्रामपंचायतच्या मालकीच्या गावठाणातील जागेवर असलेल्या अनिल इलेक्ट्रॉनिक्स या दुकानासंदर्भात सन १९८० ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले. या अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे. या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००७ रोजी विनामूल्य माहिती दिल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात ग्राम विकास अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०७-११-२००७ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांच्या पत्रावर पोचसही केल्याचे दिसून येत आहे. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याची कारणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी आयोगास त्यांच्याकडे तीन ग्रामपंचायतीचा कार्यभार असल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागल्याचे, संबंधित जन माहिती अधिकारी हे निलंबीत असल्याचे, व अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी स्वतः कधीही त्यांच्याकडे उपस्थित झाले नाहीत असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ

अर्जानुसार त्यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०७-११-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना दिनांक १५-१२-२००७ पर्यंत कोणतीही माहिती दिली नसल्याचे असत्य विधान केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती यांची पाहणी करता, ही माहिती मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही उपस्थित झाले नाहीत, या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा, त्यांच्याकडे तीन ग्रामपंचायतीचा कार्यभार असल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत, हा युक्तिवाद आयोग अमान्य करत असून या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आवश्यक माहिती, त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील आयोगाकडे करण्यापूर्वीच प्राप्त झाल्याचे सिध्द झाल्याने त्यानंतर माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेशराव भास्करराव विंचूरकर (देशमुख), ओम शांती निवास, कचेरी चौक, शिंदखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत शिंदखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती, शिंदखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २६८१/०७, २६८२/०७, २६८३/०७, २६८४/०७ व २६८५/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८१, २६८२, २६८३, २६८४ व २६८५

निर्णय दिनांक २८-०४-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २६८१/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी

अपील क्रमांक २६८२/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी,
जिल्हा परभणी

अपील क्रमांक २६८३/०७

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ,

जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी

अपील क्रमांक २६८४/०७

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड,

जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय गंगाखेड, जि. परभणी

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी

अपील क्रमांक २६८५/०७

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर,

जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २८-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २६८१/०७ व २६८२/०७ शी संबंधीत जन माहिती अधिकारी, अपील क्रमांक २६८३/०७, २६८४/०७ व २६८५/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपील क्रमांक २६८१/०७ व २६८२/०७ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेली एकूण पाच स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विहित मुदत संपल्यानंतरही माहिती प्राप्त करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ झाली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपिले केली असतांना देखील त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०४-२००४ ते ३०-०४-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सर्व जन अपिलीय अधिका-यांकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी एकाच दिवशी पाच स्वतंत्र प्रथम अपिले पोस्टाने पाठवून दिली. मात्र या अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी वगळता उर्वरित चारही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक १५-०६-२००७ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्याचे संबंधितांनी आयोगास अवगत केले. तहसीलदार, परभणी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०६-२००७ व दिनांक १०-०७-२००७ रोजी

सुनावणीसाठी बोलाविले असता सदर सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी उपलब्ध करुन देण्याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांना व उर्वरित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त न झाल्याने आणि या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटत असल्याने सर्व जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय मान्य न झाल्यास, हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली पाचही व्दितीय अपिले (अपील क्रमांक २६८१/०७, २६८२/०७, २६८३/०७, २६८४/०७ व २६८५/०७) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक २६८१/०७, २६८२/०७, २६८३/०७, २६८४/०७ व २६८५/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद

दिनांक २८-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५४

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. सुभाष बी. सावळे, अपिलार्थी

शिक्षक कॉलनी, ४९, नंदुरबार,

जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता (यांत्रिकी), जिल्हा परिषद, नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व माहिती न देता माहिती दिल्याचे खोटे पत्र व कार्यालयाचा खोटा पुरावा तयार केला. त्यांनी सदर पत्र आर. पी. ए. डी. ने पाठविल्याचे भासविले मात्र जावक रजिस्टरमध्ये तशी नोंद नाही व पोस्टाचा

दाखला नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीची दिशाभूल केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयाकडे ब्राम्हणी बोअरवेलतर्फे केलेल्या तक्रारीच्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग, नंदुरबार यांनी त्यांच्या दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संदर्भिय कामाची चौकशी चालू असल्याचे कळविले व चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस अलहिदा कळविण्याचे आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी त्यांच्या दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या चौकशीचे काम कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडे सोपविण्यात आले असल्याचे व यासंदर्भात माहिती हवी असल्यास ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रानंतर अपिलार्थी व जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्यामध्ये काही पत्रव्यवहार झाला व अंतीमतः अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाबद्दल घेतलेल्या आक्षेपांच्या पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, सदरच्या प्रकरणाची चौकशी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद यांनी सोपविली होती. तथापि या प्रकरणी चौकशी वगैरे न होता या चौकशी प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यातील टिपणीवरुन उप अभियंता श्री. मोरे यांना ब्राम्हणी बोअरवेल प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सेवेतून निलंबीत केले होते, यापेक्षा कोणतीही जास्त माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००७ रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता दिल्याचे खोटे पत्र दिले, कार्यालयीन खोटा पुरावा तयार करणे, जावक रजिस्टरमध्ये कायदेशीर नोंद न घेणे अशा प्रकारचे आक्षेप जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयासंदर्भात घेतले आहेत, मात्र यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास आज सुनावणी होईपर्यंत कोणत्याही स्वरुपात सादर केलेला नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, आज त्यांच्याकडे त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्या व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

अपिलार्थीने ज्या विषयी माहिती मागविली आहे त्या विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निर्णय घेतला आहे. या सर्व बाबी व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर अपिलार्थीची स्वाक्षरी नाही, हे सर्व एकत्रितपणे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना असे आदेशित करण्यात येते की, आज रोजी आयोगाच्या समोर सुनावणीसाठी उपस्थित असलेले उप अभियंता यांना या प्रकरणाची कोणतीही माहिती नव्हती. त्यांनी आयोगाने लेखी पत्राव्दारे सूचना देऊनही त्यांच्या कार्यालयाची आवक-जावक नोंदवही आयोगासमोर दाखविण्यासाठी आणली नाही. इत:पर आयोगाकडे सुनावणीसाठी उपस्थित राहतांना अशा प्रकारच्या अकार्यक्षम अधिका-यांना पाठविण्याची तसदी कृपया मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घेऊ नये व इत:पर आयोगासमोर सुनावणीसाठी प्रत्येक प्रकरणाशी संबंधित अधिकारी वैयक्तिकरित्या उपस्थित राहतील याची त्यांनी दक्षता घ्यावी.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष बी. सावळे, शिक्षक कॉलनी, ४९, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (यांत्रिकी), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५५

निर्णय दिनांक २९-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सखाराम बावा गावीत,<br>मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर,<br>जिल्हा नंदुरबार | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, मोठे कडवान,<br>तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी आदेश देऊनही ग्रामसेवकाने माहिती न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१ ते २००६ या कालावधीमधील काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती वसुलीचा जमाखर्च, स्टेट बँक शाखा विसरवाडी येथील खातेपुस्तकाच्या प्रती, जिल्हा सहकारी बँक शाखा विसरवाडी येथील खातेपुस्तकाच्या प्रती इ. - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना उद्देशून केला होता. त्यांनी सदरचा अपील अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती जे या प्रकरणी अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. मात्र प्रत्यक्षतः ही सुनावणी झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती दिनांक १७-१०-२००७ रोजी त्यांना सशुल्क प्राप्त झाल्या-प्रीत्यर्थ अपिलार्थीचे पोच पत्र आयोगास सादर केले आहे. या पोच पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना सर्व माहिती प्राप्त झाली असून त्यांचे पूर्ण समाधान झाले आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क रुपये ४३ इतके दिनांक १७-१०-२००७ रोजी चलनाव्दारे (स्टेट बॅक ऑफ इंडिया) स्वीकारुन अपिलार्थीस कथित माहिती दिली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती मिळण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी दिनांक २५-०३-२००७ रोजी व्यपगत होऊन, अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक २७-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४३ रुपये इतके शुल्क आकारुन त्यांना माहिती दिली आहे, ही त्यांच्या हातून झालेली अनियमितता आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४३ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित

केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द केला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना, संबधीत ग्रामसेवक श्री. एस. व्ही. पाटील यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४३ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना, संबंधीत ग्रामसेवक श्री. एस. व्ही. पाटील यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सखाराम बावा गावीत, मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५६

निर्णय दिनांक २९-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. इसाक बाबू गावीत,<br>मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर,<br>जिल्हा नंदुरबार | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>नंदुरबार | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर व ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, यांच्याकडून माहिती न मिळाल्याने आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांच्याकडे सन २००१ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ग्रामीण रोजगार हमी योजना, बाराव्या वित्त आयोगाअंतर्गत मंजूर व केलेली कामे, ग्रामीण पाणीपुरवठा योजनाअंतर्गत असलेली कामे, जवाहर योजनेची कामे यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या सर्व योजना अंतर्गत एकूण मंजूर कामे, केलेली कामे, त्यावर झालेला खर्च व विनियोग अहवाल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांनी त्यांच्या- कडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बांधकाम विभाग / लघुसिंचन विभाग व संबंधित ग्रामसेवक यांच्याकडे स्वतंत्ररित्या माहिती अधिकारामध्ये मागवावी असे सूचित करुन अपिलार्थीस त्यांचा दिनांक १३-०२-२००७ रोजीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर ज्यांची या प्रकरणी अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे त्यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. गट विकास अधिकारी यांनी या अपील अर्जावर दिनांक १९-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे अथवा या सुनावणीत कोणता निर्णय झाला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १७-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीचे पोच पत्र आयोगास सादर केले आहे. या पोच पत्रासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३४ रुपये इतके शुल्क आकारुन दिनांक १७-१०-२००७ रोजी दिलेली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याची अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत या प्रकरणी दिनांक १५-०३-२००७ रोजी व्यपगत झाली आहे. मात्र ही मुदत व्यपगत होऊनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ३४ रुपये इतके शुल्क संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आकारल्याचे या प्रकरणी सप्रमाण सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती, सशुल्क देण्याची मुदत व्यपगत झाल्यानंतर शुल्क आकारुन माहिती देण्याची कृती, सर्वथा गैर व चुकीची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३४ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्या जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांच्याकडे केला होता त्यांनी हे प्रकरण आवश्यक त्या गांभीर्याने हाताळले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कारवाई करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या प्राधिकरणाचा दुसरा भाग असलेल्या संबंधित प्राधिकरणाकडे, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून, पाच दिवसाच्या आत हस्तांतरीत करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती न करता अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून परस्पर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. त्यांची ही कृती नियमबाह्य असून या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. संबंधित ग्रामसेवकाकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस विलंबाने सशुल्क माहिती देऊन संबंधित ग्रामसेवकाने आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे, त्यामुळे या प्रकरणी संबंधित ग्रामसेवक व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर (तत्कालीन जन माहिती अधिकारी) या दोघांवरही प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी दिनांक १७-१०-२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४३ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना संबंधीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांच्या-वर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. इसाक बाबू गावीत, मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५७

निर्णय दिनांक   २९-०४-२००९

१ सौ. इलाबाई डी. वळवी, — अपिलार्थी
मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा
नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नंदुरबार

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती, गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश असूनही, ग्रामसेवक श्री. एस. यू. पाटील यांनी न दिल्याने, आयोगाकडे केले असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९६ ते २००५ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायत कडवान येथील सन १९९६ ते २००० या काळातील ग्रामपंचायत निवडणूक सदस्य यादी, सरपंच / उप सरपंच निवडणूक इतिवृत्त व ग्रामपंचायत सदस्यांनी दिलेल्या राजीनामाच्या अर्जाची नक्कल, अर्ज मंजुरीच्या आदेशाची नक्कल आणि सन २००१ ते २००५ या कालावधीतील ग्रामपंचायतच्या सदस्यांची यादी, सरपंच / उप सरपंच निवडणूक इतिवृत्त - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २४-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, अपिलार्थीने कोणती माहिती मागितली आहे त्याचा खुलासा त्यांच्या अर्जावरुन होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्याकडे केले होते. त्यांनी अपिलार्थीचे सदर अपील दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांच्याकडे पाठविले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १६-१०-२००७ रोजीचे पोच पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे पूर्ण समाधान झाले आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही असे अपिलार्थीने नमूद केले आहे.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३७ रुपये इतके शुल्क आकारुन दिलेली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने सदरचा अर्ज योग्य त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याचे दिसून येते. या अर्जाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही स्पष्ट आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०६-२००७ रोजी पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद पूर्णपणे अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा त्यांना बोध होत नसल्याचे या पत्रामध्ये म्हटले आहे. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपात, विशिष्ट अशी माहिती मागविल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २४-०६-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या पत्राव्दारे एक प्रकारे टाळाटाळ केल्याचेच जास्त प्रमाणात दिसून येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे माहिती प्राप्त झाली असली तरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देणे भाग असतांना देखील त्यांनी माहितीपोटीचे ३७ रुपये इतके शुल्क अपिलार्थीस आकारले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३७ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. येथे अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी शुल्क आकारले आहे, या बाबीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

त्याचबरोबर अपिलार्थीच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न देऊन त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना गट

विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर यांच्या या प्रकरणातील त्यांच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३७ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना संबंधीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २९-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. इलाबाई डी. वळवी, मु. पो. मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोठे कडवान, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५८

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. अे सी कुवर सुकलाल मंगा, — अपिलार्थी
मु. पो. कहाटूळ, तालुका शहादा,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,
जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कहाटूळ, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याने त्यांनी सदर अपील अर्ज सादर केला आहे व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

इंदिरा आवास घरकूल योजनेअंतर्गत सन २००० ते २००१ या कालावधीशी संबंधित दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - पती पत्नी एकाच घरात दोघांच्या नावे अनुदान देता येते का ? व अपिलार्थीने दिनांक २१-०५-२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिनांक १०-०५-२००७ रोजी पुरविली गेली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली असल्याने त्यांनी, अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस यापूर्वीच माहिती दिल्याचे कळविले. अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजी पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये काम करण्यापूर्वीचे फोटो व काम झ ाल्यानंतरचे फोटो त्यांनी अपिलार्थीस पुरविले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. त्यांनी सुनावणी न घेण्याची कारणे ते आता आयोगास अवगत करु शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली असून त्यातील पहिला मुद्दा, " पती पत्नी एकाच घरात दोघांच्या नावाने अनुदान देता येते का **?** " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती "

या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देण्याचे, या प्रक्रियेमध्ये समाविष्ट आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण अथवा मत अपेक्षित करणारी माहिती मागणे अपेक्षित नाही, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील दुसरा मुद्दा, " त्यांनी दिनांक २१-०५-२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कारवाई " ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होते. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले उत्तर चुकीचे आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगळे व स्वतंत्र उत्तर देणे अपेक्षित आहे. अशा प्रकारे पूर्वीचा संदर्भ देऊन विचाराधीन अर्जासंदर्भात माहिती पूर्वीच दिली असल्याचा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या अर्जावर अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंतीम कारवाई झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा दिनांक २१-०५-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ते अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत त्यांच्या कार्यालयाने या अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांशी केलेल्या सर्व पत्रव्यवहारांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधानी नाहीत. अपिलार्थीच्या मते जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या फोटोची प्रत त्यांनी ज्या लाभार्थ्यांविरुध्द तक्रार केलेली होती त्या लाभार्थ्यांशी संबंधित नसून त्यांनी तक्रार केल्याप्रमाणे श्री. इश्वर मंगा भिल यांनी घर दुरुस्तीचे अनुदान प्राप्त करुन घेऊन घराची कोणतीही दुरुस्ती केली नाही व शासकीय रकमेचा गैरवापर केला आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत अपिलार्थीसह पूर्वनियोजित वेळी संबंधित स्थळास या प्रकरणी भेट देऊन आपला निर्णय घ्यावा.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार न करता त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अे सी कुवर सुकलाल मंगा, मु. पो. कहाटूळ, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कहाटूळ, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५९

निर्णय दिनांक २९-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. वसंतराव जेसा चव्हाण,<br>रा. नितीननगर, शहादा,<br>जिल्हा नंदुरबार | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा समन्वयक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा,<br>जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा,<br>जिल्हा नंदुरबार | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा, जिल्हा नंदुरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ११-०८-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या, या प्रकरणी दिनांक २०-०६-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अभिप्रायाबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००२ या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत त्यांचा मुलगा राहूल चव्हाण याच्या इयत्ता पाचवी व सहावी मध्ये शिकत असतांनाची या वर्षाच्या प्रगती पुस्तकाची प्रत त्यांनी लेखी अर्ज देऊनही मागितली असतांना त्यांना मूळ प्रगती पुस्तक मिळाले नसल्याने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस यापूर्वीच योग्य वेळी मूळ प्रगतीपत्रक देण्यात आल्याचे सूचित करुन अपिलाथीने मागणी केलेल्या प्रगतीपत्रकाची दुय्यम प्रत या पत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन त्यांनी हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे सिध्द होत आहे. मात्र अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २७-०४-२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरासारखे उत्तर अपिलार्थीस दिले व अपिलार्थीस या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे त्यांनी अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली नाही व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या मुलाचे सन २०००-०१ ते २००१-०२ या कालावधीतील मूळ प्रगतीपुस्तक हवे आहे. मात्र हे प्रगतीपुस्तक अपिलार्थीच्या मुलास त्याचवेळी त्या त्या वर्षाच्या निकालाबरोबर देण्यात आले आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची दुय्यम प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राने पाठविली असून हा पत्रव्यवहार त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे केला आहे. अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाव्दारे माहितीची मागणी केली असता अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने माहिती पाठविण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केली नाहीत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या विद्यालयाच्या प्रचलीत संकेताप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या प्रगतीपत्रकाची मूळ प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाही, मात्र या प्रगतीपुस्तकाची दुय्यम प्रत साक्षांकीत करुन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस देऊ शकतील. आज रोजी सुनावणीच्या वेळी या प्रती अपिलार्थीस तात्काळ देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत आर. पी. ए. डी. व्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत आर. पी. ए. डी. व्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद

दिनांक २९-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंतराव जेसा चव्हाण, रा. नितीननगर, शहादा, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६०

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. वसंतराव जेसा चव्हाण, अपिलार्थी
रा. नितीननगर, शहादा,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा समन्वयक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा,
जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा, जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १९-०८-२००६ रोजी नोंदविलेले व दिनांक १०-०९-२००८ रोजी फेरनोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलावर मुदतीनंतरही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी हे अपील केले असून त्यांचे सेवापुस्तक खाजगी कामासाठी

आवश्यक असल्याने व ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत न मिळाल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवापुस्तकाच्या मूळ प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीस सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेले दस्तऐवज (सेवा पुस्तक मूळ प्रत ) महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीनुसार देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली होती. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार हे सक्षम अपिलीय अधिकारी आहेत व याच पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक २७-०४-२००६ रोजी दिलेल्या पत्रातील मजकुराचा पुनरुच्चार केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली होती. तसेच त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची फी भरण्याची त्यांची तयारी या अर्जामध्ये त्यांनी दाखविली होती. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली नाही अथवा त्यांना देय असलेल्या माहितीसंदर्भात कुठलेही शुल्क अथवा तद्अनुषंगीक माहिती कळविली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राने अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००६ रोजी अर्जास जरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेल्या विनंतीप्रमाणे दिलेला नाही. अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली असता ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली व यावर अपिलार्थीने संशय व्यक्त केला आहे. अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना सदरचे पत्र प्राप्त झाले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे हे पाहता पोस्टाकडून जन माहिती अधिकारी यांचे पाठविलेले पत्र गहाळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ सेवा पुस्तकाची प्रत मागितली होती. तथापि महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील कलम ४८ अन्वये कोणताही शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, त्याने राजीनामा दिल्यानंतर किंवा त्याला कार्यमुक्त करण्यात आल्यानंतर त्यांचे सेवा पुस्तक किंवा सेवापट त्याला परत करण्यात येऊ नये अशी स्पष्ट तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीची विनंती जन माहिती अधिकारी यांना मान्य करता येणार नाही हे उघड आहे. तथापि अपिलार्थीची विनंती अमान्य करण्यात आली असल्याचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत टपालाने पाठविले नाही एवढीच त्रुटी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून राहून गेल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याऐवजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पाठविल्याचे समर्थन करतांना जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या संस्थेला आता नॉनसॅलरी ग्रॅन्ट मिळत नसल्याने त्यांनी हा मार्ग अवलंबिला. याच पुढे त्यांनी असे स्पष्ट केले की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे त्यांना माहिती देण्याची ते कार्यवाही करतात. अर्जदारास माहिती देतांना संस्थेच्या ग्रॅन्टच्या उपलब्धतेचा, माहिती देण्यासाठी लागणा-या खर्चाचा कोणताही संबंध येणार नाही याची दक्षता मूळात माहिती अधिकार अधिनियमामध्ये घेतली गेली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी जर अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून विहित मुदतीत कळविले असते तर कदाचित अपिलार्थीस ज्या माध्यमाव्दारे माहिती अपेक्षित आहे त्या माध्यमाव्दारे ती प्राप्त होऊ शकली असती. इत:पर जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची चूक होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवा पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी लिहिलेल्या दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राची व त्यासोबत अपिलार्थीच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत ही माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या पत्राची व त्यासोबत अपिलार्थीच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंतराव जेसा चव्हाण, रा. नितीननगर, शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २६६१/२००७, २६६२/२००७, २६६३/२००७ व २६६४/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६१, २६६२, २६६३ व २६६४

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. यादव बाबुलाल बुवा, (पत्रकार) अपिलार्थी

कार्यालय, प्रकाशा रोड, पटेल टेन्टच्या जवळ, शहादा,

जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ अपील क्रमांक २६६१/२००७

जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा,

जिल्हा नंदुरबार

२ अपील क्रमांक २६६२/२००७

जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी,

जिल्हा नंदुरबार

३ अपील क्रमांक २६६३/२००७ व २६६४/२००७

जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव,

जिल्हा नंदुरबार

अपील क्रमांक २६६१/०७, २६६२/०७, २६६३/०७ व २६६४/०७ प्रतिवादी

जन अपिलीय अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,

तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार

## <u>निर्णय</u>

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने त्यांचे दिनांक २९-०४-२००९ रोजीचे पत्र राज्य माहिती आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली विचाराधीन व्दितीय अपिले मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी सदरचे निवेदन राजीमर्जीने व पूर्ण होशहवासमध्ये केले असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांची आयोगाकडे दाखल केलेली विचाराधीन व्दितीय अपिले मागे घेतली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन चारही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक २६६१/०७, दिनांक ०३-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २६६२/०७, दिनांक ०३-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक २६६३/०७, दिनांक ०३-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

४. अपील क्रमांक २६६४/०७, दिनांक ०३-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. यादव बाबुलाल बुवा, (पत्रकार) कार्यालय, प्रकाशा रोड, पटेल टेन्टच्या जवळ, शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, धडगांव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८६

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, अपिलार्थी
रा. नई आबादी, मुदखेड, तालुका मुदखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीचे दिनांक २८-०४-२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना परस्पर प्राप्त झाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे.

अपिलार्थीच्या या पत्राचा विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.	अपील क्रमांक २६८६/२००७, दिनांक २६-१०-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२९-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, रा. नई आबादी, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८७

निर्णय दिनांक २९-०४-२००९

१ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, अपिलार्थी
रा. नई आबादी, मुदखेड, तालुका मुदखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर,
तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी रितसर अर्ज दिनांक १४-०५-२००७ रोजी केला असता, माहिती देण्यासाठी त्यांनी जाणुनबुजून टाळाटाळ केल्यामुळे, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर यांच्याकडे दिनांक १४-०७-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि अपिलार्थीला लेखी जबाब नोंदविण्याची संधी न देता जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय देऊन त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावरुन व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०५-२००७ रोजी पाठविला होता. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता एकतर्फी निर्णय दिल्याने अपिलार्थी हे व्यथित झाल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. सदर सुनावणीची नोटीस अपिलार्थीस प्रस्तावित सुनावणीच्या आधी किमान एक आठवडा आधी प्राप्त होईल असे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, रा. नई आबादी, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना, अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ३२१/०८ व ३२२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२१ व ३२२

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, अपिलार्थी
रा. पी. डी. देशमुख हॉस्पिटल समोर, ईतवारा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा,
जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून जास्तीचे शुल्क आकारुन भयभीत केले व त्यांची दिशाभूल केली. या कारणावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली असता अपिलार्थीस बोलावून घेऊन

सुनावणी न घेता त्यांनी अपिलार्थीची प्रथम अपील प्रकरणी निर्णय देणे प्रलंबीत ठेवल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, विचाराधीन अपील प्रकरणांशी संबंधित प्रथम माहितीसाठीचे मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-०७-२००७ रोजी केले असून यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली व दिनांक ०३-०१-२००८ या एकाच दिवशी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जांवर निर्णय न दिल्याचे नमूद करुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत. अशा प्रकारच्या साधर्म्यसदृश बाबी पाहून या प्रकरणी एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या दोनही अपील प्रकरणी दिनांक २०-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे (अपील क्रमांक ३२१/२००८ या प्रकरणी) त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, त्रयस्थ पक्ष तीन अर्धघाऊक रॉकेल विक्रेते १) श्री. व्ही. व्ही. ताडकळसकर, ताडकळस, २) श्री. इरवंत बापुआप्पा कु-हे, पुर्णा व ३) श्री. अबुबकर तारमहंमद, पूर्णा यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती, पुरवठा निरीक्षक यांच्याकडून तपासणी झालेल्या मासिक अहवालाच्या सत्यप्रती व शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल टँकर पोच पावत्यांच्या सत्यप्रती, इत्यादी बाबत दिनांक ०१-०४-१९९० ते ३०-०६-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या अपील क्रमांक ३२२/२००८ शी संबंधित प्रथम अर्जाव्दारे पूर्णा तालुक्यातील एकूण किरकोळ रॉकेल परवानाधारक व रॉकेल हॉकर्स यांची नांवे, पत्ते व परवाना, शासनाकडून त्यांना देण्यात आलेले रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती इत्यादी बाबत दिनांक ०१-०४-१९९७ ते ३०-०६-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपील क्रमांक ३२१ च्या संदर्भात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १,२४,०७० व अपील क्रमांक ३२२ च्या संदर्भात रुपये ३,७६,६२२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदरचे शुल्क अवाजवी वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या दोनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१२-२००७ रोजी निर्णय

देऊन अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्या कारणाने अपिलार्थीची अपिले फेटाळून लावली. हे दोनही निर्णय अपिलार्थीस दिनांक २०-१२-२००७ रोजी प्राप्त झाल्या-चा पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केला. या सुनावणीच्या निर्णयाचे अवलोकन करता अपिलार्थी हे या सुनावणीसाठी दिनांक ०३-१२-२००७ रोजी हजर राहिले असल्याचे दिसून येत आहे. एवढे असूनही अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास बोलावून घेऊन सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्याचे असत्य विधान केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा त्यांच्याकडे भरणा न केल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही असा युक्तिवाद केला व त्याचबरोबर अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेली दिनांक ०५-०१-२००८ रोजीची दोन पत्रे आयोगास दाखविली. या पत्रांमध्ये अपिलार्थीने त्यांना तहसील कार्यालयातून विना शुल्क माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या दोनही अपील प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे व योग्य पध्दतीने दिला आहे. मात्र अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी हजर राहूनही व अपिलार्थीस सुनावणीचा निर्णय माहिती असूनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर कोणताही निर्णय दिला नाही असे असत्य विधान केले आहे व त्याचबरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती दिनांक ०५-०१-२००८ रोजी विनामूल्य प्राप्त झाल्याचे विधानही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या पत्रावरुन दिसून येत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीचे वर्तन अत्यंत संशयास्पद असल्याचे आयोगास आढळून आले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास आवश्यक तो

प्रतिसाद दिला आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३२१/२००८, दिनांक ०३-०१-२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ३२२/२००८, दिनांक ०३-०१-२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक ३०-०४-२००९

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, रा. पी. डी. देशमुख हॉस्पिटल समोर, ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२३

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, अपिलार्थी
रा. पी. डी. देशमुख हॉस्पिटल समोर, ईतवारा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-०४-२००९ रोजीचे शपथपत्र आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सादर करण्यात आले असून या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ३२३/२००८ हे ते परत घेत असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक ३२३/२००८, दिनांक ११-०१-२००८ हे खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३२३/२००८, दिनांक ११-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, रा. पी. डी. देशमुख हॉस्पिटल समोर, ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६५

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. जुलाल बळीराम वाघ,<br>राऊळवाडी, चितोड रोड, धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता,<br>(बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, धुळे | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पंचायत समिती, धुळे | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, धुळे क्रमांक २ |
| | जन अपिलीय अधिकारी | : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती देण्यात आली नाही असा अभिप्राय नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

या अर्जाबरोबर अपिलार्थीने दिनांक २६-१२-२००७ रोजी आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र यासोबत जोडले असून या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, माहिती अधिका-याने पूर्णपणे माहिती दिली

नाही. अपिलीय अधिका-याने देखील अपिलासंदर्भात गांभीर्याने विचार केला नाही, त्यामुळे पूर्ण माहिती मिळण्यापासून ते वंचित राहिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाळा नं. २८ (जुने नाके) ते सुरत बायपास करवसुली महानगरपालिका जकात नाका पर्यंतची काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपरोक्त (चितोड रस्ता) आपल्या जिल्हा परिषद विभागाच्या अंर्तगत आहे काय ? असल्यास या रस्त्याचे काम यापूर्वी कोणत्या वर्षी झाले आहे ? काम झालेला रस्ता सुव्यवस्थित राहण्यासाठी त्याचे आयुष्य किती असते ? - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरचा अर्ज उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद धुळे यांचे कार्यालय यांना उद्देशून केला होता. मात्र प्रत्यक्ष अपिलार्थीने सदर अर्ज उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग १ धुळे यांच्याकडे केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती देऊन अपिलार्थीस त्यांनी ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली होती तो रस्ता दिनांक २६-०७-२००२ पासून धुळे कन्स्ट्रक्शन सब डिव्हीजन या विभागाकडे असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या- कडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज पंचायत समिती, धुळे यांना उद्देशून केला. हा अर्ज उप अभियंता जिल्हा परिषद उपविभाग १ धुळे यांच्याकडे म्हणजेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच दिवशी प्राप्त झाल्याचे दिसून येते. मात्र या अपील अर्जावर कथित अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३१-०८-२००७ रोजी सदरचा रस्ता त्यांच्याकडे त्यांच्या अधिपत्याखाली नसल्याचे कळवून अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर व अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील तीनही मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागविली आहे. तथापि मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील उत्तर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या- कडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने " या रस्त्याचे काम यापूर्वी कोणत्या वर्षी झाले आहे ? " अशी माहिती मागविली आहे. यावरुन अपिलार्थीस या रस्त्याच्या कामाविषयी माहिती हवी असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रस्त्याचे काम म्हणजे नेमके कोणते काम याचा विशिष्ट उल्लेख या अर्जामध्ये केलेला नाही. रस्त्याच्या कामाची देखरेख, दुरुस्ती, मूळ बांधकाम, नियमित देखरेख, रस्त्याचे मूळ बांधकाम असे रस्त्याच्या कामाचे अनेक प्रकार असून त्यापैकी नेमक्या कोणत्या प्रकारच्या कामाची माहिती अपिलार्थीस हवी आहे याचा बोध अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ वर त्यांनी मागितलेली माहितीवरुन होत नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे या ठिकाणी स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे काम झालेला रस्ता " सुव्यवस्थितीत राहण्यासाठी त्याचे आयुष्य किती असते " या मुद्दयावर माहिती विचारली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली या मुद्दयावरील माहिती म्हणजे जन माहिती अधिकारी यांचे मत होय. ते माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे ज्या प्रकारची माहिती मागविली आहे त्याचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे वैयक्तीक अभिप्राय अपेक्षित असल्याचे दिसून येते. रस्त्याचे आयुष्यमान ठरवितांना अनेकविध बाबींचा त्यामध्ये विचार करावा लागतो. ' रस्त्याचे नेमके आयुष्य किती ' ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चित स्वरुपात त्याच्या प्रमाणीकरणाअभावी कधीही उपलब्ध असू शकत नाही, कारण रस्त्याचे आयुष्य वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असते. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती देखील वरीलप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया त्यामध्ये अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत, अभिप्राय, स्पष्टीकरण व कारणे अपेक्षित करणारी माहिती मागविणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबधित माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपेक्षित माहितीचे पृथक्करण केल्यास अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नसल्याने अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ संदर्भात जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन केले असता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज उप अभियंता जिल्हा परिषद, उपविभाग धुळे यांच्याकडे केला आहे. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडे, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही व केवळ अपिलार्थीस हा रस्ता त्यांच्या ताब्यात नाही असे कळविले आणि आपले काम झाले समजून पुढे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर देखील, जरी अपिलार्थीने चुकीच्या अपील प्राधिकरणा-कडे अपील केले असले तरीही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संबंधित अपील प्राधिकरणाकडे पाठविणे हे त्यांचे कर्तव्य होते. मात्र ते त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे पार पाडल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे न पाठवून व त्याव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग करुन व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जुलाल बळीराम वाघ, राऊळवाडी, चितोड रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, धुळे क्रमांक २ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६६

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. तवर रविंद्र प्रल्हाद, अपिलार्थी

मु. पो. थाळनेर, तालुका शिरपूर,

जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, थाळनेर,

तालुका शिरपूर, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी फेरसादर केलेले व दिनांक १२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे डिसेंबर २००७ ते १६ मे २००८ पर्यंत झालेल्या ग्रामसभा व मासिक मिटींग प्रोसिडींग बुकची नक्कल ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेतला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीचा दिनांक २६-०९-२००८ रोजीचा जबाब त्यांनी आयोगास सादर केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय होऊ शकला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या प्राप्त झालेल्या अपील अर्जावर त्यांनी देखील, केवळ अपिलार्थी हे त्यांच्याकडील सुनावणीस गैरहजर राहिले म्हणून कोणताही निर्णय दिला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे सशुल्क माहिती देण्याची कालमर्यादा व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे. या सर्व बाबी पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियामतील कलम ७ (१) चा नि:संशयपणे भंग केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता ती अत्यंत मर्यादित

असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही जास्तीचे श्रम घ्यावे लागले असते किंवा त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागले असते अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजी जी माहिती पुरविली आहे ती त्यांना अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी प्रथम अर्ज केल्यानंतर विहित मुदतीत देखील पुरविता येणे सहज शक्य होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करुन देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस त्यांच्या माहिती मिळण्याच्या हक्कापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ कालावधीसाठी जन माहिती अधिकारी यांनी वंचित ठेवल्याने संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. ए. एल. झाल्टे, सध्या निलंबीत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब असमर्थनीय असल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या निर्णयाची प्रत देण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरपूर हे जबाबदार राहतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीकडून, सशुल्क माहिती देण्याची विहीत मुदत व्यपगत झाल्यानंतरही, माहिती देण्यासाठी शुल्क आकारुन संबंधित सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी परत एक अनियमितता केली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, विचाराधीन अपील प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीपोटीचे घेतलेले पूर्ण शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः परत करावे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलार्थी हे सुनावणीसाठी गैरहजर होते म्हणून त्यांच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याचे टाळले असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अपिलांच्या सुनावणीसंदर्भात जरी उभय पक्षकारापैकी कोणीही अथवा दोघेही गैरहजर राहिले तरी त्यांनी

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ठोस निर्णय घेणे हे त्यांना अनिवार्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी व इत:पर असे प्रकार टाळावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीपोटीचे घेतलेले पूर्ण शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः परत करावे.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. ए. एल. झाल्टे, सध्या निलंबीत) यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तवर रविंद्र प्रल्हाद, मु. पो. थाळनेर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, थाळनेर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. ए. एल. झाल्टे (सध्या निलंबीत), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, थाळनेर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रा-तील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६७

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. उमेशकांत गुलाबराव पाटील,<br>१६७, प्रियदर्शनी नगर, नगांवबारी, विद्यावाडी, देवपूर, धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, साक्री, जिल्हा धुळे | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, धुळे | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, साक्री, जिल्हा धुळे

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय कृषि अधिकारी, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्यात येऊन सेवाशर्तीच्या नियमानुसार कारवाई होण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सन २००६ ते २००७ या कालावधीशी संबंधित अतिवृष्टीबाधित शेतक-यांच्या व त्यांना देण्यात आलेल्या अनुदानासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शेताच्या नुकसानीच्या गावनिहाय पंचनाम्याची यादी, पंचनामे करणा-या अधिका-यांची नांवे, अतिवृष्टीबाधित झालेल्या शेतक-यांची नांवे व त्यांचे गट नंबर, यासाठी तालुक्याला मंजूर करण्यात आलेला निधी, शेतक-यांना अदा करण्यात आलेला निधी व शेतक-यांना देण्यात आलेले पहिले देयक व उर्वरित रकमेचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०८-२००७ रोजी पत्र पाठविले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात तालुका कृषि अधिकारी, साक्री यांना कळविण्यात आले आहे व या माहितीचे त्यांना अवलोकन करावयाचे असल्यास ते संबंधित कार्यालयात येऊन करु शकतील. या पत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांचा मूळ अर्ज त्यांना दिनांक १२-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज कार्यालयीन सहायक अधीक्षक श्री. महाले यांच्याकडे माहिती काढून पाठवावी अशी सूचना करुन हस्तांतरीत केला. श्री. महाले, कार्यालयीन सहायक अधीक्षक यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही आणि ते कार्यालयीन प्रमुखाच्या निदर्शनास आणून दिले नाही. त्यामुळे अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००७ रोजी झालेल्या सुनावणीनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लागणा-या खर्चाची मागणी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे केली. ही माहिती अपिलार्थीस तात्काळ देण्यासाठी निधी प्राप्त होण्याची वाट न पाहता

त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-११-२००७ रोजी याविषयासंदर्भातील अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. त्याप्रमाणे अपिलार्थी हे दिनांक १९-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेख पाहिले, त्यांच्या शंकांचे समाधान झाले व त्यांना हवी असलेली माहिती पूर्णतः मिळाली. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीबाबत त्यांची काहीही तक्रार नाही, असा त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-११-२००७ रोजी लेखी जबाब दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीच्या दिनांक १९-११-२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची सत्य झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १९-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती पूर्णतः मिळाल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे लिहून दिले आहे. एवढेच नव्हे तर त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचे आभार देखील त्यांनी या पत्रामध्ये मानले आहेत. असे असूनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या, त्यांच्या दिनांक २१-११-२००७ रोजीच्या व दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदणी झालेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजतागायत माहिती उपलब्ध झाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आपल्या मूळ अर्जासंदर्भात घेतलेली भूमिका व आयोगास अपिलार्थी यांच्यातर्फे पुरविण्यात आलेली माहिती यातील विसंगती व तसेच, अपिलार्थीची आयोगाकडील सुनावणीची लेखी नोटीस प्राप्त झाल्यानंतही आज रोजी असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमेशकांत गुलाबराव पाटील, १६७, प्रियदर्शनी नगर, नगांवबारी, विद्यावाडी, देवपूर, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६८

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. मोहमद सलीम अब्दुल रज्जाक, अपिलार्थी

ताशा गल्ली, सुलतानिया चौका शेजारी ग. नं. ८,

धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल

धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सचिव, संचलित अंजुमन ईशाते तालीम,

अँग्लो उर्दू हायस्कूल, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यासाठी सात महिने इतका विलंब लागला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक, श्री. वकील अ. अ. मजीद अँग्लो उर्दू हायस्कूल, धुळे यांनी दिनांक ११-१२-२००६ ते १४-०१-

२००७ पर्यंत घेतलेल्या अर्जित रजेच्या मूळ अर्जाची व अर्ज ज्यांनी मंजूर केला त्याची छायांकीत प्रत ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा संबंधित संस्थेचे सचिव यांच्याकडे दिनांक १४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले व तदनंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सात महिने इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा संबंधित दिनांक १४-०९-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज मूळात त्यांना प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०५-०३-२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे. ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणताही विलंब लावला नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. तसेच त्यांनी दिनांक १४-०९-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असल्याबाबतचा देखील कोणताही पुरावा त्यांना आयोगास सादर करता आली नाही. या सर्व बाबींचा विचार करता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद सलीम अब्दुल रज्जाक, ताशा गल्ली, सुलतानिया चौकाशेजारी ग. नं. ८, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संचलित अंजुमन ईशाते तालीम, अँग्लो उर्दू हायस्कूल, काँग्रेस भवनाशेजारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६६९

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शेख निसार अहमद तांबोळी,<br>३५ ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक १७-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतरही त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे शास्ती आदेशित

करावी व याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी पार न पाडल्याने त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वक्फ बोर्डाच्या रचनेसंदर्भात एकूण नऊ मुद्दयांव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विद्यमान वक्फ बोर्डाचे सदस्य अथवा सभापतीचे नांव, कलम १४ च्या ज्या वर्गातून नियुक्त अथवा निवडण्यात आले, नियुक्ती दिनांक, राजपत्र प्रसिध्द झाल्याचा दिनांक व संदर्भ, पदावर रुजू झाल्याचा दिनांक, सदस्य व चेअरमन यांच्या संदर्भात राजपत्राची साक्षांकीत झेरॉक्स प्रत, वक्फ बोर्डाच्या झालेल्या सभेचा तपशील, सभेची तारीख, सभेस अनुपस्थित सदस्याचे नांव, ज्या सदस्यांनी नियुक्ती स्वीकारली नाही त्यांची नांवे, सदस्यांच्या नियुक्ती आदेशाची झेरॉक्स प्रत, महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत वक्फच्या नावाची पत्त्यासहीत यादी, सतत तीन किंवा जास्त सभेस अनुपस्थित सदस्याविरुध्द केलेली कारवाई, वक्फ अधिनियम १९९५ लागू झाल्यानंतर ज्या तारखेला वक्फ बोर्ड स्थापन करण्यात आले त्यासंदर्भातील राजपत्राची साक्षांकीत प्रत व विद्यमान वक्फ बोर्ड ज्या तारखेला कार्यान्वीत झाले ती तारीख - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यांना तत्कालीन लेखा अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज श्री. एम. ए. माजेद खान, चौकशी अधिकारी, आस्थापना विभाग यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००७ रोजी देऊन अपिलार्थीस एक आठवड्याच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि आस्थापना विभागाने त्यांना माहिती न पुरविल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर तत्कालीन माहिती अधिकारी श्री. मुजफ्फर सिद्दिकी, लेखा अधीक्षक यांनी दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्रथम कार्यवाही करुन चौकशी अधिकारी, आस्थापना विभाग यांच्याकडे अर्जाची प्रत दिली व त्यांना अपिलार्थीस एका आठवड्याच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. मात्र आजतागायत कोणतीही माहिती अपिलार्थीस वक्फ बोर्डाकडून प्राप्त झालेली नाही. आज रोजी आयोगासमोर उपस्थित झालेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मुजफ्फर सिद्दिकी व त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरवण्यासाठी जबाबदार असलेले आस्थापना विभागाचे प्रमुख श्री. एम. ए. माजेद खान, हे एकत्रितपणे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्याकरिता श्री. मुजफ्फर सिद्दिकी व श्री. एम. ए. माजेद खान हे दोघेही एकत्रितपणे जबाबदार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही. त्यांना बचावाची एक संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रितपणे शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. आयोगास त्यांचा खुलासा या मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय

प्रदीर्घ कालावधीसाठी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. या निर्णयाच्या प्रती सर्व संबंधितांना वेळेत पुरविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद हे जबाबदार राहतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. मुजफ्फर सिद्दिकी, सहायक लेखा अधीक्षक) व त्यांचे सहायक श्री. एम. ए. माजेद खान, आस्थापना विभाग, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना उपरोक्त प्रकरणी एकत्रितपणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्या-पासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख निसार अहमद तांबोळी, ३५ ब, अनम पॅलेस, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.

२ कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. मुजफ्फर सिद्दिकी, सहायक लेखा अधीक्षक तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत -मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की,

औरंगाबाद)

४ श्री. एम. ए. माजेद खान, तत्कालीन जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत -मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद)

५ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७०

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. ललित बाबुलाल नाईक, अपिलार्थी

४०, रामनगर, शहादा, जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा पंचायत समिती, नंदुरबार, जिल्हा परिषद, नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ६४ दिवसाचा कालावधी ओलांडल्यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी २००० ते डिसेंबर २००६ या कालावधीतील श्री. पी. एन. गावीत, शाखा अभियंता यांनी केलेल्या कामाची अंदाजपत्रके व खर्च ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ व विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्याकडे उपस्थित झाले नाहीत. मात्र अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी सुनावणी झाली असता त्यांनी अपिलार्थीस ही माहिती डिसेंबर २००७ मध्ये पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचा अपिलार्थीचा जबाब त्यांनी आयोगासमोर सादर केला असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ पोच सही दिली आहे. मात्र अपिलार्थीस निश्चितपणे ही माहिती कधी प्राप्त झाली या दिनांकाचा यामध्ये उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीस त्यांनी १५ डिसेंबरच्या आसपास ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने त्यांनी अपिलार्थीस स्वतःहून ही माहिती पाठविली नाही / व अंतीमतः जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे ती माहिती त्यांनी दिनांक ०५-१२-२००७ रोजी

पोस्टाने पाठविली. तथापि सदर टपाल अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ डिसेंबरच्या सुमारास व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेली प्रत आयोगास सादर केली असून यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने, येथे असे नमूद करण्यात येते की, कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जावर पुढे काय घडामोडी झाल्या, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क इत्यादी संदर्भात माहिती ज्ञात होण्याकरिता अपिलार्थीस त्यांनी स्वतःहून जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधणे हे अपिलार्थीचे उत्तरदायित्व आहे. या प्रकरणी हे उत्तरदायित्व अपिलार्थीने पार पाडलेले नाही व तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपस्थित केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज व्यक्तिशः उपस्थित नाहीत व त्याचे खंडन करणारा पुरावाही त्यांनी आयोगाकडे सादर केला नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ललीत बाबुलाल नाईक, ४०, रामनगर, शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७१

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. महेश तानाजी नांद्रे, अपिलार्थी

जनता पार्क, प्लॉट नं. ८८, मार्ग क्रमांक १, नवापूर,

तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, आदर्श माध्यमिक विद्यालय, रायपूर,

तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष, आदिवासी ज्ञानपीठ नवापूर,

नॅशनल हायवे जवळ, इस्लामपूरा, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा

नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी शाळेतील शिक्षकांची सेवाजेष्ठता यादीची प्रमाणित प्रत मागितली असता त्यांनी ती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता संस्थेच्या अध्यक्षांनी अप्रत्यक्षरित्या माहिती अधिकाऱ्यास सहकार्य केले व अपिलार्थीस माहिती मिळवून दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आदर्श माध्यमिक विद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादीची सत्य झेराक्स प्रत प्रमाणित करुन (अटेस्टेड) मागितली होती. याच अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना असे म्हटले आहे की, जर त्यांच्याकडे शाळेची सेवाजेष्ठता यादी उपलब्ध नसेल तर संस्थेची एकत्रित सेवा जेष्ठता यादी त्यांना उपलब्ध करुन दिली तरी त्यांची काही हरकत नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वकिलाकडे उपलब्ध असलेल्या शाळेच्या दप्तरामध्ये असल्याने ते दप्तर प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्वरित माहिती उपलब्ध करुन दिली जाईल असे आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या अध्यक्षाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संस्थेच्या अध्यक्षांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने रुपये ४० इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने पाठविले. तथापि मनीऑर्डरने शुल्क पाठवूनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक २५-०१-२००८ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे असल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना न कळविता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वकिलाकडील शाळेच्या दप्तरात असल्याचे अपिलार्थीस

कळविले. सदर वकिलाची नेमणूक शाळेनेच केली होती त्यामुळे त्या वकिलाकडून शाळेचे दप्तर मागवून घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. मात्र असे न करता त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती वकिलाकडे असलेल्या दप्तरात असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून सार्वजनिक प्राधिकरणाकडील माहिती अधिकारी या नात्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे हे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस दिनांक १९-१०-२००७ रोजी अगर तत्पूर्वी ज्ञात होणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन अपिलीय अधिकारी यांनी ही तारीख लोटून, अपिलार्थीने दिनांक १७-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर कळविले. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क संबंधित शिक्षण संस्थेने त्यांना अधिनियमाव्दारे विहित मुदतीपेक्षा विलंबाने कळविले असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल. आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके स्वीकृत केले असल्याने ते आता त्यांना अपिलार्थीस पूर्णतः परत करावे लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ रोजी माहिती पुरविल्याचा युक्तिवाद केला व त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २१-०१-२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. तथापि या पुराव्यावरील अपिलार्थीची सही व आयोगाकडे त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारावरील सही यामध्ये आयोगास तफावत आढळून येत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीकडून यापूर्वी पुरविल्या गेलेल्या कथित माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांनी स्वीकृत केलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद
दिनांक ३०-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महेश तानाजी नांद्रे, जनता पार्क, प्लॉट नं. ८८, मार्ग क्रमांक १, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श माध्यमिक विद्यालय, रायपूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, आदिवासी ज्ञानपीठ, नवापूर, नॅशनल हायवे जवळ, इस्लामपूरा, नवापूर, तालुका नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७२

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. अे सी कुवर सुकलाल मंगा, अपिलार्थी
मु. पो. कहाटूळ, तालुका शहादा,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,
जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी प्रथम अपील करुनही या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही अथवा यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांनी दिनांक ०६-०९-२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशीबाबतच्या अहवालाची प्रत मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणी होऊन त्यावर निर्णय होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून राज्य माहिती आयोगाकडे नव्वद दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अे सी कुवर सुकलाल मंगा, मु. पो. कहाटूळ, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी, कार्यालय गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७३

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. गण्या केल्ला वसावे, अपिलार्थी

व्दारा, नर्मदा बचाओ आंदोलन,

मैत्री निवास, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक वन संरक्षक, उत्तर धुळे वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा मुख्य वन संरक्षक, उत्तर धुळे वनविभाग, शहादा,

जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, शहादा

जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही, त्यामुळे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करण्यास जो विलंब लागला होता त्या विलंबाच्या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी

यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळून लावले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे केला आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, विचाराधीन अपिलाशी संबंधित माहिती अपिलार्थीने घेऊ नये म्हणून त्यांच्यावर वन विभागाचे कर्मचारी श्री. भुसनर व श्री. बागूल यांच्याकडून दबाव टाकण्यात आला. यासंदर्भात त्यांनी पोलीस निरीक्षक, धडगांव पोलीस स्टेशन यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी नोंदविलेल्या तक्रारीवर देखील आजतागायत कोणतीही कारवाई झाल्याचे त्यांना ज्ञात होऊ शकले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वन विभाग (रोषमाळ खु.) धडगांव यांच्यामार्फत उतारपाडा, माथेपाडा येथील अठ्ठी गावातील दगडी बांधाचे कामासंदर्भात फेब्रुवारी २००६ ते एप्रिल २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - हजेरी रजिस्टर, मजूरी वाटप रजिस्टर, धान्य वाटप रजिस्टर, मोजमाप रजिस्टर व या कामांसाठी नियोजित, मंजूर व झालेल्या खर्चाचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत सादर केलेले व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याच्या पुराव्याची कागदपत्रे साक्षांकीत करुन मागितली. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झालेले नाही व परिणामी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा साक्षांकीत पुरावा सादर न केल्याने व अपिलार्थीने विहित मुदतीत प्रथम अपील अर्ज न केल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे श्रीमती योगिनी खानोलकर यांनी युक्तिवाद केला. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचा व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचा व त्यांना वन विभागातील संबंधित अधिका-याकडून प्राप्त झालेल्या धमकी व यासंदर्भात त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीचा पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेला दारिद्र्यरेषेखालील पुरावा साक्षांकीत करुन आणण्यासाठी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने असा पुरावा सादर न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न होण्याचे कारण म्हणजे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २९-०५-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त न होणे हे होय. आज रोजी अपिलार्थीस सदरचे पत्र पाठविल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीच्या उता-याची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००७ रोजीचे पत्र पाठविले आहे असे अनुमान काढण्यास काही हरकत नसावी. मात्र हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही हेही तितकेच खरे आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार असून ते ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे साक्षांकीत करुन सादर करावा. अपिलार्थीकडून सबळ पुरावा प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. मात्र हा पुरावा अपिलार्थी सादर करु शकले नाहीत तर त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात् आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने वन विभागातील अधिकारी श्री. भुसनर व श्री. बागूल यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन घेण्यामध्ये अडथळे आणल्याच्या व

अपिलार्थीस देण्यात आलेल्या कथित धमकीची आयोगाने गंभीर दखल घेतली असून सचिव (वने) यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्या स्तरावरुन चौकशी करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर जिल्हा पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांना देखील अपिलार्थीने पोलीस स्टेशन धडगांव येथे त्यांनी दाखल केलेल्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या वन अधिका-याकडून मिळालेल्या कथित धमकीबाबत त्वरेने कारवाई करावी व इतःपर अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यासंदर्भात सर्व संबंधितांना सूचनापत्र जारी करावे, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, या निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गण्या केल्ला वसावे, व्दारा, नर्मदा बचाव आंदोलन, मैत्री निवास, धडगांव, तालुका धडगांव, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (वने) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७४

निर्णय दिनांक ३०-०४-२००९

१ श्री. सखाराम भुता पाटील, अपिलार्थी
मथुरानगर, लोणखेडा, तालुका शहादा,
जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काथर्डे खुर्द,
तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,
जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ३०-०४-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील क्रमांक २६७४/२००७ हे अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने व त्यांचे समाधान झाले असल्याने, मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २६७४/२००७, दिनांक ०६-०९-२००७ हे खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २६७४/२००७, दिनांक ०६-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सखाराम भुता पाटील, मथुरानगर, लोणखेडा, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काथर्डे खुर्द, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६७५

निर्णय दिनांक  ३०-०४-२००९

१ श्री. शेख बिसमिल्ला शेख आशिक, अपिलार्थी

मिल्लत प्रायमरी शाळेजवळ, अक्सा नगर, मेहरुण,

जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष, मिल्लत एज्युकेशनल ॲण्ड वेलफेअर सोसायटी,

जळगांव, व्दारा, मुख्याध्यापक, मिल्लत हायस्कूल, मेहरुण, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती देण्यास नकार दिला त्यामुळे त्यांनी संबंधित संस्थेच्या अध्यक्षाविरुध्द शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी शिक्षण उप संचालक हे प्रथम अपिलीय अधिकारी असल्याचे तोंडी सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी शिक्षण उप संचालक यांच्याकडे अपील केले असता त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००७ रोजीचे पत्र लिहिले. या अर्जामध्ये अपिलार्थीने संस्थेसंबंधी माहिती आवश्यक असल्याचे अंतीमतः नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेसंदर्भात सन १९८६ ते २००७ या कालावधीशी संबंधित एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने सदरची माहिती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः हजर राहून हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांच्याकडे दिनांक २५-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली नव्हती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर कोणत्याही प्रकारे स्वतः निर्णय न घेता त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाकडे करावी असे त्यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीस ही माहिती, त्यांच्या मूळ अर्जातील विनंतीप्रमाणे संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जाण्यासाठी त्यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी पत्र लिहिले होते. तथापि ही माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीच्या संदर्भात त्यांचा अनुभव असा आहे की, अपिलार्थी त्यांनी मूळ अर्जात दिलेल्या पत्त्यावर राहत नाहीत. त्यांच्याशी संस्थेने ज्या ज्या वेळी पत्रव्यवहार केला त्या त्या वेळी अपिलार्थी हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याचे त्यांना आढळून आले आहे. तसेच अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पत्रव्यवहार केला असतांना देखील अपिलार्थी सदर पत्रव्यवहार स्वीकारण्यास वेळोवेळी नाकारत असतात. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्यासाठी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतःहून संपर्क साधणे अनिवार्य होते. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१२-२००७, दिनांक १२-१२-२००७ व दिनांक ३०-१२-२००७ रोजी अशा प्रकारच्या तीन पत्राव्दारे आवश्यक त्या शुल्काचा तपशीलही अपिलार्थीस कळविला आहे. अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत हे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली महिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याने अपिलार्थीस या माहितीची अद्यापही आवश्यकता असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः उपस्थित राहावे व या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतः जबाबदार आहेत, त्यांनी योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख बिसमिल्ला शेख आशिक, मिल्लत प्रायमरी शाळेजवळ, अक्सा नगर, मेहरुण, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मिल्लत एज्युकेशनल ॲण्ड वेलफेअर सोसायटी, जळगांव, व्दारा, मुख्याध्यापक, मिल्लत हायस्कूल, मेहरुण, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.